# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २०/२/१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/२/२०१० रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—११

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार दिनांक २०/२/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३९ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४१ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४२ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४३ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४४ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४५ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४६ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्रीमती विद्याताई निर्मले | ४७ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४८ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४९ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५० | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५१ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५४ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५५ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५६ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५७ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५८ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५९ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ६० | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६२ | श्री. मोहन साधवाणी |
| २७ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६३ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्री. लाल पंजाबी | ६४ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २९ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६५ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३० | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६६ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३१ | श्रीमती शकुंतला पाटील | ६७ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३२ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६८ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३३ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६९ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३४ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७० | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३५ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७१ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३६ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ७२ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३७ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी | ७३ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३८ | श्रीमती जया माखिजा | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. दत्तात्रय नारायण पवार, २. श्री. राजू जग्यासी, ३. श्री.एडके गणपत गोविंद, ४.. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, ५. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ६. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), ७. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), ८. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई)

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
६. श्री. सी.पी. सिंग, सहा. संचालक, नगररचना
७. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
९. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
१०. श्री. एम. जवांदे, शहर अभियंता
११. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१२. श्री. एस.के.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१३. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
१४. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१५. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१६. श्री. ए.एन. म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७. श्री. बाजीराव जाधव, प्र. प्रभाग अधिकारी
१८. श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक, साप्रवि
१९. श्री. जनार्दन देवकर, व. लिपीक, आरोग्य

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.१० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्रमांक..................

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>सभागृहाचे कामकाज सुरु होण्याअगोदर एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधु इच्छितो. आता ही जी निमंत्रण पत्रिका वाटप केली जात आहे, जिच्यावर लिहिले आहे, उल्हासनगर महानगरपालिका या निमंत्रण पत्रिकेमध्ये प्रमुख पाहुण्यांची जी नावे लिहिली आहेत ती पाहिली तर त्यात नावे लिहिली आहेत. त्यामध्ये उल्हासनगर विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. कुमार आयलानी यांचे नाव लिहिलेले नाही. या निमंत्रण पत्रिकेत अंबरनाथ विधानसभा मतदार संघाच्या आमदाराचे नाव लिहिलेले आहे. ही एक फार मोठी चुक आहे.

यावेळी श्री. महेश सुखरामानी, श्री. गोदुमल क्रिष्णानी, श्रीमती शकुंतला पाटील, श्री. प्रभुनाथ गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>ही जी निमंत्रण पत्रिका महापालिकेच्यावतीने वाटप केले जात आहे त्यामध्ये आदरणीय आमदार श्री. कुमार आयलानी यांचे नाव लिहिलेले नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्रिडा समितीची ही निमंत्रण पत्रिका आहे. ती आता आताच सर्व सन्माननिय नगरसेवकांना वाटप करण्यात आली आहे. प्रमुख पाहुण्यांमध्ये सर्वात प्रथम श्री. अशोक बागेश्वर यांचे नाव लिहिलेले आहे. त्यानंतर मा. महापौर सौ. राजश्री राजेंद्र चौधरी, मा. उप–महापौर, श्री. विनोद ठाकुर, अंबरनाथ विधान सभा मतदार संघाच्या आमदाराचे या पत्रिकेत नाव लिहिले आहे. मात्र उल्हासनगर मतदार संघाचे नाव नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. महापौर महोदया, मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे, त्याबाबत क्रिडा समितीचा उपसभापती या नात्याने आमची चुक झाली आहे असे मान्य करतो आम्ही नविन निमंत्रण पत्रिका तयार करु. आणि त्यामध्ये मा. आमदार श्री. कुमार आयलानी यांचे नाव टाकु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>धन्यवाद, धन्यवाद, श्री. प्रशांत धांडे, धन्यवाद..........

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्र. १..........................

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. महापौर महोदया व आयुक्त साहेब, मागच्या महासभेमध्ये मा. महापौरांनी अधिनिर्णय दिला होता की, श्री. युवराज भदाणे यांना निलंबित करा. त्याबद्दल आपण आतापर्यंत कुठलीही कारवाई केलेली नाही. कृपया त्याचा खुलासा करावा. मा. आयुक्त साहेब, या सभेच्या पीठासीन अधिकारी आमच्या महापौर महोदया आहेत. त्यांनी आपणांस आदेश दिला होता की श्री. युवराज भदाणे यांना निलंबित करा. तरीही तुम्ही सभागृहाची बेईज्जती तर करतच आहात. त्याचबरोबर आमच्या महापौर महोदया यांचाही अपमान केलात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचाही अपमान केला आहे. त्याबद्दल मी तर म्हणतो तुम्हांला त्या खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही. तर आपण याचा खुलासा करावा.

<u>उप–महापौर:–</u>आपण कुणाला उद्देशुन बोलत आहात?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मी आयुक्तांना उद्देशुन बोलत आहे.

<u>महापौर:–</u>ही विशेष महासभा आहे, हा विषय विषयपत्रिकेवर. नाही त्यामुळे पुढील विषय पुकारला जावा

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>हा विषय पत्रिकेवरील विषय नाही, याची आम्हांलाही कल्पना आहे. परंतु सभागृहातील सदस्यांचा भावनांचा मान ठेवुन तुम्ही जो आदेश दिला होता त्याचे पालन केले नाही तर मग प्रश्नच काय येतो येथे विशेष महासभा चालविण्याचा ? जर का आमच्या सदस्यांच्या भावना जाणुन घेतल्या जात नसतील, आपलाही आदेश पाळला जात नाही तर मग सभागृह चालविण्यात अर्थ काय आहे? जोपर्यंत आयुक्त साहेब, याचे उत्तर देत नाहीत तोपर्यंत ही सभा आम्ही चालवु देणार नाही. .

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. आयुक्त साहेब, मागील सभेत अतिरिक्त आयुक्त नव्हते. त्याचाही माझ्याकडे पुरावा आहे. त्यांना जरा व्यास पीठावर बोलवा आणि माझ्या या मुद्दयाचा खुलासा करण्यास सांगा.

<u>उप–महापौर :–</u>काय विषय आहे?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u> अतिरिक्त आयुक्तांना आपण व्यासपीठावर बोलावुन घ्या. आपण अतिरिक्त आयुक्त आहात काय?

<u>उप–महापौर :–</u>अतिरिक्त आयुक्तांशी संबंधीत विषय कोणता आहे?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>विषय आहे ना? मागील वेळेस सुध्दा आपण लक्षवेधीवर बोलु दिले नाहीत. अतिरिक्त आयुक्त साहेब, मागील महासभेत आपण हजर नव्हतात. हे पत्र आहे आपले. पाहुन घ्या. आपली सही आहे किंवा नाही? ती पाहुन घ्या.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त) :—हे उप—आयुक्तांचे पत्र आहे. या पत्रावर उप—आयुक्तांची सही आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—कोणाची सही आहे, त्यांना व्यासपीठावर बोलवा.

महापालिका सचिव :—विषय क्र. १..............

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—पहिले आमच्या प्रश्नाचे उत्तर दया, नंतर सभा सुरु करा. उप—महापौरजी, असे वाटते की, आपण सुध्दा यांच्याच सोबत आहात आणि अनाधिकृत बांधकामांच्या बाजुने आहात. उच्च न्यायालयाचा आपणही अपमान करत आहात. आम्ही आमचे आपणांस मत देवुन चुक केली आहे असे वाटते.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महापौरजी व उप—महापौरजी, आपण आयुक्तांना जो आदेश दिला होता त्यांनी तो न ऐकल्यासारखे केले आहे. तुम्हांला ते मान्य आहे का? हे मी मा. महापौर व उप—महापौरांना विचारु इच्छितो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, .................

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—श्री. भुल्लर महाराजजी, अदयाप आमचे बोलणे पुर्ण झालेले नाही.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—पहिले आम्ही बोलत आहोत, श्री. भुल्लर महाराजजी..............

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरजी, सचिव साहेब, लक्षवेधीवर महापौरांना अधिनिर्णय देण्याचा अधिकार आहे का?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—त्यांना अक्कल नाही काय? आपण का शिकवत आहात? त्यांना माहिती नाही काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मी सचिवांना विचारत आहे. लक्षवेधीवर अधिनिर्णय देण्याचा महापौरांना अधिकार आहे काय? ते सांगा जरा. आणि असेल तर कोणत्या अधिनियमांतर्गत? ते आपण सांगा.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मला वाटते, मा. महापौर आणि उप—महापौर यांनी जो आदेश दिला होता त्याची यांना माहिती नाही.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—असे वाटते की, व्यासपीठावर तीन न्यायमुर्ती बसलेले आहेत ती सक्षम नाही. श्री. भुल्लर महाराज यांना तेथे बसविले जावे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मला तेथे बसविण्याची आवश्यकता नाही. महापौर, उप—महापौर सक्षम आहेत.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मला वाटते की, त्यांना कायदेकानुन माहित नाहीत.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—महापौर लक्षवेधीवर अधिनिर्णय देवु शकतात की नाही ते सांगा.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—हे सांगा नगररचनाकार आपल्या स्वत: ची चौकशी करु शकतात का हे आम्हांस सांगा. त्यादिवशी आपण हो हो म्हणत होतात. त्याचे उत्तर दया आपण.

उप—महापौर :—त्या पत्रावर डॉ. दिपक सांवत यांची सही आहे व ते हजर नाहीत.

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—४ महिन्यापुर्वीची तारीख आहे त्या पत्रावर.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आहे तर महानगरपालिकेच पत्र ना ते? ते सुध्दा बोगस आहे. महापालिकेचे पत्र असल्याचे तर आपण मान्य करा. हे पहा, आपण जे काही करत आहात त्यानुसार आपण अनाधिकृत

बांधकामांना सहकार्य करत आहात. त्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० लागु होते.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—एक अधिकारी सभागृहाचा अपमान करतो, आपण त्यांना प्राधान्य देता का? शेम शेम........

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आपणांस जर बेकायदेशीर बांधकामांना सहकार्य दयायचे असेल तर बिनधास्तपणे वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दया की, कुठेही बेकायदेशीर बांधकाम करा. आमचा काही विरोध नाही. अशी तर आमच्याकडे १०० पत्र आहेत आपण एकाच पत्राचे उत्तर देवु शकत नाहीत? सदस्यांना काय समजवणार? मी एक शहरवाशि म्हणुन बोलत आहे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—हे पहा, आपण भाजपाचे सदस्य म्हणुन आमच्याबरोबर युतीमध्ये आहात.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—अहो युतीमध्ये आहे म्हणुन चोरी करणार काय? अनाधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देणार काय?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—एकेकानेच बोलावे. कोण बोलत आहे? तुम्ही जर तुमच्या सदस्यांना सांभाळु शकत नसेल तर आम्ही सुध्दा आमच्या सदस्यांना सांभाळु शकणार नाही.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—याचा अर्थ अनाधिकृत बांधकामे होवु दया असे म्हणायचे आहे आपण यांस?

सदस्य श्री. रमेश चव्हाण:—आम्ही तर पहिलेच सांगितले होते की, यादी काढुन एकेक अनाधिकृत बांधकाम तोडा. आम्ही अनाधिकृत बांधकामे तोडण्याच्या बाजुने आहोत.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आपण सांगा, अनाधिकृत बाधकामां विरुध्द बोलु नका. मी बोलणार नाही, पहा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, श्री. किशोर जग्यासी यांनी जो प्रश्न विचारला, त्याचा महासभेत खुलासा करा ना? जे पत्र त्यांनी लिहिले आहे, त्यात ते काय मागणी करत आहेत. त्याचा आपण खुलासा करा.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. गटनेताजी, आपण हे बरोबर बोललात. पण यांना अधिकार नाही, मा. महापौर आणि उप—महापौर यांचा अपमान करण्याचा.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—महापौर स्वत:च आपल्या पदाचा अपमान करुन घेत आहेत.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—तुम्ही महापौरांचा अधिनिर्णय ऐकत नाहीत.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—महापौरांनी अधिनिर्णय दिला आहे. तो आयुक्तांनी कुठे ऐकुन घेतला आहे? व अशा आयुक्तांना आपण सहकार्य करत आहात?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—असे लोक सत्तेत बसले आहेत.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—सत्तेत बसुन फायदा काय?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—येथे कुणी मा. महापौर, उप—महापौरांचा अपमान करत नाहीत. ते स्वत:च आपला अपमान करुन घेत आहेत. त्यांनी आयुक्तांना आदेश दिला होता श्री. भदाणे यांना निलंबित करण्याबाबतीत, त्यानंतरही आयुक्त त्यावर कारवाई करत नाहीत याचा अर्थ काय? व ते आमच्या प्रश्नाचे उत्तर सुध्दा देत नाहीत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. आयुक्त साहेब, कलम ५६ आपण वाचुन दाखवावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>महापौर महोदया, श्री. किशोर जग्यासी यांनी जे पत्र दिले आहे, त्यात त्यांनी काय विचारणा केली आहे याची सभागृहासही माहिती नाही. त्याचा खुलासा करण्यासाठी संबंधीत अधिका–यास सांगा. त्या पत्रात काय आहे आणि त्यांनी काय मागणी केली आहे?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. महापौर महोदया, इकडे जरा लक्ष असु दया. श्री. दिपक सावंत या उप–आयुक्त साहेबांनी पत्र दिले होते तेच पत्र श्री. किशोर जग्यासी यांनी ९/११/२००९ ला आपल्याकडे दिले आहे. त्यामध्ये अनाधिकृत बांधकामास जबाबदार असणा–यांवर शिस्त भंगाची कारवाई साठी मंजुरी आदेश असे लिहुन दिलेले आहे. त्या पत्राचा खालचा परिच्छेद मी तुम्हांला वाचुन दाखवितो. त्यामध्ये शहरातील अनाधिकृत बांधकामास जबाबदार असणारे अधिकारी खालीलप्रमाणे आहेत. त्यांची नावे आहेत, १. श्री. युवराज भदाणे, २. श्री. नंदुकुमार समतानी, ३. श्री. रमेश काजळे त्यात १. श्री. नंदुकुमार समतानी, २. श्री. रमेश काजळे यांना निलंबित केले. हा आमचा विषय आहे. त्यामध्ये आयुक्तांची, उप–आयुक्तांची सही आहे. आणि अतिरिक्त आयुक्त साहेबांची सुध्दा सही आहे. मग त्या दोन अधिका–यांना निलंबित का केले? हा प्रश्न निर्माण होतो. जर तुम्हांला न्याय करायचा होता तर तिघांनाही करायचा होता. तिघांनाही निलंबित करायचे होते ना? दोघांना निलंबित कशाला केले?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>श्री. रमेश चव्हाणजी, पीठासीन अधिकारी महापौर आहेत, आयुक्तांना पण ते अधिकार नाहीत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>महापौरांचा अपमान कराल तर आम्ही चुप बसणार नाहीत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी / सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>आपण स्वत:च महापौरांचा अपमान करत आहेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>तुम्ही महापौरांचा अपमान करत असाल तर आम्ही तुमची ईज्जत करणार नाहीत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u>मी उप–महापौरांशी बोललो, मी मा. महापौरांना अदयापपर्यंत एक शब्दही बोललो नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>सन्माननिय श्री. रमेश चव्हाण साहेब, मा. महापौर व उप–महापौरांचा अपमान कुणीही करत नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>श्री. किशोर जग्यासी यांनी प्रश्न विचारला आहे, त्यामध्ये मा. महापौरांच्या अपमानाचा प्रश्न येतोच कुठे?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>महापौर, उप–महापौर बसले आहेत, सत्तेमध्ये महापौर, उप–महापौर बसलेले आहेत, त्यांचा अपमान केलात तर आम्हांला सत्तेत बसण्याची जरुरत नाही. आम्हांला सत्तेची जरुरत नाही. आम्ही सत्तेच लालची नाहीत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर या महापालिकेच्या व सभागृहाच्याही आदरणीय आहेत, उप–महापौर आदरणीय आहेत, सन्माननिय सदस्य श्री. किशोर जग्यासी हे आदरपुर्वक त्यांना काही विचारत आहेत. त्यात ते महापौर, उप–महापौरांचा काही अनादर करत नाहीत.

<u>सदस्य श्री. किशोोर जग्यासी:–</u>प्रश्न विचारण्याचा आमचा अधिकार आहे. व आपण त्यास उत्तर दयायचे आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>ते महापौरांबाबत बोलत नाहीत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मी उप–महापौरांना बोललो आहे. त्यांनी अधिका–यांना उत्तर देण्यासाठी आदेश दयावेत. इतिवृत्त वाचा, काही चुकीचे असेल तर सांगा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:–</u>उप–महापौरांना त्यांनी का बोलावे? ते युतीचे घटक नाहीत काय?

<u>सदस्य श्री.किशोर जग्यासी :–</u>मी काय बोललो त्यांन? सांगा उप–महापौरजी?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>आपणांस मत देवुन चुक केली. असे आपण बोललात की नाही?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>बेकायदेशीर बांधकामांना सहकार्य करत आहेत. मग आम्ही बोलणार नाहीत तर काय?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>काय सहकार्य केले त्यांनी?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>माझे पत्र वाचा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>आपले पत्र आम्हांला माहित आहे ना काय आहे ते?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>तर मग आपण का बोलत आहात?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>का बोलत आहे म्हणजे? महापौर शहराचे आहेत. उप–महापौर शहराचे आहेत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>उप–महापौर सक्षम आहेत. नाहीत काय?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>काय चालु आहे? त्यांच्या आदेशाचे पालन होत आहे काय? तो त्यांचा अपमान वाटत नाही काय?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>आपणांस जे काही विचारायचे आहे ते आयुक्तांना विचारा आम्ही आपणांस थांबवत आहोत का?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>आम्ही आयुक्तांशीच बोलत आहोत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>आपल्या बोलण्यात महापौर व उप–महापौरांचे यांचे नाव आले म्हणुन आम्ही आपले विरोध करत आहोत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>उप–महापौरजी, आपणांस प्रश्न विचारण्यास काही चुकीचे आहे काय? असेल तर सांगा. यापुढे प्रश्न विचारणार नाही? सांगा, उत्तर दया.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, आजची सभा ही विशेष महासभा आहे. आणि विशेष सभा ही विषय पत्रिकेवर जेवढे विषय असतील तेवढयावरच चर्चा होते. सन्माननिय सदस्यांना विचारायचे असेल तर त्यांनी प्रश्नोत्तराच्या स्वरुपात प्रश्न घेवुन यावेत त्यावर चर्चा करता येईल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, आपण फार हुशार आहात. आम्हांला माहित आहे. म्हणुन तुम्ही त्या खुर्चीवर बसला आहात. पण मागच्या सभेत जो निर्णय झाला होता, त्यानुसार श्री. भदाणे यांना तुम्ही अदयाप निलंबित केले नाहीत. म्हणुन आम्ही सभागृहात बोलत आहोत. तुम्ही सभागृहाची काय ईज्जत ठेवली आहे? सभागृहाचा तुम्ही अपमान करतात आणि आम्हांला म्हणता की, ही विशेष महासभा आहे, मग अशी सभा चालविण्यास काय अर्थ आहे? आम्ही विचारलेल्या प्रश्नाबाबत महापौरांनी जी रुलींग दिली होती, त्याचे समाधान करा त्यानंतर ही सभा चालु करा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>आयुक्त साहेब, सभा जो निर्णय घेते त्याची किती दिवसात अंमलबजावणी झाली पाहिजे. हे आपण सांगा. कधीपर्यंत झाली पाहिजे? दुस–या सभेपर्यंत झाली पाहिजे की नाही? ते सांगा. दिवस सांगा किती दिवसात झाली पाहिजे? पंधरा दिवसात? वीस दिवसात अंमलबजावणी झाली पाहिजे? ते सांगा. आम्ही बसून घेतो. महासभेने आपणांस जो आदेश दिला आहे, तो किती दिवसात अंमलात येईल? त्याचे आपण उत्तर दया.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, मी मागच्या वेळेस बोललो होतो की, जोपर्यंत आपण श्री. भदाणे यांना निलंबित करणार नाही, तोपर्यंत प्रत्येक सभेत मी खाली बसणार आहे. त्याप्रमाणे मी आज पुन्हा खाली बसत आहे.

यावेळी सदस्य खालील सदस्य व्यासपीठासमोरील मोकळया जागेत बैठक मांडली.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेखर यादव | १८ | श्रीमती शकुंतला पाटील |
| २ | श्री. सुरेश जाधव | १९ | श्रीमती जया माखिजा |
| ३ | श्री. प्रधान पाटील | २० | कु. शकुंतला जग्यासी |
| ४ | श्री. राजेश वानखेडे | २१ | श्रीमती विद्याताई निर्मले |
| ५ | श्री. तेजी मुकेश | २२ | श्रीमती बेबी भोईर |
| ६ | श्री. प्रशांत धांडे | २३ | श्रीमती वसुधा बोडारे |
| ७ | श्री. दिलीप जग्यासी | २४ | श्रीमती ज्योती माने |
| ८ | श्री. गोविंदराम लुंड | २५ | श्रीमती जयश्री सुर्वे |
| ९ | श्री. भजनलाल रामचंदानी | २६ | श्रीमती ज्योती चैनानी |
| १० | श्री. हरेश जग्यासी | २७ | श्री. सुंदर मंगतानी |
| ११ | श्री. अंकुश म्हस्के | २८ | श्री. प्रकाश सावंत |
| १२ | श्रीमती चंद्रा टेकचंदानी | २९ | श्रीमती मालती करोतिया |
| १३ | श्रीमती मोना वनवारी | ३० | श्रीमती इंदिरा उदासी |
| १४ | श्रीमती कविता सिरवानी | ३१ | श्रीमती लिलाबाई आशान |
| १५ | डॉ. निना नाथानी | ३२ | श्रीमती शिला मनसुलकर |
| १६ | श्री. सुनिल गंगवानी | ३३ | श्रीमती निलम रावत |
| १७ | श्री. विजय सुपाळे | | |

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>आमचे सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी नगररचना विभागाचा मुद्दा मांडला होता तेव्हा आपण त्वरीत स्थगिती आदेश दिला होता. व आता आपला काही आदेश चालत नाही असे का? ते सुध्दा एक सदस्य आहेत मी सुध्दा एक सदस्य आहे. अनाधिकृत बांधकामात आपला काही हात आहे, यासाठी आपण त्यांना निलंबित करत नाहीत. यासाठी मी माझा प्रश्न बंद करत आहे.

<u>महापौर :–</u> मी आयुक्त साहेबांना आदेश देते की, जो पहिला अधिनिर्णय आहे तो पुर्ण करावा व याची नोंद घ्यावी. आता सर्व सदस्यांनी आपल्या स्थानी आसनस्थ व्हावे.

यावेळी तटस्थ भुमिकामुळे सभागृहात उपस्थित असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती संगिता कंडारे, श्री. नरेंद्र राजानी, श्रीमती सुजाता रिजवानी, श्री. संजय बठिजा, श्री. अनिल विदयार्थी, श्री. रविंद्र बागुल हे सभागृहातुन बाहेर गेले.

त्यांच्या पाठोपाठ सभागृहात उपस्थित असलेले आरपीआयचे सदस्य श्री. बी.बी.मोरे, श्री. जे.के. ढोके, श्रीमती लता निकम, श्रीमती सुमन शेळके, श्रीमती पंचशिला पवार हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>आज सभागृहात उपस्थित असलेल्या सदस्यांच्या निम्म्या सदस्यांपेंक्षा जास्त सदस्य जमिनिवर बसले आहेत. त्याविषयी आपणांस निवेदन केले जात आहे की, आपण आदरणीय आयुक्त साहेबांना निवेदन करावे की, त्यांनी सभागृहास उत्तर दयावे. या विषयावर चर्चा झाली पाहिजे. आज निम्म्यापेक्षा जास्त सदस्य जमिनिवर बसले आहेत व आम्ही काहीही न बोलता गप्प बसुन आहोत. हे सभागृहासाठी योग्य नाही. लोकशाही प्रणालीमध्ये जनतेचे प्रतिनिधी जर जमिनिवर बसले तर सर्वात प्रथम आपण आयुक्तांना उत्तर देण्यासाठी सांगितले पाहिजे.

यावेळी सदस्य श्री. कुमार आयलानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>आयुक्त साहेब, तुमच्याकडे जे उत्तर आहे ते तुम्ही दया ना?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>मी आधीच निवेदन केलेले आहे की, आजची विशेष महासभा आहे, जे विषय पत्रिकेवर विषय आहे त्यावरच चर्चा होईल. दुसरी गोष्ट अशी आहे की, एका सन्माननिय सदस्यांनी कागदपत्र दिली आहेत त्या कागदपत्रांमध्ये काय आहे ते तपासुन बघितलयाशिवाय त्यावर उत्तर देणे शक्य होणार नाही.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>आयुक्त साहेब, या अगोदर उल्हासनगर महानगरपालिकेचे बरेचसे कर्मचारी व अधिकारी निलंबित झाले होते, व आता आपण हे जे म्हणत आहात की, पाहणी करु. या अगोदर आपण किती लोकांची पाहणी केले? महासभेत काही उत्तर नाही. एकतर अगोरच त्यांना निलंबित करावयास नको होते. महासभेत सर्व सदस्य जमिनीवर बसले आहेत. त्यांना उत्तर मिळाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>महापौर महोदया, आयुक्त साहेब, सभागृहात हे जे वातावरण आहे हे शहराच्यादृष्टीने आणि सभागृहाच्यादृष्टीने बरोबर नाही. प्रशासन आणि शासन हे दोन्ही बरोबर चालले पाहिजे. परंतु याठिकाणी जे चालले आहे ते बरोबर नाही. आयुक्तांनी थातुरमातुर उत्तर दिले की, हा विषय वेगळा आहे. सर्व सदस्यांचे एकच मत आहे की, मागच्या सभेत मा. महापौरांनी पीठासीन अधिकारी म्हणुन दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली किंवा नाही? मागच्या सभेत जवळपास ३५ सदस्य समोर जमिनीवर बसले होते आणि त्या सर्वांची एकच भावना होती. अनाधिकृत बांधकामांमध्ये सहभागी असलेल्या दोन अधिका–यांवर कारवाई झाली व एका अधिका–यावर का नाही? त्याच्यावर कारवाई करण्यासंदर्भात तुम्ही स्वत:हुन सांगितले की, महापौरांनी आदेश दिले तर मी करु शकेल. मात्र महापौरांनी आदेश दिल्यानंतर सुध्दा कारवाई होवु शकलेली नाही. त्यामुळे या महासभेत चर्चा करुन फायदा काय? फलनिष्पत्ती काय? आणि ज्या पध्दतीने आपले प्रशासन चालले आहे ते पाहता एवढया सर्व नगरसेवकांचा तो अपमान आहे. उदया एखादया कुठल्याही बाबतीत पदाधिकारी तुमचा अपमान करणार, प्रशासनाचा अपमान करणार तर ही महापालिका चालविणे मुश्किल होईल. सदस्यांचा अपमान करु नका. दोन वेळा ते जमिनिवर बसले आहे. महापौर महोदया, उप–महापौरजी, आपण सुध्दा यापैकीच एक आहात, ७६ पैकीच एक आहात. यापुर्वी तुम्ही इकडे होतात, तुमच्या जागी तेथे दुसरे कुणी होते. उदया पुन्हा तीच वेळ येणार आहे. यासाठी या सभागृहाची भावना तुम्ही लक्षात घ्या. तटस्थपणे, त्रयस्थपणे काठावर उभे राहुन तुम्हांला चालणार नाही. तुम्ही आदेश दिलेले आहेत, परंतु त्याची अंमलबजावणी प्रशासन करु शकत नाही. याचा अर्थ असा होतो की, तुम्ही दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची क्षमता आपल्यामध्ये नाही. आणि हा संदेश संपुर्ण उल्हासनगरला जातो. हे बरोबर नाही. एक अधिकारी कोण आहे? का करु शकत नाही तुम्ही त्याचे निलंबन? एका अधिका–यासाठी तुम्ही संपुर्ण सभागृहास वेठीस धरतात? त्या अधिका–यावर अनाधिकृत बांधकामाला पाठींबा दिल्याचा आरोप आहे. चौकशी करा तोपर्यंत सभागृहाची जी मागणी आहे ती तुम्ही पुर्ण करु शकत नाहीत? अप्रत्यक्षरित्या तुम्ही त्याला पाठींवा देत आहेत. वारंवार उप–आयुक्त, तत्कालीन उप–आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांनी आदेश दिलेले आहेत. असे असतांना सुध्दा काय सभागृहाची मागणी काय होती? काय, काय मोठा फरक पडला असता त्यामध्ये. तुमच्या चौकशीमध्ये जर निष्पन्न झाले असते की, त्यांचा दोष नाही. तर तुम्ही त्यांना परत कामावर घेवुं शकता ही साधी सरळ मागणी होती. ती सुध्दा तुम्ही पुर्ण करु शकत नाहीत? तुमचा एक कल्याण एक तर्फी कारभार चाललेला आहे. आणि हा संपुर्ण उल्हासनगरच्या दृष्टीने चुकीचा आहे. आणि वैयक्तीकपणे तुमचा सुध्दा आयुक्त साहेब, संपुर्ण सभागृह हे तुमच्याबरोबर असले पाहिजे. तर आणि तरच तुम्ही या प्रशासनाचा कारभार येथे करु शकता, संपुर्ण सभागृह तुमच्या विरोधात असतांना काही ठराविक लोक सांगत असतील आणि म्हणुन तुम्ही जर करत नसाल तर हे चुकीचे आहे. याठिकाणी महापौर, उप–महापौरांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे हे तुमचे काम होते. पाहिजे तर त्यानंतर तुम्ही चौकशी करा. नाहीतर सभागृह आणि सभा चालुन उपयोग काय? बजेटमध्ये आम्ही काय करणार आहोत? त्याची अंमलबजावणी तुम्ही करुच शकत नाहीत. आणि ते सर्व आरोप महापौर, उप–महापौर आणि आमचे सर्व सदस्य करतील. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची क्षमता तुमच्यामध्ये व प्रशासनामध्ये नाही. कशासाठी करायचे? ओरडुन ओरडुन घसा कोरडा करायचा कशासाठी? यासाठीच? हे जे सदस्य जमिनीवर बसले आहेत त्याचे तुम्हांला काही नाही? निर्णय दया, नाहीतर आजची सभा ही येथेच संपवु या. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत सभा घेण्याचा अर्थच काय? असे मला वाटते.

यावेळी काही सदस्य ''आयुक्त हाय–हाय'' असा आवाज देत होते.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, त्यादिवशी जी सभा झाली, त्या सभेमध्ये मी म्हटले होते की, महापौर जे निर्देश देतील ते निर्देश बंधनकारक असतील. आयुक्तासह बंधनकारक असतील, मी असे कोठेही म्हटलेले नाही की आयुक्तास निदेश बंधनकारक नाही. फक्त प्रश्न कार्यवाहीचा होता. कार्यवाहीसाठी ते रेकॉर्डवर घ्या. मी सांगतो, सन्माननिय राज्य मंत्री नगरविकास विभाग यांच्या खाजगी सचिवांचा मला असा आदेश आला आहे की, ....................

<u>काही सदस्य :–</u>काय आदेश आला आहे?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>बोलु दयाल काय?

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>त्यांना बोलु दया. ते काय बोलत आहेत. ते ऐकुन घ्या.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय राज्य मंत्री नगरविकास विभाग यांच्या खाजगी सचिवांचा मला आदेश आहे, आदेश आहे म्हणजेच सन्माननिय राज्य मंत्री महोदयांचा आदेश आहे. सदर विषयाचा अहवाल आमच्याकडे पाठवा, तोपर्यंत कार्यवाही करु नका. अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाकडुन ज्या काही मार्गदर्शक सूचना येतील, निर्देश येतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. हे रेकॉर्डवर घ्या. अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>उप—महापौर महोदया, आपणांस मी विनंती करतो की, कृपया तुम्ही खाली या. तुम्ही आमच्या लोकांबरोबर खाली बसा, बसा खाली. उप—महापौर साहेब, या.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u>आपणांस कायदयाचे ज्ञान असेल, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम आपणाकडे आहे काय? त्याचे कलम ५६ काढा. व ते आयुक्तांना वाचण्यास सांगा. त्यानंतर आयुक्त जे आदेश देतील तो आम्हांस मंजुर असेल. त्या कलमामध्ये काय लिहिले आहे ते कृपया वाचुन दाखविले जावे. काय लिहिले आहे त्यामध्ये?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी, माझी अशी तुम्हांला विनंती आहे की, जोपर्यंत याचा निकाल लागत नाही तोपर्यंत सभा स्थगित करुन टाका.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>माझ्या प्रश्नाचे उत्तर का दिले जात नाही? श्री. रमेश चव्हाण आपणांस माझी विनंती आहे की, मी बोलत असतांना मध्येच आपण बोलु नका.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>अहो तुम्ही माझ्यामध्ये बोलत आहात की मी तुमच्यामध्ये बोलत आहे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>व्यक्तीगत पातळीवर येवू नका, व्यक्तीगत पातळीवर येवू नका, मी तुम्हांला सांगतो व्यक्तीगत पातळीवर येवू नका, आणि व्यासपीठाकडे बघुन बोला. व्यक्तीगत पातळीवर येवून माझ्याशी बोलु नका, व्यक्तीशा घेवू नका, व्यक्तीशा: घ्याल तर सगळी चरबी निघुन जाईल.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>दादागीरीने बोलु नका.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>व्यक्तीगत का घेत आहात? व्यक्तीशा का घेत आहात?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>अंगावर का धावुन येत आहात?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>लोकशाहीमध्ये दादागिरी करत आहेत. सभागृहात त्यांनी मला धमकी दिली. आहे

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>माझे नाव का घेतले? मी त्यांच्याशी बोलत आहे, तुम्ही माझ्याशी का बोलत आहात? आणि अंगावर का येता? व्यक्तीशा: आमच्या अंगावर याल तर आम्ही चरबी काढु.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>तुम्हांला हेच पाहीजे काय? मागच्या इतिहासात असा प्रकार कधी झालेला नाही.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>मला अनुमती मिळाली पाहिजे, श्री. महाराज यांनी जो शब्द..........

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मला महासभेत धमकी देण्यात आलेली आहे.

**यावेळी श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्री. सुरेश जाधव यांच्यात आपसामध्ये जोरदार बाचाबाची झाली. कोण नेमके काय बोलत आहे हे एकत्रित आवाजामुळे समजून येत नव्हते.**

**सभागृहात सदस्यांच्या टेबलावर पिण्यासाठी ठेवलेल्या पाण्याच्या बिस्लरी बाटल्यापैकी काही सदस्यांच्या टेबलावरील एक एक या प्रमाणे तीन चार बाटल्या सदस्य श्री सुरेश जाधव यांनी उचळून सभागृहात वेगवेगळया दिशांना फेकल्या त्यापैकी एक बाटली व्यासपीठाच्या दिशेने गेली.**

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर जोरात  बोलत होते.  त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, ज्याप्रकारे सभागृहात आता वातावरण आहे, ते पाहता आपणांस माझे निवेदन आहे की, सभा स्थगित केली जावी.  अशा वातावरणात सभा चालविली जावु शकणार नाही.  यासाठी कृपया सभा स्थगित केली जावी.

सदस्या श्रीमती मालती करोतिया :—महानगरपालिका श्री. भदाणेंवर चालली आहे काय?

महापालिका सचिव ::—कृपया लक्ष दया ही सभा पुढील सभा सूचना देईपर्यंत स्थगित केली जात आहे. कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.  अर्थसंकल्पाविषयीची सभेचे काय करायचे? ती ४.०० वाजेची सभा आहे.  आता ४.०० वाजुन गेले आहेत.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब, व सचिव साहेब, जनगणमन म्हटले जावे.  आपण सभा स्थगित केली आहात.  काय निर्णय घेतला आहे तो सांगा ना?  आपण म्हटले सभा स्थगित करत आहोत.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—सभा स्थगित करण्यात आली आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—तर मग जनगणमन म्हटले जावे.

सदस्य श्री. जीवन इदनानीः—दुसरी सभा सलगपणे सुरु करत आहोत.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—सचिव साहेब, दुसरी सभा सुरु करा.

महापालिका सचिव :—दोन्ही सभा स्थगित करायच्या आहेत की एकच सभा स्थगित करायची आहे?  या सभेबरोबर अर्थसंकल्पीय सभा सुध्दा स्थगित करायची आहे काय?

सदस्य श्री. जीवन इदनानी :—आता पहिली सभा स्थगित करण्याबाबतचा तर निर्णय झालेला आहे.  दुस—या सभेचे काय करायचे?

महापालिका सचिव :—अर्थसंकल्पावरील ४.०० वाजेची जी सभा आहे ती.?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—सचिव साहेब, प्रथम पहिली सभा समाप्त करा.  नाहीतर सभेचे कामकाज चालु देणार नाही.

महापालिका सचिव :—मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार जे करांचे दर निश्चित करायचे आहेत, ते २० फेब्रुवारी पर्यंत निश्चित झाले पाहिजे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—पहिले कलम ५६ वाचा नंतर ते कलम सुध्दा वाचु.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—सचिव साहेब, जर महासभेचाच जर अपमान होत राहिला तर अर्थसंकल्पाचे काय करायचे आहे?  जो अर्थसंकल्प आम्ही मंजुर करु त्याचाही असाच अपमान होत राहिल.  यासाठी काही आवश्यकता नाही.

महापालिका सचिव :—दोन्ही सभा स्थगित करायच्या आहेत काय?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आम्हांला सभा स्थगित करायची नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—आम्हांला सभा स्थगित करायची नाही, आम्हांला सभा चालवायची आहे, आपणांस जे करायचे आहे ते करा.

<u>**सदस्य श्री. किशोर जग्यासी :–**</u>सभा चालविण्यास आमची काही हरकत नाही. आपण अधिनियमाचे कलम ५६ वाचा त्यावर आयुक्तांनी उत्तर दयावे. त्यानंतर पाहिजे तर सभा चालवा. कलम ५६ वाचा ते आपण का वाचत नाहीत?

<u>**महापालिका सचिव :–**</u>मा. महापौरांकडुन सूचना आहे की, पहिली सभा स्थगित करण्यासाठी जवळ जवळ सर्व सदस्यांची सहमती आहे. व दुसरी जी सभा आहे अर्थसंकल्पाची त्याबाबतीत २० फेब्रुवारीपर्यंत करांचे दर निश्चित झाले पाहिजे. त्यासाठी ही सभा चालवायची आहे कि नाही याचा आपण निर्णय घ्यायचा आहे

<u>**सदस्य श्री. किशोर जग्यासी :–**</u>सचिव साहेब, ही सभा स्थगित झाली, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ ची मी आपणांस विचारणा केली होती, ते वाचुन आपण वाचुन दाखवत आहात की नाही त्याचे आपण उत्तर देत नाहीत. उत्तर देत आहात की नाहीत? त्यानंतरच आपण सभेचे कामकाज चालवा. आपण त्याअगोदर याचे उत्तर तर दया. व दुसरी एक गोष्ट आपणांस सांगु इच्छितो, कायदा फक्त राष्ट्रपती बदलु शकतात. दुसरा कुणीही कायदा बदलु शकत नाही. मग तो राज्यमंत्री असो कि मुख्यमंत्री असो. एखादयाला सुख देण्यासंदर्भात फक्त राष्ट्रपतींना अधिकार आहे. याचीही मी आपणांस माहिती देतो. यासाठी मी पुन्हा सांगतो आपण कलम ५६ वाचा.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती संगिता कंडारे, श्री. नरेंद्र राजानी, श्रीमती सुजाता रिजवानी, श्री. संजय बठिजा, श्री. अनिल विदयार्थी, श्री. रविंद्र बागुल यांनी सभागृहात प्रवेश केला..

<u>**सदस्य श्री. जीवन इदनानी :–**</u>सचिव साहेब, पहिली सभा तर स्थगित झाली ना?

<u>**महापौर :–**</u> पहिली जी सभा आहे ती पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यात आली आहे.

यावेळी सदस्या श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, श्री. मोहन रामरख्यानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

---

सुचकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक २०/२/२०१० रोजीच्या सभेचे कामकाज सर्व सदस्यांच्या संमतीने पुढील सचूना देईपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ७४ अ</u> <u>दिनांक : २०/२/२०१०</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/२/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभचे कामकाज पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.३८ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १०/३/१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १०/३/२०१० रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

## वि—११—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार दिनांक २०/२/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित केल्याने ती मंगळवार दिनांक १०/३/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४० | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४१ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४२ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४३ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्रीमती निर्मले विद्या विजय | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५० | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २२ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५७ | श्री. मोहन साधवाणी |
| २४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २५ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २६ | श्री. लाल पंजाबी | ६० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २७ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६१ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६२ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २९ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३० | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६५ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६६ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६७ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३४ | श्री.एडके गणपत गोविंद | ६८ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६९ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३६ | श्री. कुमार आयलानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या  अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, २. श्रीमती सुजाता रमेश रिझवानी, ३. श्री. राजू जग्यासी, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ६. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ७. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ८. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, ९. श्री. प्रशांत किसनराव धांडे, १०. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), ११. श्री. पाटील प्रधान धर्मा, १२.  श्रीमती शकुंतला पाटील

खालील अधिकारी सभेस हजर होते.
१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. विजयकुमार मसाळ, उप–आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
८. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१०.श्री. एस.के.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११.श्री. अली, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१२.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
१३.श्री. चिमनकारे,  वाहन विभाग प्रमुख
१४.श्री. ए.एन. म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६.श्री. बाजीराव जाधव, प्र. प्रभाग अधिकारी
१७.श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक, साप्रवि
१८.श्री. जनार्दन देवकर, व. लिपीक, आरोग्य

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती नर्गिस खान

वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**सन्माननिय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, श्री. भाऊराव बारकु सुर्यवंशी हा आमच्या रिपब्लीकन पक्षाचा कार्यकर्ता हे २६/२/२०१० रोजी निधन पावले आहेत.  त्याला श्रध्दांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे मौन धारण करण्यात यावे.

**महापालिका सचिव :–**कृपया श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :–श्री. बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :–श्री. जे.के. ढोके

**शोक प्रस्ताव**

श्री. भाऊराव बारकु सुर्यवंशी, राहणार इंदिरा नगर, उल्हासनगर–१ या आरपीआय पक्षाच्या कार्यकर्त्याचे दिनांक २६/२/२०१० रोजी निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ७४ ब                                                    दिनांक:—१०/३/२०१०

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. भाऊराव बारकु सुर्यवंशी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १:— सफाई कामगारांना वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती देणे.**

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :— सफाई कामगारांना वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती देणे.**

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार यांनी वयोमानानुसार तसेच शारीरीक आजारपणामुळे त्यांच्याकडुन सफाई काम होत नसल्यामुळे " वैद्यकीय सेवा निवृत्ती" मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र. | सफाई कर्मचा—यांचे नाव | अर्हतकारी सेवा | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. लख्मीचंद ठाना | १९ वर्षापेक्षा जास्त | ११/१२/२००९ |
| २ | श्री. अशोक दयाराम | १० वर्षापेक्षा जास्त | २०/१०/२००९ |
| ३ | श्रीमती आशा सुरेश भालेराव | १३ वर्षापेक्षा जास्त | १५/०९/२००९ |
| ४ | श्रीमती सुमन संतोष सोनावणे | १४ वर्षापेक्षा जास्त | ०६/०१/२०१० |

त्या अनुषंगाने संबंधित कर्मचारी शारीरीक दृष्टया सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबतचे मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचारी यांनी मा. जिल्हा, शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रुग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका—याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रु. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहित असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी म्हणुन सक्षम आहे.

तरी वरील सफाई कामगार यांना वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र: ७५ दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी.मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या ४ सफाई कामगारांची **वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती** मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २:—** श्री. राधाकृष्ण भिवा साठे सफाई कामगार यांना **वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती** देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २** :— श्री. राधाकृष्ण भिवा साठे सफाई कामगार यांना **वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती** देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार यांनी वयोमानानुसार तसेच शारीरीक आजारपणामुळे त्यांच्याकडुन सफाई काम होत नसल्यामुळे '' वैद्यकीय सेवा निवृत्ती'' मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र. | सफाई कर्मचा—यांचे नाव | अर्हतकारी सेवा | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. राधाकृष्ण भिवा साठे | १२ वर्षापेक्षा जास्त | ०२/०२/२०१० |

त्या अनुषंगाने संबंधित कर्मचारी शारीरीक दृष्टया सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबतचे मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचारी यांनी मा. जिल्हा, शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रुग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका—याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रु. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहित असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी म्हणुन सक्षम आहे.

तरी वरील सफाई कामगार यांना वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ७६ <u>दिनांक:—१०/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. राधाकृष्ण भिवा साठे या सफाई कामगाराची **वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती** मान्य करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३** :— श्री. रामा के. गोडा, शिपाई सध्या कार्यरत कर विभाग यांना **स्वेच्छा निवृत्ती** देणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u>यांच्याबाबतीत सूचना आली आहे की, त्यांनी आपली स्वेच्छा निविृत्तीची नोटिस मागे घेतली आहे. त्याबाबतीत प्रशासनाकडुन पत्र आलेले आहे की, हा जो विषय आहे तो सभेच्या कार्यसूचीवरुन वगळला जावा. तसेच जो कर्मचारी आहे तो स्वेच्छा निवृत्त होवू इच्छित नाही. यासाठी यापुर्वी दिलेली सूचना मागे घेत आहे. व हा विषय महासभेच्या विषयपत्रिकेवरुन वगळला पाहिजे अशी त्यांची विनंती आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**जो प्रस्ताव प्रशासनाने पाठविलेला आहे, तर काय तो प्रशासन मागे घेवु शकते काय? आणि दुसरे असे की, त्यांनी जो स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज केला आहे तो परत मागवुन घेवु शकतात काय?

**श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त):—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आणि सर्व सन्माननिय सदस्य, …………

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**लाईट नसल्यामुळे सभेचे कामकाज स्थगित केले जावे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**सभेचे कामकाज स्थगित करा. श्री.बी.बी. मोरे साहेबांना उकडत आहे.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**जोपर्यंत लाईट येत नाही तोपर्यंत सभा स्थगित करण्यात यावी.

**महापौर :—**याबाबतीत कुणास काही हरकत आहे का? अर्धा तासासाठी सभेचे कामकाज स्थगित करण्यात यावे असा प्रस्ताव आहे. ४.१५ वाजेपर्यंत सभा स्थगित केली जावी?

**काही सदस्य :—**४.३० वाजेपर्यंत सभा स्थगित करा.

**महापौर :—**लाईट आली आहे. सभेचे कामकाज सलगपणे सुरु करण्यात येत आहे.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आणि सभागृहातील सर्व सदस्य, सर्व कर्मचारी वर्ग मागच्या महिन्यात ११ आणि २० तारखेला जी सभा झालेली होती त्यासभेमध्ये श्री. भदाणे यांच्या विषयाला घेवुन बरीच चर्चा झाली. २० तारखेला काही सदस्यांच्या वागण्याने तसेच महापौरांनी आयुक्तांना जे आदेश दिले होते. त्याचे पालन न केल्यामुळे सभागृहाचा अपमान झाला असे मला वाटले होते. आणि त्याचबरोबर ३३ सदस्य जमिनीवर बसले होते. त्यांचाही अपमान झाला होता. पण मा. महापौर, उप—महापौर यांना त्याचे वाईट वाटले होते. तर ज्याप्रकारे माझ्या हातुन कृत्य झाले होते. मी बाटली हवेमध्ये भिरकावली होती. त्याबद्दल मी मा. महापौर, उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब आणि सर्व कर्मचारी वर्ग आणि सभागृहातील सर्व सदस्य यांच्याकडे मी माफी मागतो. आणि ज्याप्रमाणे महाराज भुल्लर यांनी जे वक्तृत केले होते त्याबद्दल मी चिडुन या सर्व गोष्टी केल्या होत्या त्याबद्दल मी श्री. महराज भुल्लर यांचे व श्री. रमेश चव्हाण, माझे मित्र, सदस्य यांची मी माफी मागतो. आणि भविष्यामध्ये महापौरांचा अपमान झाला नाही पाहिजे, तो झाला आहे, महापौरांचे मोठे मन आहे. त्यांनी तो अपमान ना स्विकारला आहे. परंतु माझ्यामते तो अपमान होता. सर्व सदस्यांचा अपमान होता. परत असा अपमान होता कामा नये. बस्स, एवढेच माझे म्हणणे आहे.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आपल्या महापालिका इमारतीच्या मागे जो मध्यवर्ती जकात नाका आहे, त्याचे कुंपण तोडुन एक टेम्पो दोन, तीन घरांवर पडुन त्यामध्ये एक मुलगी व दोन इसम जखमी झाले आहे. मध्यवर्ती जकात नाक्यावर ज्या गाडया येतात, त्या दोन, दोन, तीन, तीन दिवस तेथे उभ्या राहतात. ड्रायव्हर नसतांना क्लीनर वगैरे गाडया चालवितात, हा प्रकार तसाच झालेला आहे. क्लीनरच्या हातुन गाडीचा ताबा सुटलेला आहे, आणि ती एका घरावर आदळुन एक मुलगी जखमी झालेली आहे. तरी त्याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, त्यांना नुकसान भरपाई दयावी व ते कुंपण व्यवस्थीतपणे बांधुन घेण्यात यावी एवढी विनंती आहे.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**मा. महापौरजी, मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे, त्याच्याशी मी सहमत आहे. आणि वारंवार लेखी तक्रारी देवुनही त्याची दखल न घेतल्यामुळे तेथे अपघात होत असतात. आणि त्यामुळे आज तीन, चार घरे तुटली आहेत. तो टॅम्पो धडकपणे त्या घरांवर गेला आहे. आणि मोठी जिवितहानी होता होता वाचली. काही लोक रुग्णालयात दाखल आहेत. यास्तव आपणांस विनंती आहे की, त्यांच्या रुग्णालयातील त्यांच्यावरील उपचारावरील खर्चासाठी चौकशी करुन जे काही आपल्या महापालिकेला करता येईल ते करावे. धन्यवाद।

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**सन्माननिय महापौरजी, आज या ठिकाणी सन्माननिय सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांनी सांगितले की, अशा अशा पध्दतीने आपल्या महानगरपालिकेच्या बाजुलाच, ज्यांना आपण जकात वसुलीचा

ठेका दिलेला आहे आणि त्या ठेकेदाराकडुन जकात नाक्याच्या ठिकाणी योग्य ती व्यवस्था ठेवण्यात न आल्यामुळे ड्राईव्हर गाडी न चालविता क्लीनर किंवा अन्य दुसरा कुणी गाडी चालवितो तर याचा अर्थ काय? आज जर तेथे दोन चार माणसे मृत्युमुखी पडली असती तर ते बरोबर नाही. तरीपण श्री. अंकुश म्हस्के यांनी सांगितले, त्यांनी पाहीले असता दोन व्यक्ती जखमी आहेत ते रुग्णालयात दाखल आहेत, आज त्यांचे घर तुटलेले आहे. उदया माणुस मेला असता, तर मला असे म्हणायचे आहे की, या महापालिकेतर्फे ज्यांना आपण जकात वसुलीचा ठेका दिला आहे, त्यांच्यासाठी जकात नाका आपण येथे दिला आहे त्यांना बजावून सांगण्यात यावे की जर यापुढे असे झाले, आम्ही तो जकात नाका येथुन हटवुन टाकु. व आमच्या त्या मिळकतीमध्ये आम्ही कार्यालय थाटणार. आणि त्या अपघातग्रस्तांना जी काही मदत दयायची असेल, जकात ठेकेदाराला काही कमी नाही. त्याने त्यांना सर्वकाही मदत दयावी, महापालिकेने दिले तरी काही हरकत नाही. चांगली गोष्ट आहे, पण जकात ठेकेदाराने मदत दयावी असे माझे मत आहे.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, त्यांना जी काही मदत आपण देणार आहोत ती तातडीने दिली गेली पाहिजे असे मला वाटते कारण ते लोक रुग्णालयात दाखल आहे आणि त्यांच्यावर औषधोपचार सुरु आहेत व ते गरीब आहेत जर आपण मदत जाहिर केले तर बरे होईल असे मला वाटते.

<u>उप–महापौर:–</u>लवकरात लवकर मदत होईल असे मला वाटते.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>आजच्या आज सभागृहात जाहिर करायला जावा ना?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>स्वेच्छा निवृत्ती बाबत मी जो प्रश्न विचारला होता त्याचे अदयाप उत्तर दिलेले नाही. उत्तर देण्यासाठी सांगा.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>आदरणीय महापौर महोदया, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्यगण, श्री. रामा गौडा यांनी डिसेंबर महिन्यामध्ये स्वेच्छा सेवानिवृत्तीचा अर्ज दिलेला होता, त्याबद्दल तीन महिन्यात अर्ज मागे घेण्याची तरतुद आहे. अजुन प्रशासनाने त्यांना कुठलीही रक्कम अदा केलेले नाही. त्यामुळे हा प्रस्ताव सध्या प्रशासनाकडुन स्थगित ठेवण्यात आलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>त्यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीचा अर्ज कधी दिला आहे, आणि तो प्रस्ताव मागे घेण्याबाबतचा अर्ज कधी दिला आहे?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, सदरचा अर्ज प्रशासनातर्फे मागे घेण्यात येत आहे. सदर व्यक्तीने कुठलाही अर्ज दिलेला नाही. फक्त हिशोब वगैरे त्याच्याकडुन घ्यायचे राहिले होते ते पुर्ण करुनच नंतर त्याचा स्वेच्छा सेवानिवृत्तीचा विचार करता येईल.

<u>महापालिका सचिव :–</u>हा विषय कार्यसूचीवरुन वगळायचा काय?

<u>काही सदस्य :–</u>हा विषय कार्यसूचीवरुन वगळण्यात यावा.

<u>महापौर :–</u> सदरचा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्याकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ३ :–** श्री. रामा के. गोडा, शिपाई सध्या कार्यरत कर विभाग यांना **स्वेच्छा निवृत्ती** देणे.

<u>**प्रस्तावना**</u>

श्री. रामा के. गौडा हे महापालिकेत का.आ.उमपा/आस्था/१७१, दिनांक २२/४/१९८२ च्या अन्वये शिपाई या पदावर कार्यरत आहे. त्यांच्या दिनांक १७ डिसेंबर २००९ रोजीच्या अर्जावरुन तीन महिन्याची नोटिसीनुसार दि. १७/३/२०१० रोजी सदर कर्मचा–या मनासे (कुटुंब निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे कलम ६६ (१) अन्वये दि. १७/३/२०१० रोजी स्वेच्छानिवृत्ती घेता येईल. तसेच दि. १७ डिसेंबर, २००९ रोजी त्यांनी महापालिकेतील एकुण सेवा २७ वर्षे, ११ महिने १६ दिवस इतकी होते.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६६ अन्वये पोटनियम (१) अन्वये २० वर्षाच्या सेवेनंतर अन्वये २० वर्षाच्या सेवेनंतर कर्मचा—यास तीन महिन्याची नोटिस देवुन स्वेच्छानिवृत्ती घेता येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

त्याचप्रमाणे सदर कर्मचा—याचे सेवापुस्तक व वैयक्तिक संचिका तपासले असता सध्यस्थितीत त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित अगर प्रस्तावित नसल्याचे दिसून येते.

वरील वस्तुस्थिती पाहता श्री. रामा के. गौदा, शिपाई सध्या कार्यरत कर विभाग यांना महाराष्ट्र नागरी सेवा (कुटुंब निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६६ पोटनियम (१) अन्वये दिनांक १७/३/२०१० रोजी स्वेच्छानिवृत्ती घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

विशेष महासभा ठराव क्र: ७७ दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा श्री. रामा के. गोडा, शिपाई सध्या कार्यरत कर विभाग यांना स्वेच्छा निवृत्ती देण्याचा प्रस्ताव वगळण्यास मान्यता देत आहे.

कारण--
त्यांच्या स्वेच्छानिवृत्तीचा प्रस्ताव मागे घेतला आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४** :— श्री एकनाथ आंबो मांजे मजूर यांना **स्वेच्छा निवृत्ती** मान्य करणे

---

**काही सदस्य** :—पास—पास......

**महापौर** :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र.** ४ :— श्री एकनाथ आंबो मांजे मजूर यांना **स्वेच्छा निवृत्ती** मान्य करणे

प्रस्तावना

श्री. एकनाथ आंबो माजे, मजूर कार्यरत पाणी पुरवठा विभाग यांनी स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत दिनांक १७/१२/२००९ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. श्री एकनाथ आंबो मांजे, मजूर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण येथे दिनांक ६/१२/१९७४ पासून मजूर या पदावर कार्यरत होते व दिनांक १९/१२/१९९४ पासून त्यांना उल्हासनगर महापालिकेत वर्ग करण्यात आले. त्यांची एकुण सेवा ३५ वर्षापेक्षा जास्त झाली आहे. त्यांचे दिनांक १७/१२/२००९ रोजीच्या अर्जानुसार ०३ महिन्याच्या नोटिसनुसार सदर कर्मचा—यास महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६५/६६ पोट नियम (१) अन्वये दिनांक १६/३/२०१०

रोजी स्वेच्छा निवृत्ती घेता येईल. तसेच त्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रलंबित व प्रस्तावित नाही.
वरील वस्तुस्थिती पाहता श्री. एकनाथ आंबो मांजे, मजूर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६५/६६ पोट नियम (१) अन्वये दिनांक १६/३/२०१० रोजी स्वेच्छा निवृत्ती घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

विशेष महासभा ठराव क्र: ७८ दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री एकनाथ आंबो मांजे मजूर यांना दिनांक १६/३/२०१० पासून **स्वेच्छा निवृत्ती** देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५** :—दोन सफाई कामगारांना **स्वेच्छा सेवानिवृत्ती** मान्य करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ५** :— दोन सफाई कामगारांना **स्वेच्छा सेवानिवृत्ती** मान्य करणे.

प्रस्तावना

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर कर्मचा—यास ३ महिन्यांची नोटिस देवून स्वेच्छा निवृत्ती घेता येते. तसेच नियम ७१ अन्वये रुग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षाच्या सेवेनंतर व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षाच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ‘‘नियुक्ती प्राधिकारी‘‘ म्हणुन सक्षम आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा–यांचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. किरण रिशपाल | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/३/२०१० |
| २ | श्री. वासु हरिसिंग | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/३/२०१० |

तरी वरील सफाई कामगार यांना ''स्वेच्छा सेवा निवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**विशेष महासभा ठराव क्र:** ७९ दिनांक:–१०/३/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :– श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्रीमती किरण रिशपाल व श्री. वासु हरीसिंग या कामगारांना दिनांक ३१/३/२०१० पासून **स्वेच्छा सेवानिवृत्ती** देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६** :– श्री. श्रीचंद चंपा, सफाई कामगार यांचे **वारसास वारसा पध्दतीने** सेवा नियुक्ती देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६** :– श्री. श्रीचंद चंपा, सफाई कामगार यांचे **वारसास वारसा पध्दतीने** सेवा नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग परिपत्रक क्र. संकिर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त सफाई मुकादम यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा–याचे नाव | सेवानिवृत्ती/मृत्यु दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा–यांशी असलेले नाते संबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीचंद चंपा | वयोमानानुसार सेवानिवृत्त दि. ३१/१२/२००९ | श्रीमती संगिता दयानंद बेहनवाल | सुन |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका–याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रु. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहित असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी म्हणुन सक्षम आहे.

तरी शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, स्वेच्छा, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्काने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र: ८० दिनांक:–१०/३/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. सुंदर मंगतानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्रीमती संगिता दयानंद बेहनवाल यांची वारस पध्दतीने सेवा निवृत्त सफाई कामगार श्री. श्रीचंद चंपा यांच्या जागी सफाई कामगार या पदावर नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७** :– दिनांक २१/१/१९९७ पासून अनाधिकृतपणे गैरहजर असणा-या कु. कविता धनजी चव्हाण, सफाई कामगार यांची दिर्घकालीन असाधारण रजा मंजुर करणे व कामावर घेणे.

---

सदस्य श्री. राजेश वदारिया :–कोणत्या तरतुदीनुसार आपण पुर्वलक्षी प्रभावाने रजा कशी मंजुर करु शकता? ती कोणत्या कायदयानुसार व कलमानुसार ते जरा सांगा.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–मा. महापौरजी, हीस गैरहजर राहुन १३ वर्ष झाले आहे तिचे वय काय आहे? तसेच दुसरा ८ नंबरचा विषय आहे त्यात सुध्दा त्यास १३ वर्ष झाले आहे त्याचे सुध्दा वय काय आहे? त्यांना निलंबित केले जावे. हा प्रस्ताव आलाच नाही पाहिजे. हा प्रस्ताव नाकारला जावा. तसेच तीन महिन्यानंतर कुणी हजर होत असेल तर त्यास घेतलेच जावु नये.

महापालिका सचिव :–काय करायचे?

सदस्य श्री. राजेश वदारिया :–पहिले प्रशासनाने स्पष्टपणे सांगु दया की, १३ वर्ष ही सफाई कामगार गैरहजर असतांना त्यांनी काय कारवाई केली? तिने अर्ज करावा यासाठी ते वाट पाहत राहिले काय?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा विषय सर्वसंमतीने नाकारला जात असतांना यावर चर्चा करण्यास काही हरकत नाही.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**नाकारत आहात परंतु कशामुळे नाकारत आहात ते तर माहित पडले पाहिजे काय?

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**सन्माननिय महापौर महोदया, सदरचे कर्मचारी गैरहजर आहेत. तिच्यावर कारवाई करण्यासाठी रजा मंजुर किंवा नामंजुर करण्यासाठी प्रस्ताव महासभेपुढे माहितीसाठी ठेवण्यात येईल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**तर मग आमचा प्रस्ताव असा आहे, त्यांच्यावरील बडतर्फ करण्याची कारवाई करुन एक महिन्याच्या आत त्यांचा बडतर्फीचा प्रस्ताव आमच्यासमोर आणला पाहिजे.

**महापालिका सचिव :—**काय करायचे? यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करायची आहे ना? यांच्यावर चौकशी बसवावी लागेल. जर त्यात तो दोषी आढळला तर त्याला कामावरुन काढता येईल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**ठिक आहे, त्यांच्याकडुन तसा प्रस्ताव घ्या. त्याची चौकशी पुर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत आमच्याकडे तसा प्रस्ताव आणला जावा.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे, सर्वसंमतीने?

**काही सदस्य :—**हा विषय कार्यसूचीवरुन वगळण्यात यावा.

**महापौर :—** सदरचा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्याकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७ :—** दिनांक २१/१/१९९७ पासून अनाधिकृतपणे गैरहजर असणा-या कु. कविता धनजी चव्हाण, सफाई कामगार यांची दिर्घकालीन असाधारण रजा मंजुर करणे व कामावर घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते कि, कु. कविता धनजी चव्हाण हयाची दिनांक: ०२/०६/१९९२ रोजी महापालिकेत सफाई कामगार पदावर नेमणुक करण्यात आली आहे. त्यानतंर त्या दिनांक: १९/०९/१९९७ पासुन सतत अनाधिकृतरित्या कामावर गैरहजर आहेत. त्या आजारपणामुळे कामावर गैरहजर असल्याबाबत स्वच्छता निरिक्षक क.न. ०४ याचे अहवालानुसार त्याना कार्यालयीन पत्र क्र उमपा/आवि/आस्था/१२७, दि: १२/०७/१९९९ नुसार मा. शल्य चिकित्सक, ठाणे याचेकडे वैद्यकिय तपासणीसाठी पाठविण्यात आले होते, परंतु त्यानी त्याचेकडिल वैद्यकिय प्रमाणपत्र याकार्यालयास सादर करू शकल्या नाहीत.

त्यानंतर दि. ०९/०१/२००४ चे विनंतीपत्रानुसार त्यानी कामावर हजर करून घेणेबाबत विनंती केली होती. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८९ नियम प्रकरण ०३ मधिल नियम १६ अन्वये अखंडीत रजेसाठी कमाल मर्यादा ५ वर्षापर्यत आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८९ नियम ६३ (६) नुसार नियुक्ती प्राधिकारी मंजुर रजे व्यतिरिक्त असलेल्या अनुउपस्थितीच्या कालावधीचे भुतलक्ष्यी प्रभावाने असाधारण रजेत परिवर्तन करू शकेल अशी तरतुद आहे, परंतु प्रस्तुत प्रकरणी रजेचा कालावधी ०६ वर्ष ०४ महिने इतका झालेला होता कामावर हजर करून घेणबाबत तिचे विनंती पत्रानुसार व कामगार संघटनेच्या मागणीनुसार शासनाकडे, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई याचे कडे प्रथम दि: १५/०६/२००५ रोजी नतर दि. १८/०८/२००८ व दि. २/०२/२००९ रोजीचे पत्रांन्वये सदर कर्मचारीयाना रजु करून घेता येईल किंवा कसे याबाबत महापालिकेस मार्गदर्शन करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार शासनाकडील नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई—३२ याचे दि: ०१/०६/२००९ चे पत्रांन्वये सदर कर्मचारी याना कामावर रूजु कस्न घेण्याबाबतचा निर्णय आपण आपल्या स्तरावर घ्यावा असे कळविले आहे. तिचे दि. ०१/०४/२००९ चे विनंती पत्रानुसार कार्यालयीन पत्र दि. १४/७/२००९ नसुार मा. शल्य चिकित्सक, ठाणे याचेकडे वैद्यकिय तापसणीसाठी पाठविण्यात आले होते

त्यानुसार कु. कवित धनजी चव्हाण यानी दि. १८/११/२००९ रोजी मा. शल्य चिकित्सक, ठाणे यांचे कडिल कामास समर्थ असाल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

१) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८९ नियम मधील नियम ४८(२) अन्वये देय/अनुज्ञेय मंजुर केलेल्या रजेंतरची कर्मचा—यांची अनुपस्थिती ही हेतुपुरस्पर कामावर अनुपस्थिती समजुन शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र आहे.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ नियम १९ अन्वये सक्षम प्राधिकारी (नियुक्ती प्राधिकारी) कर्मचा—याला गैरवर्तणुक, नादारी किंवा अकार्यक्षमता या कारणावरून शासकिस सेवेतुन काढुन टाकू शकेल अथवा सक्तीने सेवा निवृत्त करू शकेल अशी तरतुद आहे. मात्र असा आदेश काढण्यापूर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ०८ ते १५ मध्ये उल्लेखलेली कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८९ नियम मधील नियम ६३(३) नुसार मंजुर करणारा सक्षम अधिकारी रजेशिवाय असलेल्या अनुस्थितीच्या कालावधीचे स्थायी कर्मचा—याचे बाबतीत ०१ वर्ष व अस्थायी कर्मचा—याचे बाबतीत ९० दिवसांचे मर्यादित भूतलक्षी प्रभवाने असाधारण रजेत परिवर्तन करू शकेल अशी तरतुद आहे.

४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा. परिपत्रक क्र. अरजा २४८८/१०६१/सेवा—०९, दि. ०७/१/१९८९ परिपत्रकानुसार म.न.से (रजा) नियम १६ व ६३(२) नुसार शिथिल करून दिर्घकालीन असाधारण रजा मंजूर करण्यासंदर्भात परिपत्रकातील परिच्छेद ३ मध्ये पध्दत विहित केलेले आहे. त्या नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८९ नियम ४०व ४१ अन्वये संबंधीत कर्मचा—यांना रजा वाढ देण्यापूर्वी वैद्यकिय मंडळापुढे उभे करण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तसेच रजा समाप्तीनंतर अनाधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास नियम ४८ (२) नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ नियम ४८ नुसार नियुक्ती प्राधिकरी आदेशनुसार शासकिय कर्मचा—याच्या सेवेतील खंड क्षमापित करू शकेल मात्र नियम ४८ (१) (अ) नुसार असे खंड शासकिय कर्मचा—याच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे पडलेले असले पाहिजेत. तसेच ४८ (१) (क) नुसार सेवेत दोन किंवा अधिक खंड पडलेले असतील तर अशा खंडाचा एकुण कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.

मात्र नियम ४८ (२) नुसार नियम ४८ पोटनियम (१) खाली क्षमापित केलेल्या खंडाचा कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेतला जाणार नाही अशी तरतुद आहे.

उपरोक्त संदर्भ ३ वरील नियामानुसार रजेशिवाय असलेल्या अनुपस्थितीच्या कालावधीचे भुतलाक्षी प्रभावने असाधारण रजेमध्ये परिर्वतन करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिक—यास असले तरी कायम शासकिय कर्मचा—याचे बाबतीत १ वर्ष  अस्थायी कर्मचा—याचे बाबतीत ९० दिवस पर्यंतची मर्यादा आहे. सबब यापुढे उपरोक्त संदर्भ ४ वरील शासन परिपत्रकातील तरतुदी परिणामकारकपणे अंमलात आणणे आवश्यक आहेत.

प्रस्तुत प्रकरण उपरोक्त संदर्भ १ ते ५ वरील तरतुदीस अनुसरून नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्य ज्या अधिका—याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळून चारशे रूपये किंवा त्याहून अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हाणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकिय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगापलिका अधिनियम १९४९ मधील नियम कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिका म्हणजेच महासभा '' नियुक्ती प्राधिकारी'' म्हणून सक्षम आहे.

कु. कविता धनजी चव्हाण, सफाई कामगार दि. २१/०१/१९९७ पासुन सतत अनाधिकृतपणे गैरहजर आहे. त्यामुळे सदरचे शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्रान्वये दिर्घ अनुपास्थितीबाबत मा. महासभेच्या निर्णयासाठी  प्रस्तावीत करण्यात येत आहे .

<u>विशेष महासभा ठराव क्र: ८१</u> <u>दिनांक:—१०/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार दिनांक २१/१/१९९७ पासून अनाधिकृतपणे गैरहजर असणा-या कु. कविता धनजी चव्हाण, सफाई कामगार यांची दिर्घकालीन असाधारण रजा मंजुर करणे व कामावर घेण्यास मान्यता देत नाही कारण त्यांच्या विरुध्द खातेनिहाय चौकशी बसवून शिस्त भंगाची कारवाई करण्यासाठी प्रशासनास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ८ :–** दिनांक १/७/०७ पासून अनाधिकृतपणे गैरहजर असणा-या श्री. बच्चु हेमराज, सफाई कामगार, वार्ड क्र. ४६ यांची दिर्घकालीन असाधारण रजा मंजुर करणे व कामावर घेणे

---

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–**यापुढे जे कामगार तीन महिने जर कामावर आलेच नाही तर त्यांना कामावर घ्यायचेच नाही.

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८ :–** दिनांक १/७/०७ पासून अनाधिकृतपणे गैरहजर असणा-या श्री. बच्चु हेमराज, सफाई कामगार, वार्ड क्र. ४६ यांची दिर्घकालीन असाधारण रजा मंजुर करणे व कामावर घेणे

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये सादर करण्यात येते कि, श्री. बच्चु हेमराज हे, सफाई कामगार पदावर दिनांक ११/१२/१९९० पासुन कार्यरत आहेत. ते दिनांक ०१/०४/२००७ ते दिनांक ०८/०७/२००९पर्यंत कामावर सतत गैरहजर होते. त्यांनी दिनांक ०९/०७/२००९ रोजी डॉ. अनंत मोकळ, आकाश क्लिनिक, नवजीवन टॉवर, ओटी. सेक्शन, उल्हासनगर: ४२१००३ यांचे कडे क्षयरोग आजारपणाचे उपचार केल्या बाबतचे तसेच दि. ०९/०७/०९ पासून कामावर समर्थ असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करुन कामावर हजर करुन घेण्याबाबत विनंती अर्ज केला होता.

त्यानुसार त्यानां मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, ठाणे यांना कार्यालयीन पत्र क्र. उमपा/साप्रवि/आस्था/वर्ग–४/६०६/०९ दि. १५/०७/०९ अन्वये त्यांची वैद्यकिय तपासणी करून ते सफाई कामगार म्हणुन काम करणेस समर्थ आहे किंवा नाही याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र या कार्यालयास पाठविण्यात यावे असे विनंती पत्र देण्यात आले होते.

त्याप्रमाणे, श्री. बच्चु हेमराज हे मा. जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे, याचे समोर दि. १७/११/२००९ वैद्यकिय तपासणी केलेली आहे. मा जिल्हा शल्य चिकित्सक

यानी त्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र क्र C.S./Med/246/2005, दि. १७/११/२००९ अन्वये ते काम करण्यास समर्थ असण्याचे प्रमाणित केले आहे.

श्री. बच्चु हेमराज यांना कार्यालयिन आदेश दि. ०२/०६/०९ अन्वये त्याचे शैक्षणिक पात्रता व जेष्टतेनुसार मुकादम पदावर पदोन्नति देण्यात आलेली आहे.

श्री. बच्चु हेमराज, सफाई कामगार हे दि. ०१/०४/२००७ पासुन एकुण ०२ वर्ष ०६ महिने कामावर सतत गैरहजर आहेत, त्याचे सेवा पुस्तिका पडताळणी केली असता त्याची १४ अर्जित रजा व ०३ दिवस परावर्तित(वैद्यकिय) रजा शिल्लक आहे.

मा. जिल्हा शल्य चिकित्सकय, ठाणे यानी सादर केलेल्या वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८१ चे नियम ६३ अन्वये त्याचा दि. ०१/०४/०७ ते कामावर हजर होईपर्यंतचा अनुपस्थीती कालावधी हा निवृत्ती वेतन विषयक लाभ मिळण्यात करिता ग्राहय धरला जाऊ शकतो.

महाराष्ट्र नागरि सेवा नियम १९८२ चे नियम ६२ (६) नुसार नियुक्ती आधिकारी मा. महासभा यांना सदर सफाई कार्मचारी याचा दि. ०१/०७/०७ ते कामावर हजर होई पर्यंतचा अनुपस्थितीचा कालावधी असाधारण रजा(विना वेतन) मंजुर करता येईल.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकिय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगापलिका अधिनियम १९४९ मधील नियम कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिका म्हणजेच महासभा '' नियुक्ती प्राधिकारी'' म्हणून सक्षम आहे.

तरी, श्री बच्चु हेमराज, सफाई कामगार यांना कामावर हजर करून घेणे व त्यांचा दि. १/७/२००७ ते कामावर हजर होई पर्यतचा अनुपास्थीतीचा कालावधी असाधारण रजा (विना वेतन) मंजुरीस मान्यता देणेस मा. महासभेपुढे प्रसवित करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ८२ <u>दिनांक:—१०/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक १/७/०७ पासून अनाधिकृतपणे गैरहजर असणा-या श्री. बच्चु हेमराज, सफाई कामगार, वार्ड क्र. ४६ यांची दिर्घकालीन असाधारण रजा मंजुर करण्यास व कामावर घेण्यास मान्यता देत नाही कारण त्यांच्या विरुध्द खातेनिहाय चौकशी बसवून शिस्त भंगाची कारवाई करण्यासाठी प्रशासनास निर्देशित करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** रोजंदारीवरील सर्व कर्मचा-यांना त्यांचे रोजंदारीचे दिनांकापासुन मानिव वेतनवाढ परिगणना, सेवानिवृत्ती उपदान, व निवृत्ती विषयक अनुषंगिक लाभ देणे प्रयोजनार्थ महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ मध्ये अंशत: बदल करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

महापालिका सचिव :—काय पास?

सदस्य श्री. राजेश वदारिया :—कृपया हा प्रस्ताव आपण परत वाचावा.

महापालिका सचिव :— रोजंदारीवरील सर्व कर्मचा-यांना त्यांचे रोजंदारीचे दिनांकापासुन मानिव वेतनवाढ परिगणना, सेवानिवृत्ती उपदान, व निवृत्ती विषयक अनुषंगिक लाभ देणे प्रयोजनार्थ महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ मध्ये अंशत: बदल करणे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—२००७ चा ठराव काय म्हणतो? २००७ च्या ज्या ठरावात आपण बदल करु इच्छिता तो ठराव काय म्हणतो?

महापालिका सचिव :—ज्या दिवशी कर्मचा—यांची रोजंदारीवर नियुक्ती झाली आहे त्या दिवसापासून त्यांची सेवेची सलग सेवेत गणना करण्यात आलेली आहे. परंतु त्यांना पगार फरकाच्या थकबाकीची रक्कम दिली जाणार नाही.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—तर थकबाकी देणे आपणावर बंधनकारक आहे का?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, जो २००७ चा ठराव होता तो १२३ कर्मचा—यांच्या बाबतीत होता. सदरचे कर्मचारी न्यायालयीन आदेशानुसार लाभ देण्यात आला होता. तो इतर जे कर्मचारी आहेत, जवळ जवळ ७४० कर्मचारी आहेत. त्या कर्मचा—यास देण्यात यावा. सदरचा लाभ दिल्यामुळे, जर आजपर्यंत ती वाढ आहे ती देण्यापेक्षा त्यांना सेवानिवृत्तीसाठी लाभ होईल. यादृष्टीने त्यांना कुठलीही बाकी रक्कम देण्यात येवु नये. सदरची रक्कम सेवानिवृत्तीसाठी ग्राहय धरुन त्यांना सेवानिवृत्ती वेतनामध्ये लाभ देण्यात यावा, यासाठी हा प्रस्ताव आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—हे पहा, पहिला जो प्रस्ताव आहे तो १२३ कर्मचा—यांसाठीचा आहे. आता आपण प्रस्ताव आणला आहे ३०० आणि काही कर्मचा—यांसाठी तर माझे असे म्हणणे आहे की, पहिल्या प्रस्तावासारखाच आपण प्रस्ताव आणावयास पाहिजे. बाकीच्या कर्मचा—यांना आपण काय देवु शकतात आणि त्यानंतर थकबाकीचा मुद्दा येतो. त्या प्रस्तावामध्ये बदल केल्यामुळे या कर्मचा—यांना फायदा झाला नाही पाहिजे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—सन्माननिय महापौरजी आणि आयुक्त साहेब, न्यायालयाच्या आदेशानुसार ज्या कर्मचा—यांना लाभ देण्यात आलेले आहे त्यामध्ये न्यायालयाने असे काही लिहुन दिले आहे काय की १७ कर्मचा—यांनाच लाभ दया म्हणुन? दयायचा तर सर्वांनाच लाभ दया.

महापालिका सचिव :—याबाबतीत काय निर्णय घ्यायचा आहे? कृपया कुणाकडे याबाबतीत काही प्रस्ताव आहे काय?

सदस्य श्री. राजेश वदारिया :—नाही, हे पहा, पहिले तर आम्ही आपणाकडुन जे स्पष्टीकरण घेवु इच्छितो ते दया. यांचा कोणताही प्रस्ताव मंजुर नाही. त्यांना आपण मागील थकबाकी देवु इच्छिता, त्यांना मंजुरी नाही तर मग थकबाकी कशी?

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, ....................

सदस्य श्री. लाल पंजाबी :—या विषयाबाबत आमची अशी सूचना आहे की, थकबाकी न देता त्यांना फक्त पेन्शन व ग्रज्युईटीमध्ये फायदा मिळाला पाहिजे, असा आमचा प्रस्ताव आहे.

महापालिका सचिव :—तर ७५० कर्मचा—यांना लागु होईल.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—जेवढे काही रोजंदारीवर कर्मचारी होते त्या सर्वांना.

महापालिका सचिव :—जेवढे काही रोजंदारीवर कर्मचारी होते त्या ७५० कर्मचा—यांना?

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>होय.

<u>महापालिका सचिव :—</u>तर मग पुर्वीचाच ठराव लागु होईल?

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>होय तसेच.

<u>महापालिका सचिव :—</u>१२३ च्या ऐवजी ७५० कर्मचा—यांना हा निर्णय लागु होईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>पहिला जो प्रस्ताव आहे तो १२३ कर्मचा—यांसाठीच आहे. तर मग तो ७५० कर्मचा—यांना कसा लागु करु शकता?

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, आता जो ठराव केला जाईल तो समप्रमाणात लागु होईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>त्यांच्याकडे तर न्यायालयाचा आदेश आहे तसा यांच्याकडे न्यायालयाचा आदेश आहे का?

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, १२३ कर्मचा—यांकडे सुध्दा न्यायालयाचा आदेश नाही. ७५० कर्मचारी रोजंदारीवर होते. पहिले १२३ कर्मचा—यांची यादी दिली होती. आता ७५० झाले आहेत. व त्याच्याकडे न्यायालयाचा आदेश नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u> त्यासाठी वेगळा प्रस्ताव आला पाहिजे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>नाही, गोषवा—यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे, १२३ कर्मचा—यांच्या व्यतिरिक्त जेवढे काही कर्मचारी आहेत त्यांना सुध्दा लाभ मिळाला पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u>पहिल्या ठरावाच्या धर्तीवर, तसेच ना?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>त्यांना थकबाकीची रक्कम दयायची नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>थकबाकीची रक्कम दयायची नाहीच आहे ना? मागील ठरावामध्ये अशी तरतुद नाही आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>अहो, श्री. वदारियाजी, ठरावामध्येच थकबाकी देण्याबद्दल काही लिहिलेले नाही.

<u>महापौर :—</u>ठिक आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९** :— रोजंदारीवरील सर्व कर्मचा-यांना त्यांचे रोजंदारीचे दिनांकापासुन मानिव वेतनवाढ परिगणना, सेवानिवृत्ती उपदान, व निवृत्ती विषयक अनुषंगिक लाभ देणे प्रयोजनार्थ महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ मध्ये अंशतः बदल करणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. उपमहापौर श्री. विनोद ठाकुर यांचेक कडील दिनांक ५/६/२००९ रोजीचे पत्र तसेच मा. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, नगरसेवक, प्र.क्र १३ तथा गटनेता लोकभारती, उल्हासनगर महानगरपालिका व मा. श्री. अंकुश म्हस्के, नगरसेवक, प्र. क्र. १२ तथा सभापती, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिनांक २८/१०/२००९ रोजीच्या पत्रान्वये महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ या ठरावामध्ये ‘‘दिनांक १/७/२००७ पासुन वेतनातील फरक प्रत्यक्ष रोखीने प्रदान

करणे तसेच अर्जित रजा, परावर्तीत रजा व अन्य सेवा विषयक अनुषंगिक लाभ देणेबाबत'' असा अशंता बदल करणेकामी कळविण्यात आले आहे.

श्री. मनोहर रामचंदानी व इतर २९ कर्मचारी यांच्या प्रकरणामध्ये याचिका क्र. २८१५/१९९५ मध्ये मा. न्यायाधिश श्री. डी. के. देशमुख यांनी दिनांक १५/१२/२००० रोजी दिलेल्या न्याय निर्णयाच्या समान तत्वानुसार १२३ कर्मचाऱ्याना सर्व लाभ देण्यात यावे असा प्रस्ताव मा. महासभे समोर सादर करण्यात आलेला होता. तथापि, मा. महासभेने स्वत:हुन त्यात हस्तक्षेत करून जे कर्मचारी पात्र आहेत परंतु त्यांचा समावेश १२३ कर्मचाऱ्यांच्या यादीमध्ये समाविष्ठ नाही अशा रोजंदारीवरील किंवा नैमित्तक नेमणूकीवरील सर्व कर्मचाऱ्याना सदरचे लाभ देण्यात यावेत अशाप्रकारे पुढीलप्रमाणे ठराव मान्य केलेला आहे.

''ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरून सोबत जोडलेल्या यादीतील महापालिका आस्थापनेवरील १२३ कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व अंशदाने इत्यादी लाभ देण्यासाठी त्यांच्या रोजंदारीच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन सलग सेवा गणनेस त्याचप्रमाणे वेतन निश्चितीस मान्यता देत आहे.

१) अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेचा दिनांक हा मुळ रोजंदारीच्या दिनांकापासुन गणण्यात येवुन त्यानुसार थकबाकीची/फरकाची रक्कम देय असणार नाही. केवळ रोजंदारीच्या दिनांकापासुन वेतननिश्चिती व अन्य सेवा निवृत्ती विषयक अनुषंगीक लाभ देता येतील.

२) त्याचप्रमाणे अशाप्रकारचे अन्य जे कर्मचारी आहेत परंतु त्यांची नावे या यादीत आलेली नाही अशा रोजंदारीवरील किंवा नैमित्तीक नेमणूकीवरील कर्मचाऱ्यांनासुध्दा याच धर्तीवर त्यांचे प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन हे एकरूपी लाभ देता येतील.''

मा. महासभेने ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ मध्ये फेरबदल करून मंजूरी दिली त्यावेळेस एकूण लाभार्थी कर्मचाऱ्यांची संख्या माहित नव्हती आणि सर्व पात्र कर्मचाऱ्यांना वेतननिश्चिती केल्यास किती आर्थिक बोजा वाढू शकतो. या बाबतची माहिती त्यावेळेस उपलब्ध नव्हती सदरची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ रोजी मा. महासभेने मंजूर केला तेव्हा रोजंदारीवरील १२३ कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त महापालिकेमध्ये सध्या कार्यरत असलेले वर्ग–३ व वर्ग–४ मधील विविध २१ संवर्गातील सुमारे ७४० कर्मचारी पात्र ठरत आहेत.

महापालिका सेवेमध्ये 'वर्ग ३' व 'वर्ग ४' मधील २१ विविध संवर्गामध्ये, अलग–अलग व निरनिराळया वेतनश्रेणीमध्ये अंदाजीत ७४० कर्मचारी हे कमीत कमी ३ वर्ष व जास्तीत जास्त १३ किंवा त्याहुन जास्ती वर्षाच्या कालावधीसाठी रोजंदारीवर कार्यरत होते. प्रत्येक कर्मचाऱ्यांची रोजंदारीवरील सेवा त्यांचे नियुक्तीचा मुळ दिनांक म्हणून ग्राहय धरून प्रत्येक कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती केल्यानंतर व त्यानुसार सर्व कर्मचाऱ्याना लाभ दिल्यानंतर त्यांचे वेतनामध्ये किती तफावत येते व त्यामुळे वेतनावरील खर्चामध्ये किती वाढ होवु शकेल याची परिगणना करणेकामी बराच कालावधी लागू शकतो.

ढोबळ मानाने सर्व संवर्गातील व विविध वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असलेल्या अंदाजीत ७४० कर्मचाऱ्याना त्यांचे वेतन निश्चितीमुळे सरासरी ३ वार्षीक वेतनवाढी गृहीत धरल्यास ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणीप्रमाणे दरमहा रू. ८ लाख असा होईल आणि सरासरी ५ वार्षीक वेतनवाढी गृहीत धरल्यास ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणीप्रमाणे दरमहा रू. वेतनावरील खर्च अंदाजे १२ लाख ते १४ लाख पर्यंत होवु शकेल.

तसेच मा. महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ अन्वये ठरावासोबत जोडलेल्या रोजंदारीवरील १२३ कर्मचाऱ्यान व्यतिरिक्त एकूण किती कर्मचारी लाभ दायक होतील हे निश्चित करणे. २) महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९ जून, २००७ अन्वये सद्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रोजंदारीच्या नियुक्ती दिनांकापासून वेतन/निवृत्तीवेतन निश्चिती करण्यात येणार असले तरी नियुक्तीच्या दिनांकापासून फरक देण्यात येणार नसल्याने तो प्रत्यक्ष अंमल कोणत्या महिन्याच्या वेतनापासून लागू करावयाचा आहे इत्यादी बाबी निश्चित करून त्यास मा. महासभेची मंजूरी घेणे आवश्यक असल्याचे लेखा परिक्षण विभागाचे अभिप्राय आहे.

सदर ठरावात अर्जित रजा, परावर्तीत रजा व वेतनातील फरकाची रक्कम रोखीने देणेबाबतचा कालावधी याबाबतचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नसल्याने ठरावाची अंमलबजावणी करणेकामी संदिग्धता निर्मण झालेली आहे.

तरी महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ या ठरावामध्ये ''रोजंदारीवरील सर्व कर्मचा–यांना त्यांचे रोजंदारीच्या दिनांकापासुन वेतन फरकाची थकबाकी रक्कम अदा न करता केवळ रोजंदारीच्या दिनांकापासुन मानीव वेतनवाढ देवुन दिनांक १/७/२००७ पासुन प्रत्यक्ष रोखीने प्रदान करणेस तसेच अर्जित रजा, परावर्तीत रजा व निवृत्ती विषयक अन्य सेवा विषयक अनुषंगिक लाभ देण्यात यावेत'' असा अशंता बदल केल्यास कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरमहा होणाऱ्या एकूण खर्चामध्ये सुमारे १२ ते १५ लाख रूपये अतिरिक्त वाढ होईल. व त्यामुळे आस्थापनेवरील एकूण वार्षीक खर्चामध्ये सुमारे रू. १.५० कोटी पर्यंत वाढ होईल. सद्यस्थितीत महापालिकेच्या आर्थीक स्थिती विचारात घेता आस्थापनेवरील वाढीव खर्चाचा बोजा असाह्य होणार आहे. सबब ''रोजंदारीवरील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांचे रोजंदारीच्या दिनांकापासुन मानिव वेतनवाढीची परिगणना करून त्यांचे वेतन निश्चित करण्यात यावे. व कर्मचाऱ्यांचे सेवा निवृत्तीचे वेळेस सदरचे वेतन अंतिम वेतन म्हणून गणण्यात यावे. तसेच एकूण सेवेचा कालावधी, सेवानिवृत्ती उपदान इत्यादी सेवानिवृत्ती विषयक अनुषंगीक लाभ

देण्यात यावेत.'' असा प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी मा. महासभा पटलावर ठेवण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ८३ <u>दिनांक:–१०/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता वर्ग–३ व वर्ग–४ मधील विविध २१ संवर्गातील सुमारे ७४० कर्मचा–यांना त्यांच्या रोजंदारीच्या दिनांकापासून सेवानिवृत्ती उपदान व निवृत्ती विषयक अनुषंगिक लाभ देणे प्रयोजनार्थ महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ च्या धर्तीवर वेतननिश्चिती व अनुषंगिक लाभ देणे मान्य करीत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १०** :–१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २२/२/२०१० पासून पूढील **सहा महिन्याकरीता मुदतवाढ** देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

यावेळी सदस्या श्रीमती चंद्रा टेकचंदानी, श्रीमती लिलाबाई आशान व श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १०** :– १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २२/२/२०१० पासून पूढील **सहा महिन्याकरीता मुदतवाढ** देणे.

<u>प्रस्तावना</u>

महासभा ठराव क्र. ४०, दिनांक २०/८/२००९ अन्वये पाले ते गायकवाड पाडा दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा अंतर्गत जलवाहिनीचे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने बांधित होणारे १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे अशा ४ जणांना पाणी पुरवठा विभागात मजुर/वॉलमन या पदी कार्यरत कर्मचारी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी पदावर (वर्ग-४) मान्यता दिलेली आहे.
त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ रोजीच्या आदेशानुसार दिनांक २०/८/२००९ रोजी सेवेत खंड देवुन दिनांक २१/८/२००९ पासून पुढील ६ महिन्यांकरीता मुदतवाढ महासभा

ठराव क्र. ४०, दिनांक २०/८/२००९ नुसार देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दिनांक २०/२/२०१० रोजी संपृष्टात आलेली आहे.
१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांची सेवा दिनांक २०/२/२०१० रोजी संपृष्टात आल्याने दिनांक २१/२/२०१० रोजी रविवार निमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने ०१ दिवसाचा खंड देवुन दिनांक २२/२/२०१० पासून पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देणेकामीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) नुसार, नियुक्तीचे नवीकरणासाठी नियुक्ती प्राधिकारी तथा सक्षम प्राधिकारी म्हणुन मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र: ८४ — दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :—श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २२/२/२०१० पासून पूढील **सहा महिन्याकरीता मुदतवाढ** देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :—** उल्हासनगर शहराची सुधारीत विकास योजना आराखडयाचा नव्याने इरादा जाहिर करणे.

---

सदस्य श्री. लालबिहारी यादव :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो १९७४ चा विकास आराखडा आता सध्या चालु आहे. आता हा नविन विकास आराखडा किती वर्षामध्ये नविन विकास आराखडा तयार होईल? याची महासभेला माहिती मिळाली पाहिजे, लवकरात लवकर विकास आराखडा तयार झाला पाहिजे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मा. महापौर महोदया, सदरचा आराखडा आपण सहा महिन्यामध्ये तयार करणार आहोत.

महापालिका सचिव :—ठिक आहे?

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११ :—**उल्हासनगर शहराची सुधारीत विकास योजना आराखडयाचा नव्याने इरादा जाहिर करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहराची मुळ विकास योजना दि. २०.०५.१९७४ नुसार मंजूर झालेली असुन दि. ०१.०७.१९७४ पासुन अंमलात आलेली आहे.

शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस १२०२/८०६/सीआर—८३/२००२/ओडी—१२ दि. २६.१०.२००४ नुसार (१) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने सुधारीत प्रारुप विकास योजना आराखडा तयार करण्याचा इरादा दि. १८.०३.०५ च्या ठरावान्वये जाहिर केला असुन तशी अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. ०७.०४.०५ रोजी प्रसिध्द झालेली आहे. उक्त अधिनियमाच्या कलमाखाली नागरीकांच्या हरकती व सूचना मागविण्यासाठी नोटीस दि. ०९.०६.०५ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेली आहे व त्याप्रमाणे हरकती व सूचना प्राप्त झाल्या होत्या.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) नुसार नियोजन प्राधिकरण, कलम २३ अन्वये नोटीस प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून २ वर्षापेक्षा अधिक नसेल अशा मुदतीत विकास योजना मसुदा अंमलात आणणे बंधनकारक आहे. तथापि, दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी लागत असल्यास कालावधी वाढविणेकरीता शासनाकडून परवानगी घेणे बंधनकारक आहे. प्रकरणी ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने मुदत वाढविणेची कोणतीही कार्यवाही अद्याप करण्यात आलेली नाही. करीता उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ प्रमाणे नव्याने इरादा जाहिर करणे आवश्यक राहील.

सदरहू बाब मा. महासभेसमोर ठेऊन कृपया मान्यता घ्यावी.

विशेष महासभा ठराव क्र: ८५ दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे दिनांक ७/३/२००५ च्या महासभेंचा ठराव क्र ७१ दिनांक १८/३/२००५ च्या आधारे दिनांक ९/६/२००५ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेली सूचना रद्द करुन उल्हासनगर शहराच्या सुधारीत विकास आराखडा तयार करण्याचा इरादा नव्याने जाहिर करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **वषय क्र. १२** :— उल्हासनगर शहराची विकास योजना तयार करणेसाठी 'नगररचना अधिकारी' यांची नेमणूक करणे कामी शासनास प्रस्ताव पाठविणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. १२ :—** उल्हासनगर शहराची विकास योजना तयार करणेसाठी 'नगररचना अधिकारी' यांची नेमणूक करणे कामी शासनास प्रस्ताव पाठविणे.

प्रस्तावना

शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस १२०२/८०६/सीआर—८३/२००२/ओडी—१२ दि. २६.१०.२००४ नुसार (१) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र हे उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव—बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्र यातुन वगळणेचा निर्णय घेतलेला आहे व परिणामी उल्हासनगर महानगरपालिका आपल्या क्षेत्रासाठी अधिनियमानुसार 'नियोजन प्राधिकरण' आहे.

त्याचप्रमाणे शासनाने या अधिसुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत निर्णय घेण्याबाबत निर्देश दिलेले होते. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम २४ नुसार विकास योजना तयार करणेसाठी नियोजन प्राधिकरणाने राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने यासाठी विहीत करण्यात आलेली पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तीची ''नगररचना अधिकारी'' म्हणुन खालील कामासाठी नेमणूक केली पाहिजे.

१. नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्राचे सर्वेक्षण करुन त्या क्षेत्राचा विद्यमान जमीन नकाशा तयार करणे.

२. नियोजन प्राधिकरणाकडे सादर करणेसाठी विकास योजनेतील प्रस्ताव तयार करणे.

महाराष्ट्र विकास योजना नियम १९७० चे नियम क्र. ५ मध्ये नगररचना अधिकाऱ्याची पात्रता नमुद करण्यात आलेली आहे. याकामी राज्य शासनाच्या नगररचना व मुल्य निर्धारण विभागाच्या सेवेतील उप—संचालक किंवा सहाय्यक संचालक दर्जाच्या अधिकाऱ्याची उल्हासनगर शहर सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी नगररचना अधिकारी म्हणून नेमणूक करणे योग्य होणार आहे.

यासाठी राज्य शासनाकडे विनंती करणे व यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यासाठी महासभेकडे प्रस्तावित करणेत येत आहे.

सदरहू बाब मा. महासभेसमोर ठेऊन कृपया मान्यता घ्यावी.

विशेष महासभा ठराव क्र: ८६ — दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे दिनांक १९/६/२००९ रोजीच्या ठराव क्र. ११ मध्ये अंशत: बदल करुन राज्य शासनाच्या नगररचना व मुल्य निर्माण विभागाच्या सेवेतील उपसंचालक किंवा सहाय्यक संचालक दर्जाच्या अधिका—याची उल्हासनगर शहर सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी नगररचना अधिकारी म्हणून नेमणूक करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :—** उल्हासनगर शहराच्या नियंत्रण नियमावलीमध्ये किरकोळ फेरबदल करणे.

---

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, हा जो आपला प्रस्ताव आहे, यातील कोणत्या नियमामध्ये फेरबदल करु इच्छित? किवा या नियमावलीत कोणते नविन नियम आपण समाविष्ट करु इच्छित आहात? याचा खुलासा नाही. तर माझी अशी सूचना आहे की, आपण जे नियम अधिसूचीत कराल, त्यावर ज्या सूचना हरकती मागवाल ते नियम या ठरावाचा भाग असेल.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>महापौर महोदया, सदरचे नियम जेव्हा आपण दुरुस्त करु तेव्हा सूचना व हरकती येतील त्याचा जो विचार करण्यात येईल, जर त्या हरकती व सूचना योग्य वाटल्या तर त्याचा आपण अंतर्भाव करु.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>मा. महापौरजी, या नियमांच्या फेरबदलामध्ये जे दोन विषय घेण्यात आलेले आहेत, त्यामध्ये मुद्दा क्र. २, आरक्षणाचे स्थलांतर व अंतर्गत बदल, व आरक्षणाच्या जागेचे चटईक्षेत्र निर्देशांकाच्या जागेत वापरण्याच्या जागेत विकास मालकाची जागा असेल तर हा विषय काही परिस्थितीमध्ये आपल्या शहरास लागु सुध्दा होवु शकतो. परंतु त्याचबरोबर एक गंभीर विषय निर्माण सुध्दा होवु शकतो की, यामध्ये उघड उघडपणे भ्रष्टाचार होवु शकतो. ते थांबविण्यासाठी यामध्ये काही नियम समाविष्ट करणे अति आवश्यक आहे. नाहीतर भविष्यामध्ये या नियमांचा गैरफायदा सुध्दा घेतला जाईल. यासाठी हे आवश्यक आहे की, ज्याच्या नावावर जी जागा आहे किंवा ज्याच्या ताब्यात ती जागा आहे, कोणत्याही अधिका—यास त्यास मंजुरी देण्याअगोदर तया त्या जागा मालकाचे नाव व जी जागा आहे तिचा पुर्ण पत्ता व तो चटईक्षेत्र कुठे वापरत आहे त्याची माहिती महासभेत देणे आवश्यक राहिल. या प्रकारचे त्या नियमामध्ये काही संशोधन करणे अतिआवश्यक आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्र राजानी यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, सदरची जागा कुणाची आहे त्याबाबतचे सर्व कायदेशीर व मालकी हक्काचे कागदपत्र बघुन, सर्व बघुन कार्यवाही करण्यात येईल. दुसरा जो मुद्दा आहे की परवानगी सभागृहापुढे आणायची नाही त्याबाबतीत तो मुद्दा तपासून होत असल्यास कारवाई करु. अन्यथा नियमाप्रमाणे जी कार्यवाही आहे ती करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>मा. महापौरजी, सभागृहास सूचीत केले जाईल किंवा नाही याबाबतची मला माहिती पाहिजे. आपण तर तपासणी कराल, सर्व काही कराल, तेथपर्यंत ठिक आहे. परंतु जे सभागृह नियम तयार करते त्या नियमाचे उल्लंघन होवु नये, किंवा त्या नियमांचा गैरफायदा घेतला जावु नये, ही माहिती देण्या संदर्भातील एक वाक्य जर त्यात आले तर कदाचित त्यामध्ये काही ना काही टक्के नियंत्रण केले जावु शकेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, हे तर असे झाले की, आम्ही बांधकाम नियंत्रण नियमावली मंजुर केली, तर त्यानुसार जे काही प्लान मंजुर होतात त्याची माहिती आम्हांला दया. व हे जे प्लान मंजुर होतील त्याची माहिती दया. शॉप ॲक्टनुसार किंवा अन्य दुस—या कायदयानुसार आपण चेंज आफ नेम करता? किंवा ज्या कुणाला लायसन देतात त्याची माहिती आम्हांला दया. कुणाकडे टॅक्सचे बिल पाठविता त्याची आम्हांला माहिती दया.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>सभागृहापुढे माझी सूचना आहे, आम्ही दोघेजण जे येथे बोलत आहोत त्या दोघांनाही येथे मत देण्याचा अधिकार नाही. ना राजेश यांना आहे ना राजानींना आहे. परंतु या अगोदर जे झाले आहे त्याच्यावर आपण चर्चा करत नाहीत. परंतु आपण जे नविन नियम तयार करत आहोत, कोणत्याही व्यक्तीच्या घरापुढे, कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारान्वये आरक्षित भुखंड असेल, तो व्यक्ती त्याचा एफएसआय आपल्या घरावर किंवा आपल्या मालकी हक्काच्या किंवा अन्य कुठल्या बांधकामावर करत असेल तर त्याची माहिती जोपर्यंत सभागृहासमोर येणार नाही तोपर्यंत, तेथे बसलेल्या कदाचित कुणा अधिका—यावर मी आरोप लावु इच्छित नाही. परंतु कधी कधी काही प्रकारचे अधिकारी त्यामध्ये येतात.त्यांनी त्याचा दुरुपयोग करुन यामध्ये अधिक रस असलेलया व्यक्तींना फायदा देवुन ज्याचे नुकसान पुढे जावुन बाकी जे साधेसरळ, जे कायदे आणि नियम पाळणारे जे बहुसंख्य लोक आहे त्यांना ते नुकसान भोगावे लागते. आणि त्यावर नियंत्रण आणण्यासाठी मी येथे बोलत आहे. बाकी प्रस्ताव सभागृहापुढे आहे. एकतर आपल्या म्हणण्याचा मान ठेवला

जावा.  किंवा ज्यांचे चुकीच्या कामामध्ये रस आहे त्यांचे मनोगत पुर्ण झाले पाहिजे किंवा जे बहुसंख्य लोक आहेत त्यांचे मनोरथ पुर्ण झाले पाहिजे याचा निर्णय सभागृहाने घ्यायचा, याचा अधिकार सभागृहापुढे आहे.  ना मला मतदान करण्याचा अधिकार आहे ना आपणांस मतदार करण्याचा अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u>परंतु बोलण्याचा अधिकार सारखाच आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मा. महापौर महोदया, श्री. राजानी साहेबांच्या मताशी सहमत आहे.  तुम्हांला पारदर्शकता ठेवायची असेल तर पारदर्शकता ठेवण्यामध्ये काय हरकत आहे.  श्री. वदारियाजी, श्री. राजानी साहेबांनी कधी सांगितले नाही की हेच करा म्हणुन.  जे काही आपणांस करायचे आहे ते सभागृहासमोर आणा. कारण की भ्रष्टाचार होण्याची शासनता त्यांनी निदर्शनास आणुन दिलेली आहे.  भ्रष्टाचार थांबविण्यासाठी, भ्रष्टाचार वाढवु नये म्हणुन व उल्हासनगरमध्ये चांगल्या प्रकारचा कारभार चालला आहे हे दाखविण्यासाठी सभागृहापुढे ही माहिती आली पाहीजे.  त्यासाठी आम्ही प्रस्ताव सभागृहापुढे ठेवले आहे.  बाकी जो काही गैरफायदा घेण्यासारखे जे प्रकार घडतील ते टाळले पाहिजे.  अधिकारी नेहमी बदलतात, लोकप्रतिनिधी नेहमी बदलतील.  परंतु एक सिस्टम तयार होत असेल तर ती नेहमीसाठी राहिल.  व ती भ्रष्टाचार कमी करेल.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>याबाबतीत काय काय केले जावु शकते आयुक्त साहेबांनी सांगितले तर बरे होईल.

यावेळी  सदस्य श्री. हिरानंद जग्यासी, श्रीमती संगिता कंडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>महापौर महोदया, एक ही जी सूचना होती ती चांगली होती.  मी एवढेच म्हटले आहे की, कायदेशीर दृष्टया जे योग्य आहे ती तपासून घेतो, हा मसुदा आहे.  मसुदा प्रसिध्द झाल्यानंतर सूचना व हरकती मागविल्या जातील.  त्यानंतर अंतिम मंजुरीसाठी पुन्हा सभागृहापुढे येणार आहे.  त्यावेळी जर सभागृहाला असे वाटत असेल आणि त्यावर एकमत होत असेल तर आपण त्यावर विचार करु.

यावेळी सदस्य श्री. मोहन रामरख्यानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>महापालिका सचिव :—</u>पास?  सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १३ :—** उल्हासनगर शहराच्या नियंत्रण नियमावलीमध्ये किरकोळ फेरबदल करणे.

<u>प्रस्तावना</u>

स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९४२ मध्ये भारत सरकारने लष्करी सैनिकांच्या वसाहतीसाठी सुरक्षित व योग्य ठिकाण म्हणून उल्हासनगरची निवड करुन वसाहतीसाठी १३०० हेक्टर जमिन संपादित केली. सदर जमिनीचा विकास करुन त्यामध्ये १९७३ बॅरेक्स बांधून सुमारे ६००० सैनिकांना राहण्यासाठी देण्यात आले. सन १९४७ मध्ये हिंदुस्तानची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली. या फाळणीमध्ये सिंध प्रांतातुन निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागले. त्या निर्वासितांचे पुर्नवसन १९७३ बॅरेक्सचाच संक्रमण छावण्या म्हणून उपयोग करुन सुमारे ९४४०० निर्वासितांची व्यवस्था उल्हासनगरमध्ये केली होती.

उल्हासनगर ते मुंबई महानगरपासुन जवळ असलयामुळे तसेच शहरातुन जाणारे महामार्ग व मध्य रेल्वेच्या मार्गावर विठठ्लवाडी व उल्हासनगर ही रेल्वे स्थानके मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे तसेच दळणवळणास सोयीचे ठिकाण असुन लघुउद्योग व औद्योगिक विकास मोठया प्रमाणावर असल्यामुळे उद्योजक व मध्यमवर्गीयांचा लोंढा उल्हासनगरकडे वळला. त्यामुळे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढुन शहरामध्ये अनेक बांधकामे झालेली आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेने, उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार वेळोवेळी दिलेल्या शासनाच्या आदेशानुसार उल्हासनगर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये पुढील बदल करणे योग्य राहील.

१. **इमारतीची उंची वाढविणे** — उल्हासनगर शहर हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे उद्योजक व मध्यमवर्गीयांचा लोंढा उल्हासनगरकडे वळला. त्यामुळे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढू लागली. उल्हासनगर शहरासाठी शासनातर्फे सन १९७४ मध्ये विकास योजना तयार करुन प्रसिध्द करण्यात आली त्यामध्ये इमारतीची उंची २४ मी. पर्यंत देण्यात येत होती.

तथापि, नियोजित विकासासाठी विकास योग्य क्षेत्र ४१६ हेक्टर शिल्लक राहते व सन १९७४ च्या मंजूर विकास योजनेनुसार एकुण ५३०.४३ हेक्टर एवढे क्षेत्र वापरासाठी दाखविण्यात आले आहे. उल्हासनगर शहरामध्ये अनेक बांधकामे झालेली असुन शहरात दाट वस्ती झालेली दिसुन येते. त्या अनुषंगाने उल्हासनगर शहराचे मर्यादित क्षेत्रफळ लक्षात घेता आडवा (Horizontal) विस्तार करणे जागेच्या अभावामुळे शक्य नाही. त्यामुळे उंच इमारती देऊन (Vertical) विस्तार करणे शक्य आहे. त्यास अनुसरुन क्षेत्रामधील इमारतीची उंची इतर महानगरपालिकेच्या बरोबरीने म्हणजेच ९१ मी. पर्यंत वाढविणे गरजेचे आहे व त्या उंचीच्या आधारावरती उल्हासनगर महानगरपालिकेला लागुन असलेली कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियमावलीनुसार सामासिक अंतर ठेवणे योग्य आहे.

२. **आरक्षणाचे स्थलांतर व अंतर्गत बदल** — उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार जे आरक्षण राखीव ठेवण्यात आलेले आहेत. सदर आरक्षण व आजूबाजूचा परिसर समजा एका व्यक्तीच्या नांवे मालकी हक्क असल्यास सदरचा प्लॉट (जागा) विकासकाला विकसित करावयाची असल्यास सदर जागेत जे आरक्षण येत असेल त्याची जागा (ठिकाण) त्याच प्लॉटमध्ये बदलण्यात येऊन त्याच्या क्षेत्रफळाएवढेच क्षेत्रफळ देऊन उर्वरित भूखंडाचा विकास करणे शक्य होईल. सदरचा बदल करुन उल्हासनगर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

३. **आरक्षणाच्या जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक लगतच्या जागेत वापरण्याबाबत (एकाच मालकाची जागा असल्यास)** — उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार जर भुखंड आरक्षित असेल व त्याचा मालकी हक्क कोणा व्यक्तीकडे असल्यास सदर भुखंडाचा ताबा जर ती व्यक्ती विनामुल्य महानगरपालिकेस देण्यास तयार असेल तर त्याचा चटई क्षेत्र निर्देशांक त्याच्याच मालकीच्या उर्वरित जागेत तो मालक विकास योजनेच्या zoning नुसार तेवढाच चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन विकास करु शकतो, असा बदल उल्हासनगर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

४. **पोडीयम आर.जी. (Podium R.G.)** — उल्हासनगर शहरामध्ये जर भुखंडाचे रेखांकन सादर करतेवेळेस सदर रेखांकन रहिवासी / वाणिज्य क्षेत्रात खालीलप्रमाणे मोकळी जागा सोडणे आवश्यक आहे.

१. १००० चौ.मी. ते २५०० चौ.मी. — १५%
२. २५०० चौ.मी. ते १०००० चौ.मी. — २०%
३. १०००० चौ.मी. च्या वर — २५%

या भुखंडात आर.जी. खालील तळघर व पोडीयम खाली वाहनतळ यालगत १.५० मी. च्या सभोवतालीच्या खुल्या जागेत कुंपण भिंतीसह झाडे लावणे या व्यतिरिक्त समोरील बाजूस कमीत कमी १५ टक्के आर.जी. च्या खुली जागा प्रस्तावित करण्यात यावी. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत भुखंडाचे आकार व क्षेत्रफळ कमी असल्याने सामासिक अंतरे चारही बाजूने ३ मी. ठेवणे योग्य आहे. तसेच या सामासिक अंतरात बांधकाम प्रस्तावित होत नसल्यास समोरचे सामासिक अंतर ३ मी. ठेवुन उर्वरित बाजूस सामासिक अंतरात शिथिलता देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे देणे योग्य होईल.

सदरहू बाब मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवुन कृपया मान्यता घ्यावी.

विशेष महासभा ठराव क्र: ८७ दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत सुचविल्याप्रमाण्यो उल्हासनगर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये किरकोळ फेरबदल मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १४ :–** उल्हासनगर शहरामधील इमारती कमकुवत झाल्यामुळे कोसळत असल्याने इमारतीस चार चटई क्षेत्र निर्देशांक मान्य करणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**यामध्ये कोणत्या नियमामध्ये सुधारणा करायची आहे त्याचे स्पष्टीकरण नाही. तर जे नियम आपण प्रसिध्द कराल ते या ठरावाचा भाग मानला जाईल. हे वाक्य या ठरावामध्ये आले पाहिजे.

यावेळी सदस्य श्री. मोहन रामरख्यानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–**महापौर महोदया, सदरचा प्रस्ताव एमआरटीपी ॲक्टच्या कलम ३७ नुसार आम्ही तयार केला होता. एमआरटीपी ॲक्टच्या १५४ खाली शासनाला असे निर्देश देण्याचे अधिकार आहेत. आणि अशा निर्देशानुसार कार्यवाही करणे आपणांस बंधनकारक आहे. जर शासनाने असे निर्देश दिले तर, आपण शासनाला विनंती करत आहोत. जर शासनाने असे निर्देश दिले तर कोणतही सूधारणा न करता आपणाला त्याची अंमलबजावणी करता येईल.

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १४ :–** उल्हासनगर शहरामधील इमारती कमकुवत झाल्यामुळे कोसळत असल्याने इमारतीस चार चटई क्षेत्र निर्देशांक मान्य करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणामध्ये होऊन सन १९९१ ते १९९६ या कालावधीमध्ये रेतीचा तुटवडा असल्यामुळे माती मिश्रीत वाळू वापरुन तसेच स्वस्त दरामध्ये इमारतीचे साहित्य उपलब्ध झाल्याने अनेक इमारती बांधण्यात आल्या. परंतू अशा इमारतींचे आयुष्य कमी असल्यामुळे त्या इमारती धोकादायक होऊन कोसळण्याच्या मार्गावर आहेत. तथापि उल्हासनगर शहराच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये अशा धोकादायक इमारतींचे पुर्नबांधणी करताना चटई क्षेत्र निर्देशांक वाढवुन देण्याची तरतुद नसल्यामुळे अशा इमारतींना वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करता येत नाही.

उल्हासनगर शहरातील इमारतींपैकी तळमजला + ४ मजलेची वाणिज्य व रहिवासी वापरासाठीची इमारत बांधण्यात आलेली होती व त्यात तळमजल्यावर ३ दुकाने व १ ते ४ मजल्यावर १८ सदनिका होत्या. ती इमारत पूर्णपणे कोसळली. तद्नंतर सदर इमारतीचे दुप्पट चटई क्षेत्र निर्देशांकाने बांधकाम नकाशे मंजूरीस सादर केले होते. तथापि, अशा प्रकारचे प्रावधान मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नाही. तथापि, सध्या सदर जागेवर १ चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली आहे. चटई क्षेत्र निर्देशांक १ प्रमाणे पूर्वी रहात असलेले १८ सदनिकाधारक आणि ३ दुकानदार यांना ही जागा अपूरी पडत असल्यामुळे त्यांच्याकडून आणि महानगरपालिकेच्या नगरसेवकाकडून अशा धोकादायक इमारतींना चार चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची मागणी होत आहे

सदर धोकादायक असणाऱ्या इमारत पडल्यास पुर्न:बांधणी करतेवेळेस ४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय केल्यास अस्तित्वातील असलेल्या जास्तीत जास्त सदनिकाधारकांना समावेश करुन घेणे सोईचे होईल. जेणेकरुन रहिवासी बेघर होणार नाहीत.

सदरहू बाबींचा विचार करता धोकादायक असणाऱ्या इमारतीच्या पुर्न:बांधणीचा प्रस्ताव आल्यास खालील बाबींची तपासणी करुन त्यांना consumed केलेल्या एफ.एस.आय. किंवा अधिकतम चार याप्रमाणे पुर्न:बांधणीच्या प्रस्तावास मान्यता देणे योग्य होईल.

१. इमारत धोकादायक स्थितीत आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी खालीलप्रमाणे

त्रिसदस्यीय समितीची नेमणूक मा. आयुक्त यांचे मान्यता घेऊन करणे योग्य होईल. त्रिसदस्यीय समितीमध्ये खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांचा समावेश करता येईल.

१) उप—संचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई
२) शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
३) सहा. संचालक, नगररचना / नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

२. ज्या ठिकाणी इमारत बांधण्यात आलेली आहे, त्याठिकाणी जागेचा मालकी हक्क दर्शविणाऱ्या महसुल खात्याचे सनद.

३. उल्हासनगर शहराचे मंजूर विकास योजना किंवा त्यावेळेस अंमलात असलेली शासनाचे आदेशाच्या प्रमाणेची विकास योजनेचे प्रस्ताव विचारात घेऊन पुर्न:बांधणीच्या प्रस्तावाला मंजूरी देणे बंधनकारक राहील.

४. ज्या धोकादायक इमारतीमध्ये ४ पेक्षा अधिक चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यात आलेला आहे, त्यांना अधिकतम ४ व ज्या इमारतीमध्ये ४ पेक्षा कमी एफएसआय वापरण्यात आलेला आहे त्यांना तेवढयापुरती इमारत बांधकाम मंजूरीच्या प्रस्तावावर विचार करता येईल.

तथापि, सध्याचे प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सामासिक अंतर अधिकतम सहा मीटर चारही बाजूंनी सोडल्यास मजल्यांची संख्या वाढेल. त्यामुळे इतर महानगरपालिकेमध्ये असलेल्या इमारतीची उंचीप्रमाणे अधिकतम (९१ मी.) एवढीची तरतुद करणे योग्य होईल. ९१ मी. पर्यंतची अधिकतम उंचीची तरतुद साधारणपणे सर्व प्रस्तावांना तसेच धोकादायक व इतर (सामान्य प्रस्तावांना) ९१ मी. ची मर्यादा ठेवणे योग्य होईल. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत भुखंडाचे आकार व क्षेत्रफळ कमी असल्याने सामासिक अंतर चारही बाजूने ३ मी. ठेवणे योग्य आहे. तसेच या सामासिक अंतरात बांधकाम बसत नसल्यास समोरचे सामासिक अंतर ३ मी. ठेवुन उर्वरित बाजूस सामासिक अंतरात शिथिलता देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे देणे योग्य होईल.

५. इमारतीची उंची वाढल्यामुळे धोकादायक किंवा सामान्य इमारतीमध्ये २४ मी. च्या पुढे म्हणजेच सात मजल्याच्या पुढे प्रत्येक मजल्याला अग्निशमनची व्यवस्था (provision) करणे आवश्यक राहील. तसेच महानगरपालिकेला अग्निशमन गाडी खरेदी करण्याकरीता सात मजल्याच्या वरती प्रत्येक मजल्याला प्रती चौ.फुट प्रमाणे Capitation Fee घेणे योग्य होईल. Capitation Fee शासनानी ठरवुन दिलेल्या कारणाप्रमाणे तसचे वेळोवेळी महानगरपालिका जे दर निश्चित करतील त्याप्रमाणे घेणे योग्य होईल.

तरी धोकादायक इमारतींच्या बाबतीत त्यांनी वापरलेला चटई क्षेत्र निर्देशांक किंवा अधिकतम ४.०० यापेक्षा जे कमी असेल ते देण्यासाठी वरीलप्रमाणे प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ खालील फेरबदल करण्याचे

प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी धोकादायक इमारती पडण्याचें प्रमाण पाहता प्रस्ताव त्वरीत शासनाकडे कलम १५४ खालील मान्यता मिळणेस प्रस्ताव सादर करणे योग्य होईल.

सदरहू बाब मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेऊन कृपया मान्यता घ्यावी.

विशेष महासभा ठराव क्र: ८८ दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद कलेल्या कारणांमुळे उल्हासनगर शहरामधील इमारती कमकुवत झाल्यामुळे कोसळत असल्याने इमारतीस चार चटई क्षेत्र निर्देशांक प्रयोजनार्थ उल्हासनगर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये योग्य ते फेरबदल करणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १५ :—** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्यता देणे.

---

काही सदस्य :—हा विषय कार्यसूचीवरुन वगळण्यात यावा.

महापालिका सचिव:—सर्वसंमतीने?

महापौर :— सदरचा विषय कार्यसूचीवरुन वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १५ :—** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक प्रकारचे व्यवसाय चालविण्याकरीता व इतर प्रयोजनाकरीता व्यवसाय धारकाकडुन विवक्षित वस्तुची साठवणुक करण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३८३ व ३८६ नुसार आयुक्तांना दिलेल्या अटी व शर्तीनुसार आणि त्यास अनुसरुन कोणत्याही नियमात विर्निदिष्ट केलेल्या कोणत्याही वस्तु कोणत्याही जागेत किंवा जागेवर परवान्यांशिवाय ठेवता येणार नाहीत.

आसपासच्या इतर महानगरपालिकांचे सदर विषयासंबंधीचे उपविधी पडताळून अधिनियमाचे कलम ४५८ (२०), ४५५ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नव्याने नियम व उपविधी तयार करण्यात आले असुन

सदर विषयी वस्तु व व्यापार साठवणुकीसंबंधी संपुर्ण माहिती तसेच जागा वापरासंबंधी प्रारुप उपविधी व नियमावली तयार केलेली आहे.

सदर उपविधी व प्रारुप नियमावलीस महासभा ठराव क्र. १११, दिनांक १९/१२/२००३ नुसार प्राथमिक मंजुरी मिळाली होती. त्यानुसार ठरावात नमुद केल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रामध्ये उपविधी व प्रारुप नियमावलीस आवश्यक ती प्रसिध्द देवुन दिनांक ३१/१/२००४ अखेर सुचना व हरकती मागविल्या होत्या. तसेच प्रस्तृत प्रारुप उपविधीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती. व जनतेच्या अवलोकनासाठी खुली ठेवली होती. तथापि वरील मुदतीत कोणाचे सुचना अगर हरकती प्राप्त झाल्या नाहीत.

सदर उपविधी अंतिम मंजुरीकरीता राज्य शासनाकडे पाठविणे अगोदर महासभेपुढे अंतिम मंजुरीकरीता प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने महासभेपुढे प्रस्तावित करण्यात आले. परंतु महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी धंदे व व्यवसाय करणेसाठीचे परवान्यासंबंधी प्रारुप उपविध व प्रारुप नियमावलीस अंतिम मान्यता दिलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (१०) अन्वये उपद्रवकारक व धोकादायक उदयोग किंवा प्रयोग यांचे नियमन व उपशमन करणे हे महापालिकेच्या आवश्यक कर्तव्यात समाविष्ट आहे. कायदयाने महानगरपालिकेवर लादलेल्या या कर्तव्याच्या पालनासाठी वरील उपविधी करुन त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यामुळे शहरातील उदयोग व्यवसायाचे नियमन व सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता या बाबी साध्य होवू शकणार आहेत. तसेच या उपविधी अंमलात आणल्यास महानगरपालिकेस निश्चित स्वरुपाचे उत्पन्न प्राप्त होवु शकणार आहे. या बाबी विचारात घेवुन महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठीचा प्रस्ताव महासभेकडे पुर्नविचारार्थ ठेवण्यात आला होता.

तथापी महासभा ठराव क्र. ३१ अ दिनांक २९/६/२००७ अन्वये पुर्वीचा महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ व ठराव क्र. १०० दिनांक २०/३/२००६ बदल करुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्यासंबंधी प्रस्तावित शुल्क, प्रारुप उपविधी व नियमावलीस अंतिम करण्याचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी सभेच्या कामकाजातुन वगळण्यात आला होता.

सबब, उल्हासनगर शहराच्या वस्तु ठेवणे व धंदे व व्यवसाय करण्यासंबंधी प्रारुप उपविधी व प्रारुप नियमावली सविस्तर प्रस्ताव सोबत जोडलेला असून अंतिम मान्यतेकरीता मा. महासभेसमोर पुर्नप्रस्तावित करण्यात करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र: ८८ अ दिनांक:–१०/३/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्य करण्याचा प्रस्तावा पुढच्या सभेत घेण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६** :– रोटरी क्लब, उल्हासनगर मिड टाउन यांना दिलेला साधुवासवानी उदयान, गोल मैदान येथिल महापालिकेची जागा वापर परवाना करार रद्द करणे.

---

सदस्य श्री. भारत राजवानी :–रद्द करायचा.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>मा. आयुक्त साहेब, आपण गोल मैदान रोटरी क्लबला दिलेले आहे, त्याच्या ज्या अटी व शर्ती आहेत त्या नियमीत केल्या आहेत काय? दुसरे असे की, मागच्या एका महासभेत मा. सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी रोटरी क्लबबद्दल भरपुर असे मुद्दे उपस्थित केले होते. ॲग्रीमेंटसुध्दा सुध्दा दाखविले होते. त्यापासुनच हे चालले आहे. त्यानंतर आपण त्याबाबतीत काय कार्यवाही केली? श्री. भुल्लर महाराज यांच्याकडे त्या प्रकरणाची विस्तृत माहिती आहे. दुसरी गोष्ट अशी की, आपल्या करारनाम्यामध्ये लिहिले आहे की, उदयानामध्ये विनामुल्य मुक्त प्रवेश दिला जाईल. या उदयानामध्ये जी अमेजमेंट लावलेली आहे त्याठिकाणी गरीब लोकांना जाण्यासारखे आहे का? २० ते २५ रुपये टिकीट आहे त्यापासुन आपल्या महापालिकेला काय फायदा आहे? आज एवढे मोठे अमेजमेंट पार्क त्या गोल मैदानमध्ये त्याने लावुन ठेवली आहे, गोल मैदानमध्ये एवढी मोठी जागा दिली आहे? त्यापासुन महापालिकेला काय फायदा आहे साहेब? तो महापालिकेला किती उत्पन्न मिळुन देतो? या जागा महिला बचत गट मागतात त्यांना तुम्ही देत नाही? महानगरपालिकेच्या बाहेर महिला बचत गटाची हातगाडी लागते ती तुम्ही उचलता? आणि या लोकांना मोठ मोठया जागा देवुन ठेवल्या आहेत. त्यांच्यापासुन महापालिकेला काय फायदा आहे? मा. महापौर महोदया, मी आपणांस सांगु इच्छितो की, ही जी गौल मैदानमधील जागा रोटरी क्लबला दिली आहे, २० २० रुपये तेथे टिकीट आहे. तुम्ही तेथे जावुन या. श्री. भुल्लर महाराज यांच्याकडे संपुर्ण फाईल आहे. रोटरी क्लबववाल्यांनी लोकांबरोबर ॲग्रीमेंट केले आहे. ॲमेजमेंट पार्क वाल्यांबरोबर त्यांचे ॲग्रीमेंट आहे. तुम्ही १० वर्षाचा करार केला आहे, १० वर्षाचा करार कशाकरीता? करारानुसार त्यांनी दरवर्षी २५ लाख रुपये खर्च करायचा आहे. तो २५ लाख रुपयाचा खर्च त्याने केला आहे का? काय सामुग्री लावली आहे? काय काम केले आहे? झाडे लावलेली आहेत काय? त्याने गोलमैदानमध्ये २५ लाखाचे काय काम केले आहे? संबंधीत अधिकारी कोण आहे? त्यास व्यासपीठावर बोलवा. उल्हासनगर महानगरपालिकेने रोटरी क्लब मिड टाउन यांच्याशी जो करारनामा केला आहे त्यातील अट क्र. ४ मध्ये लिहिले आहे की, संस्थेला उदयान विकसित व सुशोभित करण्यासाठी किमान रुपये २५ लाख खर्च करणे बंधनकारक राहिल. उदयान विकसित करतांना संस्था जो खर्च करेल त्याचा तपशिल वेळोवेळी महापालिकेस सादर करणे बंधनकारक राहिल.त्यानुसार त्यांनी २५ लाख रुपये खर्च केला आहे का?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, आपण गोलमैदानमधील ही जी जागा रोटरी क्लबला दिलेली आहे, मी असे ऐकले आहे की, रात्री तेथे काही लोक दारु पितात. मासांहार करतात. साधु वासवानी या नावाने हे गार्डन आहे. तेथे मासाहार करणे व दारु पिणे त्यास परवानगी आहे का? तेथे मासाहार करु नये असे आपण काही अग्रीमेंटमध्ये लिहिले आहे का? कमीत कमी असे काम तरी करता कामा नये. ज्या कामासाठी त्यांना ती जागा दिली आहे, त्याच कामासाठी तिचा वापर झाला पाहिजे परंतु तेथे बसुन दारु पितात, मांसाहार करतात. तेवढे तरी आपण बंद करा. याबाबतीत लोकांच्या खुप तक्रारी आहेत, डॉ. दयाल अशाळ यांनी तीन चार पत्र दिली आहेत. तेथे जे रोटरी क्लबवाले बसतात दारु पितात, मासांहार करतात.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>मा. महापौरजी, तेथे जर कुणाला आपला काही कार्यक्रम करायचा असेल तर त्यासाठी ५ हजार नाही, २५ हजार फी घेतली जाते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>या विषयांवर रोज रोज चर्चा चालु आहे. तेथे दारु पीली जाते किंवा मासांहार केले जाते असे कोणतेही तक्रार किंवा पुरावा नाही. या विषयाबाबत सर्व पक्षाचे गटनेते एकत्रित बसुन निर्णय घेतील त्यासाठी हा विषय सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा या विषयावर जास्त चर्चा केली जावु नये. कोणत्याही संस्थेच्या विरोधात आम्ही जास्त बोलु इच्छित नाही.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>मा. महापौरजी, हा विषय पुढे ढकलला जावा असे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे मत आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>वगळायचा? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>सदरचा विषय कार्यसूचीवरुन वगळण्यात यावा.

<u>महापौर :–</u> सदरचा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १५ :–** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक प्रकारचे व्यवसाय चालविण्याकरीता व इतर प्रयोजनाकरीता व्यवसाय धारकाकडुन विवक्षित वस्तुची साठवणुक करण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३८३ व ३८६ नुसार आयुक्तांना दिलेल्या अटी व शर्तीनुसार आणि त्यास अनुसरुन कोणत्याही नियमात विर्निदिष्ट केलेल्या कोणत्याही वस्तु कोणत्याही जागेत किंवा जागेवर परवान्यांशिवाय ठेवता येणार नाहीत.

आसपासच्या इतर महानगरपालिकांचे सदर विषयासंबंधीचे उपविधी पडताळून अधिनियमाचे कलम ४५८ (२०), ४५५ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नव्याने नियम व उपविधी तयार करण्यात आले असुन सदर विषयी वस्तु व व्यापार साठवणुकीसंबंधी संपुर्ण माहिती तसेच जागा वापरासंबंधी प्रारुप उपविधी व नियमावली तयार केलेली आहे.

सदर उपविधी व प्रारुप नियमावलीस महासभा ठराव क्र. १११, दिनांक १९/१२/२००३ नुसार प्राथमिक मंजुरी मिळाली होती. त्यानुसार ठरावात नमुद केल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रामध्ये उपविधी व प्रारुप नियमावलीस आवश्यक ती प्रसिध्द देवुन दिनांक ३१/१/२००४ अखेर सुचना व हरकती मागविल्या होत्या. तसेच प्रस्तृत प्रारुप उपविधीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती. व जनतेच्या अवलोकनासाठी खुली ठेवली होती. तथापि वरील मुदतीत कोणाचे सुचना अगर हरकती प्राप्त झाल्या नाहीत.

सदर उपविधी अंतिम मंजुरीकरीता राज्य शासनाकडे पाठविणे अगोदर महासभेपुढे अंतिम मंजुरीकरीता प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने महासभेपुढे प्रस्तावित करण्यात आले. परंतु महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी धंदे व व्यवसाय करणेसाठीचे परवान्यासंबंधी प्रारुप उपविध व प्रारुप नियमावलीस अंतिम मान्यता दिलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (१०) अन्वये उपद्रवकारक व धोकादायक उदयोग किंवा प्रयोग यांचे नियमन व उपशमन करणे हे महापालिकेच्या आवश्यक कर्तव्यात समाविष्ट आहे. कायदयाने महानगरपालिकेवर लादलेल्या या कर्तव्याच्या पालनासाठी वरील उपविधी करुन त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यामुळे शहरातील उदयोग व्यवसायाचे नियमन व सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता या बाबी साध्य होवू शकणार आहेत. तसेच या उपविधी अंमलात आणल्यास महानगरपालिकेस निश्चित स्वरुपाचे उत्पन्न प्राप्त होवु शकणार आहे. या बाबी विचारात घेवुन महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठीचा प्रस्ताव महासभेकडे पुर्नविचारार्थ ठेवण्यात आला होता.

तथापी महासभा ठराव क्र. ३१ अ दिनांक २९/६/२००७ अन्वये पुर्वीचा महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ व ठराव क्र. १०० दिनांक २०/३/२००६ बदल करुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्यासंबंधी प्रस्तावित शुल्क, प्रारुप उपविधी व नियमावलीस अंतिम करण्याचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी सभेच्या कामकाजातुन वगळण्यात आला होता.

सबब, उल्हासनगर शहराच्या वस्तु ठेवणे व धंदे व व्यवसाय करण्यासंबंधी प्रारुप उपविधी व प्रारुप नियमावली सविस्तर प्रस्ताव सोबत जोडलेला असून अंतिम मान्यतेकरीता मा. महासभेसमोर पुर्नप्रस्तावित करण्यात करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ८८ अ <u>दिनांक:–१०/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्य करण्याचा प्रस्तावा पुढच्या सभेत घेण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १७ :—** निर्मल एमएमआर योजने अंतर्गत शौचालयात झालेल्या अपघातामुळे मृत पावलेला व्यक्तीच्या कुटुंबियांस दोन लाख रुपये आर्थिक मदत देणे.

---

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**हा विषय पारीत केला जावा परंतु मा. महापौरांच्या प्रभागात एक मुलगा संरक्षण भिंतीसाठी खोदलेल्या खड्डयामध्ये पडुन मृत्युमुखी पडला त्याच्या कुटुंबियांनाही आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव अशा प्रकारे दोन्ही प्रस्ताव एकत्रितरित्या या महासभेपुढे आणण्यास सांगितले होते. शांतीनगर येथे मृत्युमुखी पडलेल्या त्या मुलाच्या कुटुंबियास आर्थिक मदत आणण्याचा प्रस्ताव महासभेत आणलेला नाही. कार्योत्तर मंजुरीसाठी नंतर प्रस्ताव आणा. त्या अगोदर त्या दुस—या मुलाच्या कुटुंबियास आर्थिक मदत दिली जावी.

**महापालिका सचिव :—**पास? या विषयासाठी स्वतंत्र प्रस्ताव आणला जाईल.

**सदस्य श्री. राजेंद्रसिह भुल्लर :—**नंतर प्रस्ताव आणा आणि नंतर मंजुरीस्तव प्रस्ताव आणु शकतात.

**महापालिका सचिव :—**आपण कार्योत्तर मंजुरीसाठीचा प्रस्ताव दया. तो सभेपुढे येईल.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १७ :—** निर्मल एमएमआर योजने अंतर्गत शौचालयात झालेल्या अपघातामुळे मृत पावलेला व्यक्तीच्या कुटुंबियांस दोन लाख रुपये आर्थिक मदत देणे.

प्रस्तावना

निर्मल एम.एम.आर. योजनेअंतर्गत उपरोक्त संदर्भिय दिनांक ३१/३/२००९ चे कार्यारंभ आदेशाद्वारे उल्हासनगर—३ मधील प्रभाग क्र.८ मध्ये आंबेडकर नगर, चोपडा, बालवाडीजवळ १० बैठकीचे शौचालय बाधंणेचे कामाचे आदेश स्पार्क या संस्थेस देण्यात आले होते. स्पार्क संस्थेने महापालिकेस सादर केलेल्या अभिलेखांमध्ये सदर शौचालय पूर्ण करुन देखभाल दुरुस्ती कामी आदर्श मित्र मंडळ या स्थानिक सी.बी.ओ. मंडळास नियुक्त केल्याचे दिसते. सदर शौचालयाचे ठिकाणी दिनांक ५/२/२०१० रोजी इलेक्ट्रकचा शॉक लागून लहान मुलास अपघात होवून मुलगा दगावला आहे. या ठिकाणी साफसफाई मध्ये दुर्लक्ष असल्याचे दिसून आले आहे. अपघाताच्या ठिकाणी मुतारीतील मलमुत्र साचलेले आढळले. याची सर्वस्वी जबाबदारी नियुक्त केलेल्या आदर्श मित्र मंडळ या स्थानिक सी.बी.ओ. मंडळाची आहे. सदर सीबीओ मंडळ स्पार्क या

संस्थेने नियुक्त केले असून स्पार्क संस्थेकडुनही मृत मुलाच्या नातेवाईकास मदत देण्यात येणार असल्याचे या संस्थेने कबूल केले आहे.

मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांनी त्यांचेकडील पत्र क्र. उमपा/अआका/२४/१०, दिनांक ६/२/२०१० च्या पत्रान्वये मृत्यु झालेल्या लहान मुलाचे कुटुंबियांस रु. २.०० लक्ष एवढी रक्कम मदत म्हणुन देण्याचा प्रस्ताव तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेबाबत कळविले आहे. सदरचा खर्च महापालिकेच्या अर्थसंकल्पातील 'आकस्मिक खर्च' या लेखाशिर्षातून भागविणे आहे.

त्यानुसार सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र: ८९ — दिनांक:—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मालती करोतिया

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार निर्मल एमएमआर योजने अंतर्गत शौचालयात झालेल्या अपघातामुळे मृत पावलेला कु. प्रकाश दिपक जाधव यांच्या कुटुंबियांना महापालिकेतर्फे रु. दोन लाख आर्थिक मदत देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १८** :— ५७ वी प्रौढ गट राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी रुपये दोन लाख निधी उपलब्ध करुन देणे.

---

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

सदस्य श्री. दत्तात्रय पवार :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, या स्पर्धा होवुन गेलेल्या आहेत. स्पर्धा होवुन जवळ जवळ दोन आठवडे होवुन गेलेले आहे.

महापालिका सचिव :—हा विषय नाकारायचा कि पुढे ढकलायचा?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—नाकारा. दोन आठवडे होवुन गेले आहेत.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—नाकारला जावा.

महापालिका सचिव :—हा प्रस्ताव नाकारला जावा काय? सर्वसंमतीने?

काही सदस्य :—हा प्रस्ताव नाकारला जावा.

महापौर :— सदरचा विषय नाकारण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १८** :— ५७ वी प्रौढ गट राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी रुपये दोन लाख निधी उपलब्ध करुन देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांचे दिनांक ११/२/२०१० रोजीचे पत्रान्वये आर्थिक मदत मिळणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य कब्बडी असोसिएशन व ठाणे जिल्हा कब्बडी असोसिएशनच्या मान्यतेने छत्रपती शिवाजी क्रिडा मंडळाच्यावतीने ठाणे जिहयात प्रथमच राष्ट्रीय अजिंक्सनइ कब्बडी स्पर्धा दिनांक १७ ते २१ फेब्रुवारी २०१० रोजी डोंबिवली जिमखान्याच्या भव्य क्रिडांगणावर आयोजित करण्यात आले असून या स्पर्धेत सहभागी होणा–या खेळाडुंचे मनोबल उंचावण्यासाठी व स्पर्धेसाठी येणारा खर्चासाठी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत मिळावी अशी संदर्भित पत्रान्वये मागणी केली आहे. मात्र सदरचे क्षेत्र महानगरपालिकेच्या कक्षाबाहेरील आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६६ (११) अन्वये प्रदर्शने, व्यायामाचे किंवा अन्य खेळाचे सामने भरविण्यासाठी महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत उपलब्ध करता येईल.

याबाबत नमुद करण्यात येते की, सन २००९–१० साठी केलेल्या अंदाजपत्रकात लेखाशिर्ष ई–संकिर्ण *(पग* (क्रिडा खर्च)) मधील तरतुदीनुसार निर्णयार्थ मा. महासभा पटलावर प्रस्तावित करणे योग्य वाटते.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ९०                                                  <u>दिनांक:–१०/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. जे.के. ढोके

अनुमोदकाचे नाव :–श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेवुन ५७ वी प्रौढ गट राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी रुपये दोन लाख आर्थिक सहाय्य देणे मान्य करीत नाही.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९ :–** पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे.

---

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–</u>याबाबतीत मी मा. महापौर महोदयांना विनंती करेल की, सर्व कर्मचा–यांना पदोन्नती मिळावी यासाठी अनुक्रमाने सर्व कर्मचा–यांचे एकत्रित प्रस्ताव महासभेपुढे आणा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>हा विषय पारीत करायचा आहे. कारण पात्र कर्मचा–याना पदोन्नती देण्यासाठी महासभेने अट शिथील करुन ठराव पारीत केलेला आहे. शासन आणि प्रशासन म्हणजेच सत्ताधारी किंवा लोकप्रतिनिधी, आणि अधिका–यांमध्ये चर्चा झालेली आहे की, पहिले पात्र कर्मचारी जे अटी, शर्ती पुर्ण करणारे आहेत १९९१ च्या नियमाप्रमाणे आणि मग या अटी शर्ती पुर्ण केलेली कर्मचारी घेण्यात येतील आणि त्यानंतर लगेचच अट शिथील केल्यानुसारचे जे कर्मचारी आहेत ते पुढच्या महासभेत, मला वाटते की, तुमच्याकडे पुर्ण प्रस्ताव तयार आहेत. पात्र. किती आहेत आणि अट शिथील केल्यानुसार पात्र किती होतात. तर ते पुढच्या महासभेत आपण लवकरात लवकर प्रस्ताव आणावेत.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–</u>ठिक आहे ना?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>हा जो मुद्दा आलेला आहे, सगळया कर्मचा–यांना पदोन्नती मिळावी म्हणुन हा प्रस्ताव पुढच्या सभेत घेण्यात यावा अशी मी कृपया विनंती करतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, पुढील महासभेत सर्व कर्मचा–यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव एकत्रितरित्या महासभेपुढे आणला जावा नाहीतर दुस–या कर्मचा–यांबरोबर अन्याय होईल.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:–</u>सर्वांचा एकत्रित प्रस्ताव आणा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>बाकी लोकांवर अन्याय का होवु देत आहात? बाकीचे लोक मरतील त्यांना कुणी पदोन्नती देणार नाही. हे नंतर त्यांचा प्रस्ताव आणणार नाहीत. म्हणुन सर्वांचा एकत्रितपणे प्रस्ताव आणा.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>मा. आयुक्त साहेब, सर्व कर्मचा–यांच्या पदोन्नतीचा एकत्रित प्रस्ताव महासभेपुढे आणला जावा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>एप्रिल महिन्याच्या महासभेत सर्व कर्मचा–यांचा प्रस्ताव एकत्रितपणे महासभेत आला पाहिजे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, प्रारुप आपण पुर्वी प्रसिध्द केला होता. आता हा संपुर्ण नविन प्रस्ताव पुढच्या सभेत आम्ही सादर करु.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>सर्व कर्मचा–यांचा एकत्रित प्रस्ताव पुढील महासभेत घेवुन या.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u> सर्व कर्मचा–यांचा एकत्रित प्रस्ताव पुढील महासभेत घेवुन या.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u> सर्व कर्मचा–यांचा एकत्रित प्रस्ताव पुढील महासभेत घेवुन या.

<u>महापालिका सचिव:–</u>वगळायचा? सर्वसंमतीने

<u>काही सदस्य :–</u>वगळा.

<u>महापौर :–</u> सदरचा विषय वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १९** :– पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गाच्या रिक्त पदावर पदोन्नती देण्यासाठी मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) मधील तरतुदीन्वये दिनांक १२/१/२०१० ऑक्टोंबर २००८ रोजीच्या आदेशान्वये पुढीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) उप आयुक्त (परिवहन) | – | मा. आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा समिती अध्यक्ष |
| २) उप आयुक्त (मुख्यालय) | – | सदस्य सचिव |
| ३) उप आयुक्त (आरोग्य) | – | सदस्य |
| ४) मुख्य लेखा परिक्षक | – | सदस्य |
| ५) मागासवर्गीय अधिकारी (अधिक्षक किंवा त्यापेक्षा उच्च पदावरील) | – | सदस्य |

उपरोक्त समितीची बैठक मा. उप आयुक्त (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली दि. १०/०२/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता त्यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री. संतोष देहेरकर

उप आयुक्त (परिवहन — मा.आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा समिती अध्यक्ष

२) श्री. विजयकुमार म्हसाळ
उप आयुक्त (मुख्यालय) — सदस्य सचिव

३) श्रीम. संगिता धायगुडे
उप आयुक्त (आरोग्य) — सदस्य

४) श्री. अनुदीप दिघे
मुख्य लेखा परिक्षक — सदस्य

५) श्री. रमेश शिर्के, प्र. कार्य. अभियंता
मागासवर्गीय अधिकारी — सदस्य

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवा शर्ती नियम प्रशासकीय ठराव २५, दि. ३/१२/१९९६ अन्वये मंजुर करून शासनाकडे मंजुरीस्तव सादर केलेले आहेत. शासनाकडून मंजुरी अप्राप्त आहे.

(सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) प्रारूप नियम—२००८ मा. महासभा ठराव क्र. २२, दिनांक २०/७/२००९ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार राजपत्रामध्ये प्रारूप नियम प्रसिध्द करून त्याबाबत सर्व संबंधितांकडून हरकती/सुचना मागविणेत आल्या होत्या. विहित कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या हरकती/सूचना बाबत दिनांक १५/१/२०१० रोजी विशेष छाननी समितीने सुनावणी दिलेली आहे. प्राप्त झालेल्या हरकती/सूचनाबाबत आवश्यक ते निर्णय घेवुन प्रस्ताव मा. महासभेसमोर अंतिम मंजूरीसाठी ठेवण्याची कार्यवाही सुरू आहे.

सबब, सदरच्या प्रारूपास मा. महासभेने अंतिम मान्यता दिलेली नसल्याने, १९९६ च्या सेवा भरती नियमाचे आधारे तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीचा पहिला टप्पा म्हणून गट क व ड अंतर्गत म्हणजे वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लेखा परिक्षक, कनिष्ठ लिपीक व मुकादम या संवर्ग पदावर पदोन्नती देणेबाबत पुढीलप्रमाणे विचारविनिमय करण्यात आला.

## वरिष्ठ लिपीक

वरिष्ठ लिपीक (०३ पदे)

**वेतनश्रेणी रू. ५२००—२०२०० ग्रेड वेतन २४००**

आस्थापनेवर वरिष्ठ लिपीकाची एकूण — २५ पदे मंजूर आहेत.

सेवाशर्ती नियमानुसार २५ टक्के सरळसेवा व ७५ टक्के पदोन्नती असे प्रमाण निश्चित केलेले आहे. सरळसेवेसाठी ०६ पदोन्नतीसाठी १९ पदे उपलब्ध होतात. त्यापैकी एकूण १६ पदे भरलेली आहेत. सबब, पदोन्नतीसाठी ०३ पदे उपलब्ध आहेत.

महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाने पदोन्नतीची १०० बिंदू नामावली ठेवलेली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे आरक्षण आहे.

| | | |
|---|---|---|
| अनु. जाती | — | ०० |
| अनु. जमाती | — | ०० |
| विजा (अ) | — | ०० |
| भ.ज.(ब) | — | ०० |
| भ.ज.(क) | — | ०१ |
| भ.ज.(क/ड) | — | ०० |
| भ.ज.(ड) | — | ०० |
| विमाप्र | — | ०० |
| खुला | — | ०२ |
| एकूण | — | ०३ |

प्रस्तावित सेवा प्रवेश नियमामध्ये पदोन्तीसाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव विहित केलेला आहे.

**''एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण**
**लिपीक या पदावरील ०३ वर्षाचा अनुभव ''**

सदर पदावर पदोन्नतीसाठी लिपिक संवर्गामधून विचारक्षेत्र घेण्यांत आलेले आहे.

विभागीय पदोन्नती समितीने विचारक्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे ०५ वर्षाच्या गोपनीय अहवालाचे वाचन करून प्रत्येक वर्षाची प्रतवारी ठरविली. त्यानुसार सरासरी प्रतवारी निश्चित केली व पदोन्नती बाबत निर्णय घेण्यात आला.

पदोन्नतीच्या प्रस्तावातील विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल, परिविक्षाधीन कालावधी, निलंबन, चौकशी व मागासवर्गीय आरक्षण याबाबचे कागदपत्र तपासुन खातरजमा केलेली आहे. विचारक्षेत्रातील अधिकारी यांचे विरूध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही. सबब

समितीने विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांचे गेल्या ०५ वर्षाचे गोपनीय अहवाल विचारांत घेऊन सरासरी प्रतवारीनुसार खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

भ. ज. (क) — ०१ पद

१) श्री. उत्तम नामदेव गढरी

यांचे मागील ०५ वर्षाचे गोपनिय अहवालाची सरासरी प्रतवारी (ब+) येते. सबब त्यांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविणेबाबत समितीने एकमताने निर्णय घेतला.

खुला — ०२ पद

१) श्री. मधुकर बी. कनोजे

यांचे मागील तीन वर्षाचे गोपनीय अहवालाची प्रतवारी (क) येते. सबब त्यांना पदोन्नतीसाठी अपात्र ठरविण्याबाबत समितीने एकमताने निर्णय घेतला.

२) श्री. सुंदर गजवानी

यांचे मागील ०५ वर्षाचे गोपनिय अहवालाची सरासरी प्रतवारी (अ) येते. सबब त्यांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविणेबाबत समितीने एकमताने निर्णय घेतला.

३) श्रीम. रोमा हिंगोरानी

यांचे मागील ०५ वर्षाचे गोपनिय अहवालाची सरासरी प्रतवारी (ब) येते. सबब त्यांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविणेबाबत समितीने एकमताने निर्णय घेतला.

## कनिष्ठ लेखा परिक्षक

कनिष्ठ लेखा परिक्षक (०१ पदे)
**वेतनश्रेणी रू. ५२००—२०२०० ग्रेड वेतन २४००**

आस्थापनेवर कनिष्ठ लेखा परिक्षकाची एकूण — ०६ पदे मंजूर आहेत.

सेवाशर्ती नियमानुसार २५ टक्के सरळसेवा व ७५ टक्के पदोन्नती असे प्रमाण निश्चित केलेले आहे. त्यानुसार सरळ सेवेसाठी ०१ पद व पदोन्नतीसाठी ०५ पदे उपलब्ध होतात. एकूण ०५ पदांपैकी ०४ पदे भरलेली असुन पदोन्नतीसाठी ०१ पद उपलब्ध आहे.

महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाने पदोन्नतीची १०० बिंदू नामावली ठेवलेली आहे. त्यानुसार खालिलप्रमाणे आरक्षण आहे.

| | | |
|---|---|---|
| अनु. जाती | — | ०० |
| अनु. जमाती | — | ०० |
| विजा (अ) | — | ०० |
| भ.ज.(ब) | — | ०० |
| भ.ज.(क) | — | ०० |
| भ.ज.(क/ड) | — | ०० |
| भ.ज.(ड) | — | ०० |
| विमाप्र | — | ०० |
| खुला | — | ०१ |
| एकूण | — | ०१ |

प्रस्तावित सेवा प्रवेश नियमामध्ये पदोन्नतीसाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव विहित केलेला आहे.

**''एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण**
**लिपीक पदावरील ३ वर्षाचा मुख्य लेखा परिक्षक यांचे अधिनस्त कामचा अनुभव''**

मुख्य लेखा परिक्षक यांचे अधिनस्त काम केलेला लिपीकांचा अभिलेख उपलब्ध नाही. म्हणून मा. महासभेच्या अधिन राहुन सदर पदावर लिपीक संवर्गामधून सेवा जेष्ठतेनुसार विचारक्षेत्र घेण्यात आलेले आहे.

विभागीय पदोन्नती समितीने विचारक्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे ०५ वर्षाच्या गोपनीय अहवालाचे वाचन करून प्रत्येक वर्षाची प्रतवारी ठरविली त्यानंतर सरासरी प्रतवारी निश्चित केली व पदोन्नती बाबत निर्णय घेण्यात आला.

पदोन्नतीच्या प्रस्तावातील विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल, परिविक्षाधीन कालावधी, निलंबन, चौकशी व मागासवर्गीय आरक्षण याबाबचे कागदपत्र तपासुन खातरजमा केलेली आहे. विचारक्षेत्रातील अधिकारी यांचे विरूध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही. सबब समितीने विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांचे गेल्या ०५ वर्षाचे गोपनीय अहवाल विचारांत घेऊन सरासरी प्रतवारीनुसार खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

**खुला — ०१ पद**

१) श्री. लाल टी. भागचंदानी

यांचे मागील ०५ वर्षाचे गोपनिय अहवालाची सरासरी प्रतवारी (ब+) येते. सबब त्यांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविणेबाबत समितीने एकमताने निर्णय घेतला.

## कनिष्ठ लिपीक

लिपीक ३४ पदे
**वेतनश्रेणी रू. ५२००—२०२०० ग्रेड वेतन १९००**

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांमधुन श्रेणी ३ मधील ''लिपीक'' या पदावर पदोन्नती देण्यासाठी प्रस्ताव तयार करणेसंबंधी पुढील मुद्याचा विचार करणेत आलेला आहे.

१) मा. महासभा ठराव क्र. १३, दिनांक १९/६/२००९ अन्वये वर्ग — ४ च्या विविध संवर्गातील ८ कर्मचाऱ्यांना ''लिपीक'' या पदावर पदोन्नती देताना १९९६ च्या सेवा शर्ती नियमामधील तरतुदीनुसार अर्हता धारण केलेल्या कर्मचाऱ्यांचे विचार क्षेत्र विचारात घेवून केलेला आहे. व त्यास मा. महासभेने मान्यता दिलेली आहे.

२) तत्पुर्वी मा. महासभा ठराव क्र. ४६, दिनांक ९/१/२००९ रोजी १९९६ च्या सेवा भरती नियमात किरकोळ बदल करणेबाबत मंजुरी दिलेली आहे. तथापि, सदर ठराव क्र. ४६, दिनांक ९/१/२००९ मध्ये १९९१ व १९९३ मधील प्रस्तुत शासन निर्णयामधील दुरूस्ती (प्र. मि. ४० शब्द इंग्रजी आणि ३० शं. मराठी) ऐवजी ''(प्र. मि. ४० शब्द इंग्रजी किंवा ३० शब्द मराठी)'' या बाबत केलेल्या उल्लेखासंबंधी भाष्य केलेले नाही.

३) ठराव क्र. ४६, दिनांक ९/१/२००९ च्या गोषवाऱ्या समवेत (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) प्रारूप नियम—२००८ मा. महासभेसमोर प्रस्तावित केलेली होती त्याबाबत मा. महासभेने प्रढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे. **''शासनाचे महानगरपालिका (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) प्रारूप नियम—२००८ च्या आधारे महापालिका अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी नव्याने तयार करण्यात आलेले प्रारूप सेवा भरती नियम पुढच्या सभेत स्वतंत्र प्रस्ताव म्हणुन आणण्यास प्रशासनास निर्देश देत आहे''**

४) उपरोक्त नमुद ठराव क्र. ४६, दिनांक ९/१/२००९ अन्वये भरती नियमात केलेले बदल **(सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) प्रारूप नियम—२००८ मध्ये अंतर्भूत केलेले आहेत.**

उपरोक्त सर्व मुद्यांची चर्चा करून व विचार विनिमय करून ''लिपीक'' या संवर्गाच्या पदोन्नतीचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे तयार केलेला आहे.

आस्थापनेवर लिपीक — २४६, टंकलेखक — ०९, व मिटर वाचक — ३० अशी मिळून २८५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २०७ पदे भरलेली आहेत. व रिक्त पदे ७८ आहेत.

सेवा शर्ती नियमानुसार उपलब्ध रिक्त पदांच्या २५ टक्के पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. रिक्त पदे ४६ आहेत. तथापि, सरळसेवेने जास्त उमेदवार सामावून घेतल्यामुळे प्रत्यक्षात ३४ पदे रिक्त आहेत.

मागासवर्ग कक्षाने लिपीक पदाची एकूण ७१ पदोन्नतीच्या पदांची बिंदू नामावली ठेवलेली आहे. त्यानुसार अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अनु. जाती | — | ०० |
| अनु. जमाती | — | ०५ |
| विजा (अ) | — | ०३ |
| भ.ज.(ब) | — | ०२ |
| भ.ज.(क) | — | ०१ |
| भ.ज.(ड) | — | ०१ |
| विमाप्र | — | ०१ |
| खुला | — | २१ |

| एकूण | — | ३४ |
|---|---|---|

उपरोक्त अनुशेष हा प्रमाणित १०० बिंदू नामावलीनुसार आहे.

सेवा शर्ती नियमानुसार लिपीक पदावर पदोन्नती देण्यासाठी खालिलप्रमाणे शैक्षणिक पात्रता विहित केलेली आहे.

**''एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण**
**मराठी टंकलेखन प्र. मि. ३० शब्द व इंग्रजी टंकलेखन प्र. मि. ४० शब्द''**

सदर पदावर पदोन्नती देण्यासाठी वर्ग — ४ च्या निरनिराळया प्रशासकीय संवर्गामध्ये उपरोक्त शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सामाईक सेवा जेष्ठता यादी तयार करून सोबत जोडली आहे. (परिशिष्ट—अ)

उपरोक्त यादीत विजा (अ) या प्रवर्गाचा —०१ उमेदवार व खुला प्रवर्गासाठी परिशिष्ट — अ मधील अनु. क्र. २ ते ७ असे एकूण ०६ पात्र उमेदवाराना खुला प्रवर्गामध्ये सामावुन घेता येईल. अनुक्रमांक ८ वरील नमुद कर्मचारी यांची नियुक्ती ९/७/२००९ रोजी झालेली असुन त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेला नाही. त्यामुळे त्यांचा विचार झालेला नाही.

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र. मांक बीसीसी—२००९/प्र. क्र.२९१/०९/१६—ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ नुसार ''मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्या खेरीज या पुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येऊ नये.'' असे नमुद केले आहे. उपरोक्त नमुद ०६ उमेदवारांपैकी ०२ उमेदवारांची (परिशिष्ट—अ मधील जेष्ठता यादी क्र. २ व ५) यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेली आहे. तथापि अनु. जाती प्रवर्गामध्ये रिक्त पदे उपलब्ध नसल्याने त्यांना खुला प्रवर्गामध्ये सामावुन घेता येईल. आणि परिशिष्ट — अ यादीमधील अनु. क्र. ३ व ४ खुला प्रवर्गमध्ये असल्याने त्यांना खुला प्रवर्गामध्ये पदोन्नती देता येईल. परिशिष्ट—अ मधील अनु. क्र. १ वरील उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. सबब, त्यांना वि. जा. (अ) या प्रवर्गाच्या रिक्त पदावर सामावून घेता येईल.

परिशिष्ट—अ मधील अनु. क्र ६ व ७ वरील उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसल्याने आणि अनु. क्र. ८ वरील उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेला नसल्याने त्यांचे विचारक्षेत्र घेण्यात आले नाही.

वरील उमेदवारांचे विचारक्षेत्र घेण्यांत यावे. सदरहु सर्व कर्मचारी हे वर्ग — ४ चे असल्यामुळे त्यांचे गोपनीय अहवाल लिहिले जात नाहीत. सबब, सेवा जेष्ठतेनुसार त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यांत यावा.

पदोन्नतीच्या प्रस्तावातील विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचे परिविक्षाधीन कालावधी, निलंबन, चौकशी व मागासवर्गीय आरक्षण याबाबतचे कागदपत्र तपासुन खातर जमा केलेली आहे.

**अनु.जमाती — ०५ पदांसाठी**

उमेदवार उपलब्ध नाही.

विजा (अ) — ०१
श्री. उल्हास सिताराम राठोड
पदोन्नतीची विहित अर्हता पुर्ण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

**भ.ज.(ब) — २**
उमेदवार उपलब्ध नाही

**भ.ज.(क) — ०१**
उमेदवार उपलब्ध नाही

**भ.ज.(ड) — ०१**
उमेदवार उपलब्ध नाही

**विमाप्र — ०१**
उमेदवार उपलब्ध नाही

**खुला — ०६**
१) श्री. मनोज विष्णू जाधव
पदोन्नतीची विहित अर्हता पुर्ण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२) श्री. शांताराम डी. चौधरी
पदोन्नतीची विहित अर्हता पुर्ण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३) श्री. गिरीष एन. दावानी
पदोन्नतीची विहित अर्हता पुर्ण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

४) श्री. महेश पी. वालानी
पदोन्नतीची विहित अर्हता पुर्ण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

५) श्री. गोपाळ भवरसिंग करोसिया
जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे अपात्र.
६) कु. बबीता राजू ढकोलीया
जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे अपात्र.
७) श्री. ज्ञानेश्वर आर. राऊत
परिविक्षाधिन कालावधी पुर्ण झाला नाही. सबब, खुला ठेवण्यात आला आहे.

## रोड मुकादम

मुकादम बांधकाम (०६ पदे)

**वेतनश्रेणी रू. ४४४०–७४४० ग्रेड वेतन १३००**

आस्थापनेवर मुकादम या पदाची एकूण ६१ पदे मंजुर आहेत. प्रमाणित बिंदू नामावलीनुसार ५५ पदे भरलेली असुन अनु. जमाती, वि.जा (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) या प्रवर्गाची रिक्त ०६ पदे आहेत. सेवा शर्तीनुसार मुकादमाची सर्व पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत.

| | | |
|---|---|---|
| अनु. जाती | — | ०० |
| अनु. जमाती | — | ०२ |
| विजा (अ) | — | ०२ |
| भ.ज.(ब) | — | ०१ |
| भ.ज.(क) | — | ०१ |
| भ.ज.(क/ड) | — | ०० |
| भ.ज.(ड) | — | ०० |
| विमाप्र | — | ०० |
| खुला | — | ०० |
| एकूण | — | ०६ |

सदर सेवा शर्ती नियमानुसार मुकादम या पदावर पदोन्नतीनी देण्यासाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता विहित केलेली आहे.

**''मजूर आणि इतर तत्सम प्रवर्गामध्ये अंखडपणे १० वर्ष सेवा आवश्यक''**

मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवाला दिनांक ०१ जानेवारी, २००८ ची अंतिम सेवा जेष्ठता यादी दि. १७/१०/२००८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार सेवा जेष्ठता यादी व सेवा शर्ती नियमावलीनुसार अर्हता धारण करणारे अनु. जमाती ०२, वि.जा.(अ) ०१ व भ.ज.(ब) ०१ या प्रवर्गासाठी मजूर संवर्गाच्या सेवा जेष्ठता यादीमधील अनुक्रमांक ३, २७, १९४, ३४०, असे एकूण ०४ पदांसाठी उमेदवार उपलब्ध आहेत. तथापि अनु. १९४ वरील उमेदवाराची जात प्रमाणपत्र पडताळणी वैध झालेली आहे. उर्वरीत अनु. ३, २७ व ३४० वरील उमेदवारांची जात पडताणी झाल्याची दिसुन येत नाही. सबब, सदरच्या प्रवर्गातील पदे खुला ठेवण्यात येत आहे.

वरील उमेदवारांचे विचारक्षेत्र घेण्यांत यावे. सदरहु सर्व कर्मचारी हे वर्ग – ४ चे असल्यामुळे त्यांचे गोपनीय अहवाल लिहिले जात नाहीत. सबब, सेवा जेष्ठतेनुसार त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यांत यावा.

पदोन्नतीच्या प्रस्तावातील विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचे परिविक्षाधीन कालावधी, निलंबन, चौकशी व मागासवर्गीय आरक्षण याबाबतचे कागदपत्र तपासुन खातर जमा केलेली आहे.

**अनु. जमाती – ०२**

उमेदवार उपलब्ध नाही.

**वि.जा. (अ) – ०१**

श्री. विश्वनाथ गणपत राठोड

पदोन्नतीची विहित अर्हता पुर्ण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

**भ. ज. (ब) – ०१**

उमेदवार उपलब्ध नाही.

**भ. ज. (क) – ०१**

उमेदवार उपलब्ध नाही.

**प्रशासकीय ठराव क्र. २५, दिनांक १३/१२/१९९६ अन्वये सादर केलेल्या सेवा शर्ती नियमास शासनाच्या मंजूरीच्या अधिन राहुन तसेच न्यायालयीन प्रकरणे, चौकशी व शासन आदेशास अधिन राहुन विभागीय पदोन्नती समितीने खालील निवड सुचीस तात्पुरत्या स्वरूपात एकमताने मान्यता दिली.**

# निवड सुची

## वरिष्ठ लिपीक

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुदर गजवानी | १९ | खुला |
| २ | श्रीम. रोमा हिंगोरानी | २९ | खुला |
| ३ | श्री. उत्तम नामदेव गढरी | १८६ | भ.ज. (क) |

## कनिष्ठ लेखा परिक्षक

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. लाल टी. भागचंदानी | ३० | खुला |

## कनिष्ठ लिपीक

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | नियुक्ती दिनांक | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. उल्हास सिताराम राठोड | मजूर | ७/३/९२ | वि.जा. (अ) |
| २ | श्री. मनोज विष्णू जाधव | शिपाई | ३०/०६/९२ | खुला |
| ३ | श्री. शांताराम डी. चौधरी | शिपाई | ६/२/९३ | खुला |
| ४ | श्री. गिरीष एन. दावानी | शिपाई | २०/३/९९ | खुला |
| ५ | श्री. महेश पी. वालानी | सफाई कामगार | २२/२/०० | खुला |

## रोडमुकादम

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. विश्वनाथ गणपत राठोड | १९४ | वि. जा. (अ) |

मुंबई प्रांतिक महानरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती प्राधिकरण मा. महासभा आहे.

तरी न्यायालयीन प्रकरणे, चौकशी व शासन आदेशास अधिन राहुन विभागीय पदोन्नती समितीचा प्रस्ताव मंजुरीकरीता मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र: ९० अ दिनांकः—१०/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी.मोरे

ही महासभा महापालिका सेवेतील पात्र कर्मचा—यांना निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे पदोन्नती देण्याचा प्रस्ताव सर्व पात्र कर्मचा—यांचे एकत्रित प्रस्ताव माहे एप्रिल महिन्याच्या सभेत आणण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—पहिली सभा समाप्त

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटाः—</u>मा. महापौर महोदया, आमचे सन्माननिय सदस्य श्री. मोहन साधवानी यांचा आज वाढदिवस असल्यामुळे सभागृहात मिठाई वाटण्यास परवानगी दिली जावी.

सांयकाळी वाजता महापौर श्रीमती राजश्री चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/१०/२०१०

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१०/२०१० रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.</u>

वि—६

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक २०/१०/२०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

३. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

४. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३९ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४१ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४२ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४३ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५० | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५१ | श्री. किशोर जग्यासी |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५२ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५३ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १८ | श्री. राजू जग्यासी | ५४ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १९ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५५ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २० | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५६ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २१ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५८ | श्री. मोहन साधवाणी |
| २३ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २४ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६० | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २५ | श्री. लाल पंजाबी | ६१ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २६ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६२ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६३ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | श्रीमती शकुंतला पाटील | ६४ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २९ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६५ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३० | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६६ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३१ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६७ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३२ | श्री.एडके गणपत गोविंद | ६८ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३३ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६९ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३४ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ७० | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३५ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ७१ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३६ | श्रीमती पंचशिला नाना पवार | ७२ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३७ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | | |
| ३८ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, २. श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद, ३. श्री. राम (चार्ली) पारवानी, ४. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ५. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ६. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ७. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, ८. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, ९. श्री. प्रकाश गणपत सावंत

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
४. श्रीमती संगिता धायगुडे , उप–आयुक्त
५. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. हरेश इदनानी, लेखा अधिकारी
८. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. एम.जी.गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
११.श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
१२.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१३.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१४.श्री. भास्कर मिरपगारे, अग्निशमन अधिकारी
१५.श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
१६.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१७.श्री. गंगारामानी, उप अभियंता, विदयुत
१८.श्री. संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना
१९.श्री. बुडगे, कनिष्ठ अभियंता, नगररचनाकार

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.१२ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

➪ <u>विषय क्र. १ :—</u> उल्हासनगर कॅम्प -३ येथिल अस्तित्वातील सपना गार्डन येथिल भागात बहुमजली

वाहनतळ बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करणेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>मा. महापौरजी, याबाबत उत्तर कोण देणार? सपना गार्डनच्या विषया बाबत.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :— </u>सचिव साहेब एक मिनिट, मा. महापौर महोदया, मी आपल्या लक्षात आणुन देते की, मी गेल्या चार वर्षापासुन पदावर असतांना माझ्या वार्ड क्र. ७० मधील आणि पुर्ण शहरातील भुखंड वाचविण्याचे मी प्रयत्न केले आहेत. आणि वार्ड क्र. ७० मध्ये भुमाफिया येवुन तेथे जागा हडपण्याचा प्रयत्न करतात. त्याकडे आपली महापालिका का लक्ष देत नाही? महापालिका मला अजिबात साथ देत नाही. कार्यादेश असतांना देखील तेथे काम का होत नाही? आणि मला असे माहित पडले की श्री. विजय ठाकुर हे उप—महापौरांचे भाऊ आहेत आणि ते विनाकारण माझ्यावर आरोप करतात आणि माझ्यावर व माझ्या पतीवर खंडणीचा व अपहरणाचा गुन्हा दाखल करतात. असे भुमाफिया किती आले आणि गेले? पण मी माझे नागरीकांना साथ दिली आहे. पदाचा गैरवापर केला नाही.,पदावर बसून,पदाचा गैरवापर करून भुमाफीया जागा हडप करण्याचा प्रयत्न करतात, प्रशासन काय झोपले आहे काय? असे किती खाल्ले सगळयांनी? हिल लाईन पोलिस स्टेशन येथे माझी तक्रार केली आहे, विठ्ठलवाडी पोलिस स्टेशनला माझी तक्रार केली आहे. माझ्या प्रमाणिकपणेचा मला हा फायदा देत आहेत का? आयुक्त साहेब मला उत्तर दया. तुमचे लक्ष कोठे आहे पदावर बसून ? का अधिका—यांना तुम्ही सूचना देत नाहीत? कार्यादेश माझ्याकडे असून मी ते संपुर्ण सभागृहास दाखविते. आणि जर माझ्या नादाला लागले तर खबरदार? मी शिवसेनेची नगरसेविका आहे, माजी महापौर आहे. माझ्यावर कोणी आरोप केले तर ते खपणार नाही. जो आरोप करेल त्याला मी बांगडया घातल्याशिवाय राहणार नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>विषय, दोन भुखंडावर मॉडिफीकेशन करुन बांधा वापरा व हस्तांतरीत करा याबाबतचे प्रोजेक्ट आणले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, मी गेल्या चार वर्षापासुन एक भुखंड वाचविण्यासाठी प्रयत्न करत आहे. आणि त्यांच्यावर व त्यांच्या पतीवर आरोप केले जातात खोटेनाटे आरोप केले जातात, हिललाईन पोलिस स्टेशन व विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन खोटेनाटे खंडणीचे आरोप केले जातात. एखादा नगरसेवक भुखंड वाचविण्याचा प्रयत्न करतो हे चुक आहे का? त्याठिकाणी संरक्षण भिंत बांधण्यासाठी प्रशासनाने कार्यादेश सुध्दा दिले आहेत. प्रशासनाने त्याबाबत कार्यादेश सुध्दा काढलेले आहे. तुम्ही काय करत आहेत? का दिले नाही? ठिक आहे नाही झाले, जर तो कुणाचाही प्लान असेल कायदेशीर असेल तर तो प्लान मंजुर करा. त्यांनी का त्याचा त्रास घ्यायचा? आणि तुम्हाला भुखंड वाचवायचे असतील तर कशाला आणता हे प्रोजेक्ट? तुम्हांला भुखंड वाचवायचेच नाहीत, एक नगरसेविका संघर्ष करते. त्या माजी महापौर आहेत. सतत सांगत असतात तरी तुमच्याकडुन भुखंड वाचविले जात नाहीत. यापुर्वी एका भुमाफियाने त्यांच्यावर तसा प्रयत्न केला होता पोलीसांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तो नाद सोडला. आता दुसरा प्रयत्न करतोय

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :—</u>त्यांना शौचालयाची जागा सुध्दा कमी पडते. तेथे महिला येतात जातात बाजुला शौचालय आहे, ती घाण सुध्दा या पदाधिका—यांना कमी पडते. माझ्याजवळ प्रुफ आहे. अगदी गरीब लोकांना सुध्दा छळले आहे या पदाधिका—यांनी . जो कोणी माझ्या नादाला लागेल त्याचे अजिबात चांगले होणार नाही. मी त्याला बांगडया घातल्याशिवाय राहणार नाही. आहे माझ्याकडे कार्यादेश.

<u>सदस्य श्री. अनिल (विदयार्थी) ऐलानी :—</u>आयुक्त साहेब, उत्तर दया.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>मा. महापौर व आयुक्त साहेब आपण या प्रश्नाचे गांभीर्याने लवकरात लवकर उत्तर दयावे.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :—</u>आणि फक्त उत्तर देवुन चालणार नाही. तर आम्हांला याची जाणीव झाली पाहिजे याची

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>सन्माननिय महापौर, उप—महापौरजी, उल्हासनगर महापालिका या क्षेत्रातील जी आरक्षणे आहेत जी आपल्या मालकीची आहेत त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे. जे प्लॉट रिजर्व आहेत परंतु नगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले नाहीत, खाजगी जागेवर जी आरक्षणे असतील त्याचे भुसंपादन करणे आधी आवश्यक असते. त्या

जागेचा मोबदला देवुन त्याचा ताबा आपण घेणे आवश्यक असते. त्यानंतर आपण त्याचा विकास करु शकतो. आता सन्माननिय सदस्या यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याबाबतची कागदपत्र व वस्तुस्थिती आम्ही तपासुन घेतो. जी जागा आहे ती कोणाच्या मालकीची आहे, ज्या जागेवर आरक्षण आहे ती कशासाठी राखीव आहे. आणि त्यानंतर.....

**सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–**तपासुन घेता, तुम्ही हजार वेळा तपासुन घेतले आहे, हजार वेळा तेथे जावुन तपासुन पाहिले आहे की ती महापालिकेची जागा आहे. आणि तेथे खेळाचे मैदान आहे. काय तुम्ही परत परत तपासुन पाहता? आम्हांला तेच तेच उत्तर तुम्ही देत आहात.

**श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–**आरक्षण असेल परंतु ती जागा महापालिकेकडे हस्तांतरी झाली आहे की नाही हे तपासून बघायचे आहे.

**सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–**सर्व महापालिकेकडेच आहे. सगळे व्यवस्थित आहे आणि यामध्ये तुमचा सुध्दा हात आहे.

**श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–**ती जागा महापालिकेकडे जरी हस्तांतरीत झालेली असेल तरी त्याला फेन्सींग करणे वगैरे याबाबतचे निर्देश आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाला देवु. फक्त आमचे म्हणणे एवढेच आहे की ती जागा महापालिकेकडे हस्तांतरीत झाली आहे की नाही ती कागदपत्रे तेवढी आम्हाला तपासु दया दृ

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती चैनानी, श्रीमती शकुंतला पाटील, कु. शकुंतला जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**माजी महापौर ज्या जागेचा उल्लेख करत आहेत त्या जागेची फेन्सीग करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन मंजुरी मिळाली की नाही ते विचारा?

**सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, उल्हासनगर कॅम्प नं. ३ येथिल आता जो सचिव साहेबांनी प्रश्न वाचलेला आहे, सपना गार्डन येथिल बहुमजली वाहनतळ बांधण्यासाठी व हस्तांतरीत साठी, तर मला हे विचारायचे आहे की याचे उत्तर कोण देणार? नगररचनाकार आले आहेत का की आयुक्त साहेब उत्तर देणार आहेत ? उत्तर कोण देणार आहे ते सांगा. प्रश्न टाकतात आणि हजेरी नाही, कशाला प्रश्न टाकतात मग? उत्तर दया आयुक्त साहेब, उत्तर दया.सपना गार्डनजवळ पार्कींग करण्याची एवढी काय गरज पडली आहे?

**श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–**सन्माननिय महापौर, उप–महापौरजी,.........

**सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–**सपना गार्डनजवळ पार्कींग करण्याची काय गरज पडली आहे? लहान मुलांच्या भावनांशी तुम्ही खेळत आहेत. इतर ठिकाणी जागा नाही आहे काय?

**सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्रीमती निर्मलेताईंनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याचे प्रथम उत्तर देण्यात यावे.

**सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–**उत्तर दया आयुक्त साहेब. एवढी काय आवश्यकता होती की सपना गार्डन तोडुन तेथे बीओटी तत्वावर पार्किंगसाठी जागा बनविण्यात यावी, एवढी काय गरज पडली? इतर ठिकाणी जागा नाही आहे काय? हा प्रस्ताव कुणी आणला आहे? जागा नसेल तर नाही सांगा माझ्याकडे उत्तर आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**सन्माननिय महोदया, आज या ठिकाणी सर्व सदस्यांच्या भावना अति म्हणजे एकदम टोकाला गेल्या आहेत.

**सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, उत्तर दया, बसु नका तुम्ही. आम्ही प्रश्न टाकलेला आहे, उत्तर दया, आम्ही उत्तर विचारत आहोत तुम्हांला. उत्तर कोण देणार आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>मी तुम्हांला विनंती करतो की, एक एक सदस्यांना बोलु दया, मग तुम्ही बोला ना? आता श्रीमती निर्मले महोदयांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर येवु दया मग तुम्ही बोला. कारण दोघे दोघे बोलल्यानंतर कसे होईल? एक एक सन्माननिय सदस्यांचे उत्तर येवु दया.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–</u>माझा त्यांच्या सारखाच प्रश्न आहे, माझा कुठे वेगळा प्रश्न आहे. मी पण शहरासाठी बोलत आहे त्या सुध्दा शहरासाठी बोलत आहेत. एकच प्रश्न आहे. त्या काकुळतेने बोलत आहेत, सत्तेत असतांना त्यांचा अपमान होत आहे. त्यांच्याविरुध्द तक्रार झालेली आहे. कारवाई करावयास पाहिजे.या अधिका–यांवर, काय कारवाई केलीत आतापर्यंत, त्या माजी महापौर आहेत त्या. आयुक्त साहेब उत्तर दया याचे उत्तर कोण देणार आहे? शिवसेनेच्या माजी महापौर आहेत त्या सत्ताधारी पक्षाच्या सदस्या आहेत त्या त्यांना काकुळतेने यावे लागत आहे तर आमच्या सारख्या सदस्यांचे काय करणार तुम्ही ?

<u>सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे :–</u>वर व्यासपीठावर जे सन्माननिय सदस्य बसले आहेत त्यांचा धिक्कार असो.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–</u>उत्तर दया. आणि जागा का नाही ? हीच जागा बीओटी तत्वावर का दयायची ? दुस–या ठिकाणी जागा का नाही? लहान मुलांच्या भावनाशी खेळले जात आहे. शहरातील किती जागा हडपायच्या? दया उत्तर दया. आणि इतर ठिकाणी वाहनतळाला जागा होती की नव्हती याचे उत्तर दया, नसेल तर माझ्याकडे उत्तर आहे.

<u>श्री. गिरगांवकर (कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):–</u>सन्माननिय महापौर महोदया, आदरणीय उप–महापौरजी, आयुक्त साहेब, नगरसचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सभागृहातील माजी महापौर महोदया श्रीमती विद्याताई निर्मले यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता की शाळेतील ग्राउंड आहे त्याठिकाणी कंपाउंड बांधायचे त्या कामाची वर्कऑर्डर दिली आहे परंतु प्रत्यक्षात काम चालु असतांना त्याठिकाणी जागेच्या मालकीसाठी जो प्रश्न उपस्थित झालेला होता त्या अनुषंगाने टीएलआर कडून आणि यांच्याकडुन मापणी करुन आता मा. आयुक्त साहेबांनी ज्या पध्दतीने सांगितले की त्यांच्याकडुन जागा रितसर हस्तांतरीत झालेली आहे किंवा नाही , ती जागा उपलब्ध करुन घेवुन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मोकळया जागेचे तुम्ही करणार काय? महापालिकेकडे मोकळया जागा आहेत काय? आहे त्या जागा सांभाळल्या नाहीत आणि ज्या जागा नाहीत त्याची मालकी कुणाकडे आहे? म्हणजे खाजगी मालकाकडेच असावे याचा तुम्ही प्रयत्न करत आहेत का? नविन विकास आराखडा चालु आहे. त्याला तुम्ही स्कोप ठेवता काय? नविन डीपी चालु आहे. त्या डीपीमध्ये तुम्ही आरक्षण टाकणार कोठे? या विभागातील, परिसरातील, या महापालिकेतील लोकांना, सोयी सुविधा देण्यासाठी तुम्ही काय ठेवता हातात ? एक नगरसेविका भुखंड वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे आणि तुम्ही लोकांना कसे देता येईल त्याचा प्रयत्न करत आहेत. वर्कऑर्डर दिल्यानंतर तुम्ही काय वाट बघत होतात काय की कोणीतरी मालकी हक्क घेवुन येईल म्हणुन? ठिक आहे, तुम्ही ती ताब्यात घ्या ना? जो कोणी मालक असेल त्याच्याकडून जे काही रितसर असेल, त्यानुसार महापालिकेला प्रथम परवानगी आहे. परंतु तुमच्या देण्यावर फक्त हे आहे की महापालिकेच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी कसे कामी येईल. आयुक्त साहेब काय करणार त्याच्यावर, त्यांनी उत्तर विचारलेले आहे. आणि याबाबत तुम्हांला काही फरक नाही तुम्ही आपले बसले आहात, त्यांच्यावर आरोप होत आहेत. एक भुखंड वाचविण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न त्यांना खंडणी मागण्यासाठीच्या आरोपाखाली पोलिस स्टेशनला जावे लागते महापालिकेच्यावतीने त्यासाठी काय केले जाते? त्यांनी चुक केली काय? एक महापालिकेचा सदस्य म्हणून व त्याठिकाणचा रहिवासी म्हणुन त्यांनी केलेले प्रयत्न चुकीचे आहेत काय? तुम्ही अजुनही तेथे आश्वासन देता की नाही असे होणार नाही, तुमच्यावर कारवाई झाली तर त्यात प्रथम महापालिका जबाबदार राहिल.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>सन्माननिय महापौर, उप–महापौरजी,भुखंडावर आरक्षण असेल आणि भुखंड मोकळा असेल.............

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–</u> आरक्षीत भुखंड म्हणुन तेथे बोर्ड लावलेला आहे. तो हजार वेळा बोर्ड काढण्यात येतो, हजार वेळा तेथे लावतात आमचे कार्यकर्ते

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–सन्माननिय महापौर, उप–महापौरजी,मोकळी जागा असेल तर आता सुधारीत नविन आराखडा तयार करण्याचे काम चालु आहे, त्याच्यामध्ये ..........

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :– महापालिकाच भुमाफियांना मदत करते.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–सन्माननिय महापौर, उप–महापौरजी, सगळे बरोबर आहे. रिकाम्या जागा कमी आहेत म्हणुन आपल्याला सुधारीत विकास आराखडयामध्ये आरक्षण टाकतांना रिकाम्या जागांचा प्रथम विचार करावा लागेल.त्याबाबत प्रारुप विकास आराखडयात तसे त्यांचे बदल होतीलच. परंतु मालकी हक्काचा मुद्दा उपस्थित झालेला आहे, नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर होतांना, ग्रामपंचायतची नगरपालिका होतांना किंवा ग्रामपंचायतची नवि मुंबई सारखी जर विचार केला तर ग्रामपंचायतीतुन महानगरपालिका झाली. अशा वेळेस शासनाचे निर्देश आहेत की ज्या जागा ग्रमपंचायतीच्या ताब्यात असतील किंवा नगरपालिकेच्या ताब्यात असतील किंवा शासनाच्या ताब्यात असतील तर त्या आपोआप महानगरपालिकेकडे जायला पाहिजेत. याबाबत महानगरपालिकेचा पत्रव्यवहारही झालेला आहे महापालीकेतर्फे परंतु आजपर्यंत आपल्याकडे मालकी हस्तांतरीत केली किंवा असे झालेले नाही. म्हणुन याचा पाठपुरावा सुरु आहे. परंतु मोकळया जागेवर कोणतेही अनाधिकृत बांधकाम होणार नाही याची खबरदारी प्रशासनामार्फत घेण्यात येईल.

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–नाही, नाही तुम्ही आज ताबडतोब तेथे येवुन संरक्षण भिंत बांधण्याची कार्यवाही केली पाहिजे.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–ताबा असल्याशिवाय आपणांस काहीही करता येणार नाही.

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–सगळी कागदपत्र माझेकडे आहेत, कार्यादेश वगैरे आहे. तो दाखवु का तुम्हांला?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–कार्यादेश आहे परंतु ताब्याचा मुद्दा आहे.

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–साहेब, कार्यादेश वाचून बधा,

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–चालता नंबर ६२०, बॅरेक नं. १८७६ समोर, शिट क्र. ६७/६८, उल्हासनगर–५ च्या जागेच्या मालकीबाबतचा पत्रव्यवहार आपण उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, उल्हासनगर यांच्याशी दि. २६/१२/२००८ रोजी केलेला आहे. त्याबाबत त्यांच्याकडुन आपणांस अदयापपर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही. त्याचा पाठपुरावा करुन या बाबतचा ताबा किंवा मालकी हस्तांतरीत करण्याबाबत पुन्हा एकदा त्यांना आपण स्मरणपत्र पाठवु.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–अगोदर बांधकाम चालु होते. तुम्हांला जर माहित नव्हते तर ते तोडले का? त्याचा पंचनामा केला, त्याची प्रत तुमच्याकडे आहे.ती, ती महापालिकेची जागा आहे म्हणुन त्याठिकाणी फलक लावला. म्हणजे नक्की मत कुणाचे खरे आहे? तुमचे की अगोदर जे अधिकारी होते त्यांचे? मग पुर्वी फलक का लावला? अगोदर महानगरपालिकेची मालमत्ता म्हणुन फलक लावला, लावला की नाही ते बघा. म्हणजे अधिकारी बदलला कि आरक्षण बदलते, कायदा बदलतो असे काही आहे का? अगोदर तेथे महापालिकेची जागा असल्याचा फलक लावलेला आहे. पंचनामा आहे.

श्री.विजयकुमारम्हसाळ(उप–आयुक्त,मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–महानगरपालिकेची मालमत्ता नाही, मुकादमांसोबत पोलिस बंदोबस्त घेवुन आरक्षीत भुखंड असल्याचा फलक लावलेला आहे. मालकी हक्काबाबतचा यामध्ये उल्लेख केलेला नाही.

यावेळी मा. सदस्या श्रीमती ज्योती चैनानी, श्रीमती शकुंतला पाटील, कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आरक्षित भुखंड?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—भुखंड आरक्षित आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—भुखंड आरक्षित आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—हो, आरक्षित आहे. आता आपण मुद्दा उपस्थित केला आहे त्यास कुंपण घालण्याचा. कुंपण घालण्यासाठी त्या जागेची आपणाकडे मालकी असणे आवश्यक आहे. आरक्षित भुखंडाचा फलक होता हा आपला मुद्दा बरोबर आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—पत्र किती तारखेचे आहे? महापालिकेने भुखंड ताब्यात घेण्यासाठी आतापर्यंत काय कार्यवाही केली? आरक्षित आहे हे तुम्ही मान्य करता?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पत्रव्यवहार केलेला आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :— पुढे काय? १९८७ ला आरक्षण टाकले आहे. १९७४ ला विकास आराखडा मंजुर झाला. १९८७ साली उपविभागीय अधिकारी यांनी आपणाकडे पत्र लिहिले आहे की तुम्ही तुमचे भुखंड ताब्यात घ्या. एक नगरसेविका गेल्या चार वर्षापासुन तो भुखंड ताब्यात घेणेसाठी प्रयत्न करतेय. तेवढी आपली मानसिकता नाही काय?

यावेळी मा. सदस्य श्री. महेश सुखरामानी, श्रीमती जया माखिजा, श्री. शेखर यादव हे सभागृहातुन बाहेर गेले.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):— १९८७ पासुन आपण जसे म्हणता, त्यानुसार सगळया सरकारी जागा आपल्या मालकीच्या व्हावयास पाहिजे होत्या. त्याबाबतचा पत्रव्यवहार जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे किंवा ज्यांच्याकडुन आपणांस सनद मिळते त्या उपविभागीय कार्यालय यांच्याकडे वेगवेगळया भुखंडाबाबतचा पत्रव्यवहार आपणाकडुन झालेला आहे. या ठराविक भुखंडाबाबतीत म्हणाल तर याबाबतचा पत्रव्यवहार................

सदस्य श्री. धनंजय बोडारे :— त्याबाबतीत एक होवु शकते संबंधीत पोलिस स्टेशनला कळवा की तो आरक्षित भुखंड आहे, महापालिकेच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्याचा महापालिकेचा मनोदय आहे. त्यासाठी आम्ही पत्रव्यवहार करतोय. तोपर्यंत कोणीही आले आणि कोणावर तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न होता कामा नये आणि त्याचा वापर करु नका आणि कोणत्याही परिस्थितीत त्या जागेवर बांधकाम परवानगी मंजुर होवु देवु नका. जीव तोडुन त्या विभागाची नगरसेविका त्यांच्या विभागातील तो भुखंड वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे. तुम्ही संबंधीत सर्व प्रशासनाला, पोलिस यंत्रणेला, उपविभागीय अधिका—यांना पत्र लिहा. व उपविभागीय अधिका—यांकडुन तो भुखंड ताब्यात घेण्यासाठी कार्यवाही करा. तोपर्यंत त्याठिकाणी कसल्याही प्रकारचा बांधकाम नकाशा मंजुर होता कामा नये. ही महासभेत झालेली चर्चा आहे.

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :—जे भुमाफिया माझ्यावर आरोप करतात त्यांच्यावर एमआरटीपीॲक्ट खाली कारवाई झाली पाहिजे.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—मा. आयुक्त साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर दया. सभा लावता कशाला? नगररचनाकार नाहीत तर सभा लावु नका ना? त्यांच्याशी संबंधीत विषय सभा सूचनेवर आणता कशाला? उत्तरे नाही देता येत तर .

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):– सन्माननिय महापौर, उप–महापौर, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, उल्हासनगर–कॅम्प ३ मधील येथिल सपना गार्डन येथिल भागात बहुमजली वाहनतळ बीओटी तत्वावर विकसित करण्याबाबत त्याबाबतीत एमआरटीपीच्या कलम ३७ अंतर्गत दुरुस्ती करावी लागेल. आणि त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवुन मंजुर झाल्यानंतरच यावरती कार्यवाही करता येईल.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :– नाही नाही मी काय म्हणते मला हे नाही म्हणायचे की तुम्ही मंजुर करा किंवा करु नका, याबाबत मी म्हणत नाही. तसाही आमचा विरोधी पक्ष म्हणुन राष्ट्रवादी पक्षातर्फे विरोधच आहे. मला हे म्हणायचे आहे की सपना गार्डन तोडून तेथे बीओटी तत्वावर पार्किंग झोन केलेच पाहिजे काय? इतर ठिकाणी जागा नाही आहेत का? आहेत की नाही मला हे सांगा.इतर ठिकाणी जागा आहेत की नाही कि तेच तोडले पाहिजे?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, याबाबतचा ठराव अगोदर पारित झालेला आहे. त्यावेळेस राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीवाले झोपेत होते का? त्यावेळी तो प्रस्ताव पारीत करण्यासाठी याच लोकांनी हात वर केले होते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–महापौरजी, या प्रस्तावावर मतदान घ्या.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–मतदान घ्या.?

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–ही बघा, ही यादी आहे. २००७ मध्ये उल्हासनगरमध्ये प्लान तयार केला होता त्यावेळेस पाच ठिकाणी पार्किंगसाठी जागा सोडली होती. तिथल्या जागा काय झाल्या? ते झोपले होते की जागे होते ते माहित नाही मला? पण मी आता जे विचारते त्याचे उत्तर दया मला.

महापौर :–या विषयावर मतदान घेतले जावे.

यावेळी सदस्य श्री. भारत राजवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–आयुक्त साहेब, मला माझ्या प्रश्नाचे उत्तर दया. सात ठिकाणी ज्या जागा सोडलेलया आहेत, पान नं. २ वर पाच ठिकाणी जागा सोडलेल्या आहेत.

सदस्य श्री. लाल पंजाबी :–बहुमजली वाहनतळ अतिशय आवश्यक आहे.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :– लहान मुलांच्या भावनांशी खेळ चालु आहे तुमचा. सपना गार्डन हे शहराचे नाक आहे. आणि ते तोडुन तुम्ही पार्किंग झोन करतात. २००७ मध्ये जो विकास आराखडा तयार केला त्यामध्ये पाच ठिकाणी पार्किंगसाठी जागा सोडलेल्या आहेत त्या जागा काय केल्या? त्या जागांचे काय झाले? त्या ठिकाणचे आरक्षित भुखंड जर कोणी भुमाफियांनी हडप केले असतील काही बांधकाम केले असेल तर ते तोडण्यात यावे. वाहनतळासाठी सपना गार्डनच का?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–मा. महापौर महोदया, त्यांनी सांगितले आहे की आमचा विरोध असणार आहे तर तुम्ही या विषयावर मतदान घ्या. उगाच चर्चा कशाला ?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–मतदान घ्या.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :– नगररचनाकारांकडे जाणारच आहोत आम्ही, याजागांचे काय झाले? आयुक्त साहेब, मी तुम्हांला जो प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर दया. हा शहराचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. माजी महापौर तो भुखंड वाचविण्यासाठी प्रयत्न करत होत्या.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मा. महापौरजी, मी आपल्या अनुमतीने बोलु इच्छितो. अनुमती आहे का?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–चार चार सदस्य उभे राहून बोलत आहेत कृपया त्यांनी आपल्या आसनावर बसून घ्यावे

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौरजी, या विषयावर मतदान घ्या तुम्ही.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी आपण सभागृहाचा अपमान करत आहात. मी आपल्या अनुमतीने बोलु इच्छितो.

<u>उप–महापौरः–</u> बोलण्यासाठी ते उभे आहेत व आपणही उभे आहात दोन, दोन सदस्य बोलण्यासाठी उभे आहेत, कुणीतरी एकाने बसुन घ्यावे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>यांच्यानंतर मी बोलु इच्छितो.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>मा. महापौरजी, राष्टवादी कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यांनी सांगितले आहे की आमचा विरोध आहे तर माझे आपणांस निवेदन आहे की, या विषयावर मतदान घेंतले जावे.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–</u>मी आयुक्तांना प्रश्न विचारलेला आहे, सपना गार्डन तोडुन तेथे बहुमजली वाहनतळ बांधणे गरजेचे आहे का? विकास आराखडयामध्ये पार्किंगसाठी पाच जागा सोडलेल्या आहेत त्यांचे काय झाले?पान नं ३२ वर त्याची नोंद आली आहे. धिक्कार आहे तुमचा.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते**

यावेळी श्री. मोहन रामरख्यानी, श्री. महेश सुखरामानी, श्री. शेखर यादव, श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापौर :–</u>सचिव साहेब या विषयावर मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव :–</u>जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ४३ मते</u>

१. श्री. जीवन इदनानी
२. श्री. गोविंदराम लुंड
३. श्रीमती चंद्रा टेकंचदांनी
४. श्रीमती ज्योती चैनानी
५. श्रीमती मोना वनवारी
६. श्रीमती शिला मनसुलकर
७. श्री. दिलीप जग्यासी
८. श्री. दत्तात्रय पवार
९. श्री. भजनलाल रामचंदानी
१०. श्री. बच्चाराम रुपचंदानी
११. श्री. लाल पंजाबी
१२. श्रीमती मिनाताई सोनेजी
१३. डॉ. निना नाथानी
१४. श्री. हरेश जग्यासी
१५. श्री. सुरेश जाधव
१६. श्री. किशोर जग्यासी
१७. श्री. प्रशांत धांडे
१८. श्री. रामसागर यादव
१९. श्री. धनंजय बोडारे
२०. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२१. श्री. दिलीप गायकवाड
२२. श्री. विद्याताई निर्मले

२३.श्री. रमेश चव्हाण
२४.श्री. राजेश वानखेडे
२५.श्री. विजय सुपाळे
२६.श्रीमती वसुधा बोडारे
२७.श्रीमती जयश्री सुर्वे
२८.श्रीमती ज्योती माने
२९.श्रीमती बेबी भोईर
३०.श्री. शेखर यादव
३१.श्री. प्रधान पाटील
३२.श्री. मुकेश तेजी
३३.श्रीमती जया माखिजा
३४.श्रीमती शकुंतला पाटील
३५.कु. शकुंतला जग्यासी
३६.श्रीमती कविता सिरवानी
३७.श्रीमती राजश्री चौधरी
३८.श्री. विनोद ठाकुर
३९.श्री. अंकुश म्हस्के
४०.श्री. महेश सुखरामानी
४१.श्री. मोहन रामरख्यानी
४२.श्री. बी.बी. मोरे
४३.श्री. मोहन साधवानी

<u>प्रस्तावाच्या विरोधात खालील सदस्यांनी हात वर केला नाही. व मतदानात भाग घेतला नाही.</u>

१. श्री. तुलसीदास वसिटा
२. श्रीमती मालती करोतिया
३. श्रीमती इंदिरा उदासी
४. श्रीमती रजनी महाडिक
५. श्री. नरेंद्र दवणे
६. श्रीमती जयश्री पाटील
७. श्री. जे.के. ढोके

**यावेळी सभागृहात उपस्थित असलेले राष्टवादी कॉग्रेस पार्टीच्या सदस्यांपैकी श्री रविद्र बागुल, श्री सतीश चहाळ, श्री नरेन्द्रकुमार ठाकुर, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीम. संगिता कंडारे, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती सरोजिनी टेकचंदानी तसेच आर.पी.आय (आठवले गट)चे सभागृहात उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी श्रीम. पंचशिला पवार, श्रीम. सुमन शेळके, श्रीम. लता निकम हे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत गोळा होवून जमिनीवर बसले. तर श्री प्रभुनाथ गुप्ता, श्री. राजु जग्यासी हे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत उभे होते. व मा. सदस्य श्री. अनिल ऐलानी व हिरानंद जग्यासी हे आपल्या आसनावर आसनस्थ होते. हे सर्व सदस्य जोर जोरात घोषणा देत होते व त्यांनी मतदानात भाग घेतला नाही.**

<u>सदस्य श्री. जे.के.ढोके:— </u>आयुक्त साहेब, टाउन हॉल ठेक्यावर दिला, बोट क्लब ठेक्यावर दिला, स्विमींगपुल ठेक्यावर दिला आता सपना गार्डनही ठेक्यावर देत आहात का ?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>मा. महापौरजी, आपण बोलु तर दया., मा. महापौरजी, मी सभागृहाला सांगु इच्छितो की, हा जो प्रस्ताव आपण आणलेला आहे, आपल्या शहरात खरोखरच पार्किंगची समस्या आहे. हा जो प्रस्ताव आणलेला आहे, असा एक नाही तर कित्येक प्रस्ताव आणले पाहिजेत. मी महाराज भुल्लर यांना विशेष करुन हे सांगु इच्छितो की, आपण जो प्रस्ताव आणलेला आहे, त्याबाबतीत आम्ही उलट असे सांगु इच्छितो की असा केवळ एकच प्रस्ताव नाही असे १० प्रस्ताव झाले पाहिजे. आमच्या शहरात पार्किंगची एवढी मोठी समस्या आहे. परंतु ते प्रस्ताव त्या प्रस्तावांबरोबरच ब—याचशा गोष्टींचा विचार केला पाहिजे. आता हा प्रस्ताव कुणी तयार केला आहे ते मी जाणुन घेवु इच्छितो. हा प्रस्ताव कुणी तयार केला आहे आयुक्त साहेब, हा प्रस्ताव कुणी तयार केला आहे ते मी जाणुन घेवु इच्छितो. आपण उत्तर दया त्यानंतर जो काही निर्णय होईल तो होवू दया. पाहिजे तर मतदान घ्या. उत्तर तर दया आपण?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. महापौरजी, या विषयावर मतदान घेतले आहे, पुन्हा मतदान घेणार का?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आपण भलेही मतदान घ्या, आम्हांला काही हरकत नाही. परंतु जी गोष्ट आम्ही व सर्व पत्रकार जाणुन घेवु इच्छितात, त्याबद्दल आपण उत्तर तर दया. हा प्रस्ताव कुणी तयार केला आहे, याचे आम्हांस उत्तर दया.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आयुक्त साहेब, उत्तर दया. सभागृह चालु असतांना मोबाईलवर बोलले जात नाही. हा प्रस्ताव कुणी तयार केला आहे ते सांगा. मा. महापौरजी, आपण आयुक्त साहेबांना आदेश दयावा की त्यांनी आम्हांला फक्त एवढी माहिती दया. पाहिजे तर आपण मतदान घ्या. त्याबाबतीत आम्हांस काही हरकत नाही. आपण फक्त आमचे जे प्रश्न आहे, त्यांची उत्तरे दया. हा प्रस्ताव कुणी तयार केला आहे?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. सचिव साहेब, या विषयावर मतदान घेतले आहे का एवढेच सांगा.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मतदान झालेले आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मी मा. महापौरांच्या अनुमतीने बोलत आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मी सुध्दा महापौरांच्या अनुमतीने बोलत आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आयुक्त साहेब, प्रस्ताव कुणी तयार केला आहे याचे आपण उत्तर दयायचे आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, या विषयावर चर्चा झाली आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :— </u>मा .आयुक्त साहेब,_मतदान झाल्यानंतर परत प्रश्न येतात का?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>बोट क्लब विकायला काढले काय?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मतदान झालेले आहे, या विषयावर परत चर्चा करु नये. मतदान झालेले आहे, या विषयावर परत चर्चा करु नये.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>हा प्रस्ताव कुणी तयार केला आहे, आयुक्त साहेब आपण सभागृहास सांगा. कोणत्या विभागाने तयार केले आहे?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. आयुक्त साहेब, मतदान झाल्यानंतर परत विषय चर्चेस येवु शकतो काय? माझी विनंती आहे, तें विरोध करतात त्यांनी विरोध करावा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आयुक्त साहेब, प्रस्ताव कुणी तयार केला आहे हे आपण सभागृहास सांगाल, आयुक्त साहेब बोला, कोणत्या विभागाने हा प्रस्ताव तयार केला आहे?.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>सपना गार्डनच्या बाजुला शाळा व इतर कुटीर उदयोग जे आहेत, त्यामुळे तेथे मुख्य बाजारामध्ये वाहतुकीची कोंडी होते. या सगळया प्रश्नांमुळे मा. महापौरांनी ५/१०/२००२ रोजी जे पत्र दिले होते त्याप्रमाणे महानगरपालिकेने नगररचना विभागाबाबत तयार केलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :— </u>ठिक आहे,नगररचनाकार विभागाचा कोणता अधिकारी या विषयाचे स्पष्टीकरण करेल? नगररचना विभागाच्या कुण्या एका अधिका—याने व्यासपीठावर येवून या विषयाचे स्पष्टीकरण करावे कोण येत आहे?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. महापौरजी, एकदा मतदान झाल्यावर परत परत त्या विषयावर कसली चर्चा करत आहेत हे?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>महापालिका सचिव :–</u> मा.महापौराकडून हा विषय पारीत झाल्याचे जाहिर करण्यांत आले आहे

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १ :–** उल्हासनगर कॅम्प -३ येथिल अस्तित्वातील सपना गार्डन येथिल भागात बहुमजली वाहनतळ बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरात वाढत्या लोकसंख्येमुळे वाहनांचे प्रमाण वाढत असुन व्यापारी बांधवांचे प्रमाण जास्त आहे. तसेच घराघरामध्ये कोणत्या न कोणत्या स्वरुपाचे कुटीर उद्योगाचे व्यवसाय असल्याने बाहेरुन येणाऱ्या लोकांचे प्रमाण व त्यासोबत येणाऱ्या वाहनांचे प्रमाण वाढत असल्याने लोक मिळेल त्याठिकाणी वाहने उभी करतात व ज्यामुळे मुख्य बाजाराच्या ठिकाणी वाहतुक कोंडी निर्माण होते. यास्तव मा. महापौर यांचे दि. ०५. १०.१० रोजीच्या पत्रानुसार उल्हासनगर कॅम्प नं. १,२,३ येथे 'बांधा, वापरा व हस्तांतरीत करा' या तत्वावर सर्वांचे सोयीचे होईल अशा ठिकाणी वाहनतळाची जागा सूचित करणेबाबत कळविले आहे.

उल्हासनगर शहराचे मंजूर विकास आराखडयानुसार पडताळणी केली असता आरक्षण क्र. २६–बगीचा व प्रारुप विकास आराखडयानुसार अस्तित्वातील बगीच्यासाठी आरक्षित आहे. सध्या जागेवर कोणतेही बांधकाम नाही व खेळाच्या मैदानासाठी वापर सुरु आहे. सदर ठिकाणच्या बाजूस बाजारपेठ असल्यामुळे वाहनतळाची आवश्यकता आहे. सदरच्या जागेवर बहुमजली वाहनतळाची सोय केल्यास उपयुक्त ठरेल.

वरील भुखंडामध्ये 'बांधा, वापरा व हस्तांतरीत करा' या तत्वावर बहूमजली वाहनतळ बनविण्याचे मा. महापौर यांचे प्रस्तावाप्रमाणे चर्चा व विचारविनिमयाकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर विषय महासभेत चर्चा व विचारविनिमयाकरीता विषयपटलावर समाविष्ट करणेबाबत विनंती.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ४३ <u>दिनांक:–२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :–श्री. बी.बी. मोरे

ही महासभा उल्हासनगर कॅम्प -३ येथिल अस्तित्वातील सपना गार्डन येथिल भागात बहुमजली वाहनतळ बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकास व आवश्यकतेप्रमाणे त्या प्रयोजनार्थ नविन विकास आराखडयात आरक्षणाची तरतूद किंवा मंजूर विकास आराखडयात आरक्षणात बदल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आपण उत्तर देत नाहीत? आपण प्रस्ताव काय आहे ते सांगु शकत नाहीत? प्रस्ताव ज्याने तयार केला आहे त्याने स्पष्टीकरण केले पाहिजे. नगररचना विभागाच्या कुण्या एका अधिका—याने सांगावे की हा प्रस्ताव काय आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :—</u> शांतीनगर येथिल बगीच्याच्या प्रयोजनासाठी मंजुर विकास आरक्षण क्र. २९ व प्रारुप विकास आराखडयामधील आरक्षण क्र. ९० या भुखंडावर महापालिकेचे अदयावत रुग्णालय बांधणे कामी आरक्षणात बदल व विकसित करणेस मान्यता देणे.

---

<u>उपमहापौर :—</u> पास पास

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आपण सभागृहात माहिती देवु शकत नाहीत काय?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>आपणांस सभा सूचनेबरोबर या विषयाचा गोषवारा दिलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आपण सभागृहात माहिती देवु शकत नाहीत काय?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, या विषयाबाबत मतदान घेतले जावे.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—</u>२००७ साली पार्किंगसाठी ५ जागा सोडलेल्या आहेत. तुम्ही शसनाकडे ७ करोड रुपये मागितले आहेत, कशासाठी मागीतले आहेत? ते पण पत्र दाखवू का?

<u>महापौर:—</u> विषय क्र. २ बाबत मतदान घेतले जावे. जे प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ४३ मते</u>

१. श्री. जीवन इदनानी
२. श्री. गोविंदराम लुंड
३. श्रीमती चंद्रा टेकंचदांनी
४. श्रीमती ज्योती चैनानी
५. श्रीमती मोना वनवारी
६. श्रीमती शिला मनसुलकर
७. श्री. दिलीप जग्यासी
८. श्री. दत्तात्रय पवार
९. श्री. भजनलाल रामचंदानी
१०.श्री. बच्चाराम रुपचंदानी
११.श्री. लाल पंजाबी
१२.श्रीमती मिनाताई सोनेजी
१३.डॉ. निना नाथानी

१४.श्री. हरेश जग्यासी
१५.श्री. सुरेश जाधव
१६.श्री. किशोर जग्यासी
१७.श्री. प्रशांत धांडे
१८.श्री. रामसागर यादव
१९.श्री. धनंजय बोडारे
२०.श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२१.श्री. दिलीप गायकवाड
२२.श्री. विद्याताई निर्मले
२३.श्री. रमेश चव्हाण
२४.श्री. राजेश वानखेडे
२५.श्री. विजय सुपाळे
२६.श्रीमती वसुधा बोडारे
२७.श्रीमती जयश्री सुर्वे
२८.श्रीमती ज्योती माने
२९.श्रीमती बेबी भोईर
३०.श्री. शेखर यादव
३१.श्री. प्रधान पाटील
३२.श्री. मुकेश तेजी
३३.श्रीमती जया माखिजा
३४.श्रीमती शकुंतला पाटील
३५.कु. शकुंतला जग्यासी
३६.श्रीमती कविता सिरवानी
३७.श्रीमती राजश्री चौधरी
३८.श्री. विनोद ठाकुर
३९.श्री. अंकुश म्हस्के
४०.श्री. महेश सुखरामानी
४१.श्री. मोहन रामरख्यानी
४२.श्री. बी.बी. मोरे
४३.श्री. मोहन साधवानी

प्रस्तावाच्या विरोधात खालील सदस्यांनी हात वर केला नाही. व मतदानात भाग घेतला नाही.

१. श्री. तुलसीदास वसिटा
२. श्रीमती मालती करोतिया
३. श्रीमती इंदिरा उदासी
४. श्रीमती रजनी महाडिक
५. श्री. नरेंद्र दवणे
६. श्रीमती जयश्री पाटील
७. श्री. जे.के. ढोके

यावेळी सभागृहात उपस्थित असलेले राष्टवादी कॉग्रेस पार्टीच्या सदस्यांपैकी श्री रविद्र बागुल, श्री सतीश चहाळ, श्री नरेन्द्रकुमार ठाकुर, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीम. संगिता कंडारे, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती सरोजिनी टेकचंदानी तसेच आर.पी.आय (आठवले गट)चे सभागृहात उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी श्रीम. पंचशिला पवार, श्रीम. सुमन शेळके, श्रीम. लता निकम हे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत गोळा होवून जमिनीवर बसले होते. तर श्री प्रभुनाथ गुप्ता, श्री. राजु जग्यासी हे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत उभे होते. व मा. सदस्य श्री. अनिल ऐलानी व हिरानंद जग्यासी हे आपल्या आसनावर आसनस्थ होते. हे सर्व सदस्य जोर जोरात घोषणा देत होते व त्यांनी मतदानात भाग घेतला नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—बोलण्याची संधी तर दिली जावी.ना

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u> पुर्ण महापालिकेत या प्रस्तावाचे स्पष्टीकरण करण्यास आपणाकडे कुणी अधिकारी नाहीत?

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:—</u>आयुक्त साहेब, उठा तुम्ही उत्तर दया. ७ करोड रुपये शासनाकडे कशाला मागणी केली तुम्ही? पार्किंगसाठी तुम्ही ७ करोडची मागणी केली होती त्या जागा कोठे गेल्या?

<u>सदस्य श्रीमती मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी, या विषयावर बोलण्यासाठी कुणाला संधी तर दिली जावी. मतदान का घेता?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>सभागृहास मी सांगु इच्छितो की, ज्या भुखंडावर प्रस्ताव पारीत करत आहात तो एक आरक्षित भुखंड आहे. तो आपण बीओटीवर देवु शकतो काय? उत्तर दया.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापालिका सचिव :—</u>तिसरी सभा जी आहे ती १० मिनिटानंतर सुरु होईल.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतीया</u> :— मा. महापौरजी ,आयुक्त साहेब व सचिव साहेब........

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २** :—शांतीनगर येथिल बगीच्याच्या प्रयोजनासाठी मंजुर विकास आरक्षण क्र. २९ व प्रारुप विकास आराखडयामधील आरक्षण क्र. ९० या भुखंडावर महापालिकेचे अद्ययावत रुग्णालय बांधणे कामी आरक्षणात बदल व विकसित करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरामध्ये महापालिकेचे अद्यावत रुग्णालय बांधणेसाठी मा. महापौर यांचे दि. २६.०८.१० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने सौ. मीनाताई ठाकरे नगर, शांतीनगर, उल्हासनगर—३ येथील भुखंडात बांधावयाच्या प्रस्तावित रुग्णालयाच्या भुखंडाची पडताळणी केली असता उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार सदर भुखंड आरक्षण क्र. २९—बगीचामध्ये समाविष्ट आहे व प्रारुप विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र. ९० — बगीचा या आरक्षणामध्ये येते. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.

वरील जागेबाबत महासभेत विचारविनिमय व चर्चेअंती ज्याप्रमाणे ठराव संमत केला जाईल. तद्नंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणे सोयिस्कर होईल.

मा. महापौर यांचे पत्रानुसार सदर विषय महासभेत चर्चा व विचारविनिमयाकरीता विषयपटलावर समाविष्ट करणेबाबत विनंती.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ४४ <u>दिनांक:—२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी

ही महासभा शांतीनगर येथे बगीच्याच्या वापरासाठी मंजुर विकास आराखडयात आरक्षित असलेल्या आरक्षण क्र. २९ व प्रारुप विकास आराखडयामधील आरक्षण क्र. ९० या भुखंडावर महापालिकेचे अद्ययावत रुग्णालय, रहिवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ आरक्षणात बदल करणे व उक्त विकासासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**दुसरी सभा समाप्त झाली. १० मिनिटांनंतर तिसरी सभेस सुरुवात करण्यात येईल.

सांयकाळी ४.४८ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—
३/१/२०११

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३/१/२०११ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

वि—९

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा सोमवार दिनांक ३/१/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

५. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

६. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४० | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४१ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४२ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४३ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १२ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ४६ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४८ | श्री. किशोर जग्यासी |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४९ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५० | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५१ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५२ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५३ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५५ | श्री. मोहन साधवाणी |
| २२ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ५६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५७ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २४ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५८ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५९ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६० | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ६१ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६२ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६३ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३० | श्रीमती शकुंतला पाटील | ६४ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३१ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६५ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३२ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६६ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३३ | श्री.एडके गणपत गोविंद | ६७ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३४ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६८ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३५ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६९ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३६ | श्री. लालबिहारी बुझारत यादव | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, २. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, ३. श्री. राजू जग्यासी, ४. श्रीमती जया प्रकाश माखीजा, ५. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ६. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ७. श्री. सुखरामानी महेश पहलाजराय, ८. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, ९. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, १०. श्री. शेखर केशव यादव, ११. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १२. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई)

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२०.श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त
२१.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२२.श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
२३.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
२४.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
२५.डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
२६.श्री. एम. जवांदे, शहर अभियंता
२७.श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
२८.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२९.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
३०.श्री. भुमकर, उप कर निर्धारक व संकलक
३१.श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अतिक्रमण
३२.श्री. दिपक मोरे, प्रभाग अधिकारी
३३.श्री. बबिश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत
३४.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
३५.श्री. नंदु समतानी, मुख्य लिपिक, साप्रवि
३६.श्री. भास्कर मिरपगारे, प्र.अग्निशमन अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.२४ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आज ३ जानेवारी, सावित्रीबाई फुले यांची जयंती आहे. आम्हां सर्व महिलांच्यावतीने त्यांना कोटी कोटी प्रणाम.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सर्व अधिकारी यांना मी नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. पुढील वर्ष आम्हांस भाग्याचे, नशिब अजमाविण्याचे आहे. तेव्हा प्रत्येक अधिका—यांनी आणि आपल्या आयुक्त साहेबांनी २०११ मधील महासभेला अनुपस्थित राहु नये. एवढी अपेक्षा व्यक्त करतो आणि लाख लाख शुभेच्छा देतो.

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**उल्हासनगर महानगरपालिकेचे कर विभागातील कर्मचारी श्री. ओमप्रकाश गुरनानी जे सिंधी समाजातील कलाकारही होते. तर मला असे वाटते की त्यांना श्रध्दांजली दिल्यानंतरच या सभेचे कामकाज चालविले जावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महानगरपालिकेचे कर विभागातील कर्मचारी श्री. ओमप्रकाश गुरनानी यांचे दिनांक २६/१२/२०१० रोजी अचानक निधन झाले.

वर उल्लेख केलेल्या कुटूंबियाच्या दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ६१ अ** **दिनांक:—३/१/२०११**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. ओमप्रकाश गुरनानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :</u>—कर विभागातील कर्मचा—याने कर वसुलीचा उच्चांक केला आहे. व त्यांचे सुध्दा नविन वर्षामध्ये स्वागत करतो. तसेच श्रीमती संगिता धायगुडे महोदया यांनी कचरा ठेकेदाराची देयके रोखुन ठेवली होती, ती त्यांच्या गैरहजेरीत कोणीतरी त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकारुन ठेकेदाराच्या देयकांना मंजुरी दिली आहे. आयुक्त साहेब, आपण याची चौकशी करावी.

<u>उप—महापौर :</u>—सन्माननिय सदस्य श्री. किशोर जग्यासी यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, ही विशेष महासभा असल्यामुळे त्या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही.

यावेळी सदस्य श्री. लालबिहारी यादव यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :</u>— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :</u>—उल्हासनगर महापालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' या तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करण्यास मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आलेला आहे, स्वत:च्या पाण्याचा स्त्रोत विकसित करण्याचा त्याबाबत आपल्या गोषवा—यामध्ये सविस्तर माहिती दिली पाहिजे. जेणेकरुन आम्ही सर्व गटनेते एकत्र बसुन त्यावर विचार विर्मश करु शकु. परंतु ती माहिती दिलेली नाही. अपुर्ण माहिती दिली आहे. यासाठी मी सभागृहास निवेदन करतो की, हा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यांत यावा. व विस्तृत माहितीसह हा विषय पुढील महासभेत आणला जावा.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी :</u>—हा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यांत यावा.

यावेळी सदस्या श्रीमती रजनी महाडिक, श्रीमती निना नाथानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :</u>—सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आजच्या सभेपुढे जो पहिला विषय आलेला आहे, उल्हासनगर महापालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' या तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करण्यास मान्यता देणेचा त्याबाबतीत मी सागु इच्छितो की, २८ तारखेला मागील महासभा झाली. आणि त्यानंतर लगेचच या सभेची सूचना देण्यात आली. हा जो विषय आहे तो शहराच्या अतिशय जिव्हाळयाचा विषय आहे. त्यावर आपण सविस्तरपणे चर्चा केली पाहिजे. आणि त्यानंतरच त्यावर निर्णय घेतला पाहिजे. यासाठी आजच्या या सभेच्या कार्यसूचीवरुन हा विषय वगळण्यांत यावा. अशी मी सर्व सन्माननिय सदस्यांच्यावतीने विनंती करतो.

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):</u>—सन्माननिय महापौरजी, उप—महापौर व सर्व सन्माननिय सदस्य, हा विषय जो आपल्या समोर मांडला गेलेला आहे, यापुर्वी हा विषय मंजुर झालेला आहे. आणि हा विषय सभागृहापुढे मांडण्यापुर्वी स्थायी समितीमध्ये या विषयास मंजुरीही घेतलेली आहे. आता एका सन्माननिय सदस्याने म्हटले की, गोषवा—यामध्ये या विषयाची जी माहिती आहे ती अपुर्ण आहे. तर आपणांस विनंती आहे की, कुठली माहिती अपुर्ण आहे ती आपण सांगावी म्हणजे पुढील सभेत तयारीनीशी विषय मांडता येईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. आयुक्त साहेब व सभागृहातील सर्व सदस्य, आजच्या या विषयाबाबत संपुर्ण सभागृहाचे असे मत आहे की हा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत यावा. त्यानंतरही जर आपण विचारत असाल की या विषयामध्ये कोणती माहिती अपुर्ण आहे? तर मी असे म्हणेण की, यामध्ये एक सुध्दा माहिती बरोबर नाही.

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):</u>—मी यासाठीच विचारले की, आपण म्हणालात की हा विषय कार्यसूचीवरुन वगळुन तो नंतर पुढील महासभेत घेतला जावा. या विषयाची पुढील महासभेत माहिती दयायची

आहे. त्या अगोदर त्यामध्ये कोणती माहिती अपुरी आहे हे जर आपण सांगितले तर ती माहिती तयार करता येईल. शासन आणि प्रशासनाचा यामध्ये समन्वय पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हा प्रस्ताव आपण बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देत आहोत. आपण जो पाण्याचा स्त्रोत उभारत आहोत तो जो ठेकेदार बनविणार आहे त्यास याबाबत किती खर्च येईल? जर तो कमी पैश्यात बनविणार असेल तर महापालिका स्वत: बनवेल. दुसरे म्हणजे आज आपणांस एमआयडीसी मार्फत पाणी पुरवठा होतो, जर बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर स्वत:चा पाण्याचा स्त्रोत बनेल तर किती खर्च येईल? जर तो २.५० पैसे प्रति एक हजार लिटर पाणी येणार तर त्यास फिल्ट्रेशन करण्यास किती खर्च येईल? व त्या ठेकेदारास किती नफा होईल. आमचे असे म्हणणे आहे की जर आम्हांस ही माहिती मिळाली तर स्त्रोत उभारण्यास किती खर्च येईल, तर आम्ही याबाबत अंदाज लावु शकतो की तो आपल्या शहरवासियांना कमीत कमी किती भावात पाणी मिळेल? असे होवु शकते की ठेकेदाराने आम्हांस सांगितले की माझा १०० किंवा १५० कोटी खर्च होईल. आणि आपल्या येथिल अभियंते सांगतील की ४० कोटी किंवा ३० कोटी खर्च येईल तर जो ठेकेदार त्या पाण्याचे स्त्रोत १०० किंवा १५० कोटी मध्ये बनवितो, तर त्यास १००० प्रति लिटर पाणी २.५० पैश्यात मिळते, तर तो आम्हांस किती भावात देईल? तसेच त्यास फिल्ट्रेशन करण्यास किती खर्च येईल? आपल्या शहरातील जे रहिवासी आहे ते या ठेकेदारास किती पैसे देतील? याबाबतची माहिती आम्हांला मिळायला हवी.तसेच याबाबत माहिती हवी की महापालिका स्वत:च्या पाण्याचा स्त्रोत उभारते तर महापालिकेस २.५० पैश्यात एक हजार लिटर पाणी घेतल्यानंतर, फिल्ट्रेशन केल्यानंतर ते पाणी केवढयास मिळेल? व आम्ही लोकांस किती किंमतीत ते देवु? यात महापालिकेला किती फायदा मिळेल? किंवा आम्ही हा प्रकल्प कर्ज घेवुन सुध्दा करु शकतो काय? याबाबत संपुर्ण विस्तृत माहिती महापालिकेच्या सदस्यांना असणे अति आवश्यक आहे. यासाठी हा प्रस्ताव आजच्या कार्यसूचीवरुन वगळला जावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, जेव्हा सर्व सन्माननिय सदस्यांना हा विषय वगळायचाच होता तर आयुक्त साहेबांनी हे म्हणायलाच नको होते की हा विषय पुढील महासभेत घेवु, व चर्चा करु. यावर आता चर्चा करायलाच नको हा विषय आपण सभेच्या कार्यसूचीवरुन वगळत आहोत.

<u>महापालिका सचिव :—</u> हा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळयायचा काय? सर्वानुमते?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १** :—उल्हासनगर महापालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' या तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

चार—पाच दिवसापुर्वीच महासभा झाली आणि त्यानंतर लगेच या महासभेची सूचना देण्यात आली. हा जो विषय आहे हा उल्हासनगर शहरवाशियांचा अतिशय जिव्हाळयाचा प्रश्न आहे. त्यावर विस्तृतपणे चर्चा केली पाहिजे.

गोषवा—यामध्ये विषयाशी संबंधित पुर्ण माहिती दिलेली नाही. ही योजना तयार करण्यासाठी किती खर्च येईल याबाबतीत सर्व गटनेते एकत्र बसुन चर्चा करु शकतील. यासाठी हा विषय आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्याप्रयोजनार्थ प्रस्तावित.

<u>विशेष महासभा ठराव क्र: ६१ ब</u> <u>दिनांक:—३/१/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

ही महासभा उल्हासनगर महापालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' या तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करण्याचा प्रस्ताव या सभेच्या कामकाजातुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :–** उल्हासनगर शहरात स्थानिक संस्था कर लागु न करणे व जकात वसुली कायम ठेवण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मी या विषयास सुध्दा आजच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास सांगत आहे, कारण की हा विषय सुध्दा परिपुर्ण असा नाही. जेव्हा स्थानिक संस्था कर लागु करण्याविषयी पुर्वी सांगण्यात आले होते तेव्हा आपल्या येथिल व्यापारी लोकांनी याबाबत विरोध केला होता. तर आज हा जो विषय सभेपुढे आला आहे त्याबाबत मी म्हणेन की हा विषय वगळुन सर्व गटनेत्यांची बैठक घेवुन, सर्व व्यापा–यांची बैठक घेवुन या विषयास पुन्हा सभेत आणले जावे. यासाठी हा विषय आजच्या कार्यसूचीवरुन वगळण्यांत यावा.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–**हा विषय वगळला जावा.

**महापालिका सचिव :–** हा विषय वगळायचा? सर्वसंमतीने?

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :–** उल्हासनगर शहरात स्थानिक संस्था कर लागु न करणे व जकात वसुली कायम ठेवण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे.

**प्रस्तावना**

या विषयाचा गोषवारा परिपुर्ण नाही. यापुर्वी जेव्हा स्थानिक संस्था कर लागु करण्याचा विषय आला होता त्यावेळी सभागृहातील सर्व सदस्यांनी व व्यापा–यांनी स्थानिक संस्था कर लागु करण्यास पुर्ण विरोध केला होता. या विषयाबाबत सर्व गटनेत्यांची बैठक घेणे आवश्यक आहे. तसेच व्यापा–यांची एक बैठक घेणे आवश्यक आहे. यासाठी हा विषय या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्याप्रयोजनार्थ प्रस्तावित.

**विशेष महासभा ठराव क्र:** ६१ क      **दिनांक:–३/१/२०११**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा उल्हासनगर शहरात स्थानिक संस्था कर लागु न करता जकात वसुली कायम ठेवण्याप्रयोजनार्थ शासनाकडे प्रस्ताव पाठविणेचा प्रस्ताव या सभेच्या कामकाजातुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी ३.३६ वाजता महापौर श्रीमती राजश्री चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका